# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# प्रगत बँकिंग

## (Advanced Banking)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

**एम. ए. भाग-२ : सत्र-४**

**अर्थशास्त्र :**

EO-36 (Elective Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
**सुधारित आवृत्ती** : २०२३
एम. ए. भाग - २ करिता (प्रगत बँकिंग)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-80-9

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ अर्थशास्त्र अभ्यासमंडळ ■


अध्यक्ष – **डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

- **डॉ. विद्यावती प्रल्हाद कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. पी. एस. कांबळे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मनोहर आप्पासाहेब कोरे**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रकाश कृष्णा टोने**
  सावित्रिबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. किरण शंकर पवार**
  सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड,
  ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. सचिन आप्पासाहेब सरदेसाई**
  राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. प्रभाकर तानाजी माने**
  जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
  शिरोळ–वाडी रोड, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिल धोंडिराम सत्रे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. हणमंत एन. कठारे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  राजाराम कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. रमेश गणेशराव दंडगे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मोहन गोविंद सदामते**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड कॉलेज, कुंडल,
  जि. सांगली
- **श्री. मोहन नरहर पंडितराव**
  यशोदीप ८५, मंगेशकर नगर, सुभाष रोड,
  मंगळवारपेठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने एम. ए. भाग-२ अर्थशास्त्र या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१४-१५ पासून सत्र पद्धती सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने 'प्रगत बँकिंग' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सत्र ४ साठी लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, कोष्टके, गणितीय सूत्रे, आकृत्या इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, क्षेत्रीय अभ्यासासाठी विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

प्रगत बँकिंग या विषयातील भारतातील बँकिंग तंत्रज्ञान, बँकांमधील पत आणि जोखिम व्यवस्थापन, बँकिंग आणि सायबर कायदे, बँक व्यवस्थापन व्यवहार या घटकांचे सविस्तरपणे विश्लेषण केलेले आहे.

प्रगत बँकिंग या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. त्याबद्दल घटक लेखकांना मनःपूर्वक धन्यवाद. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. विजय कुंभार**
धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स,
सातारा

**डॉ. के. आर. तनंगे**
ओंकार आर्टस, कॉमर्स, अॅण्ड सायन्स कॉलेज,
गडहिंग्लज

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**प्रगत बँकिंग**
**एम. ए. भाग–२ : ऐच्छिक पेपर**–EO-36

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. विजय कुंभार**<br>धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा | १, ४ |
| **डॉ. अनिल धोंडीराम सत्रे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव ता. वाळवा, जि. सांगली | २, ३ |

**■ संपादक ■**

**डॉ. विजय कुंभार**
धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स,
सातारा

**डॉ. के. आर. तनंगे**
ओंकार आर्टस, कॉमर्स, अॅण्ड सायन्स कॉलेज,
गडहिंग्लज

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | भारतातील बँकिंग तंत्रज्ञान | १ |
| २. | बँकांमधील पत आणि जोखिम व्यवस्थापन | २७ |
| ३. | बँकिंग आणि सायबर कायदे | ४९ |
| ४. | बँक व्यवस्थापन व्यवहार | ६८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक क्र. १

# भारतातील बँकींग तंत्रज्ञान

# ( Banking Technology In India )


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ बँकींग क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानाचा वापर व IDRBT

१.३ इंटरनेट बँकींग - स्वरूप, व्याप्ती व मार्गदर्शक तत्त्वे

१.४ मोबाईल बँकींग - स्वरूप, व्याप्ती व मार्गदर्शक तत्त्वे

१.५ इलेक्ट्रॉनिक समाशोधन

१.६ सारांश

१.७ पारिभाषिक शब्द

१.८ बहुपर्यायी प्रश्न व उत्तरे

१.९ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.१० अधिक वाचनासाठी पुस्तके व संदर्भ


## १.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाचा अभ्यास केल्यास आपणास ;

१) बँकींग क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानाचा वापर व महत्त्व समजेल.

२) भारतीय बँकींग क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानामधील IDRBI ची भूमिका समजेल.

३) विविध प्रकारच्या इंटरनेट बँकींग सेवा व त्याबाबतचे RBI च्या मार्गदर्शक सूचनांची माहिती मिळेल.

४) मोबाईल बँकींग सेवांची व्याप्ती व त्याबाबतची RBI च्या मार्गदर्शक सूचनांची माहिती मिळेल.

५) इलेक्ट्रॉनिक समाशोधन पद्धतीमधील ESC, IMPS, CTS, BBPS, NEFT, RTGS व SWIFT ची कार्यपद्धती समजेल.

## १.१ प्रस्तावना

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवीन संशोधन आणि उपलब्ध तंत्रज्ञानाचा सर्वच क्षेत्रातील वापर वाढत असून त्याचप्रमाणे बँकींग क्षेत्रातही माहिती तंत्रज्ञान, (Information and Communication Technology - ICT)चा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. बँकींग क्षेत्रात प्रामुख्याने मुख्य कार्यालय, शाखा, बँकींगचे विविध प्रकारचे आऊटलेट व सेवा केंद्रामध्ये हे तंत्रज्ञान वापरून अधिक जलद, सोईस्कर सेवा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण बँकींग क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान (ICT) च्या वापराची सविस्तर माहिती घेणार आहोत.

## १.२ बँकींग क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान (ICT) चा वापर

भारतीय बँकींग क्षेत्रात संगणकाचा वापर करण्याबाबत सन १९८४ मधील डॉ. सी. रगराजन समितीने सन १९८५ ते १९८९ या काळासाठीचा बँकांच्या संगणकीकरणाची योजना तयार केली. त्यानुसार देशातील राष्ट्रीयकृत बँकांमध्ये संगणक बसवण्याची योजना राबवण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी भारतीय बँकांमध्ये Magnetic Ink Charactor Recognition (MICR ) तंत्रज्ञान वापरण्याबाबत डॉ. वाय. बी. दामले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आलेली होती. सन १९८७ मध्ये श्री. टी. एन. अय्यर यांच्या अध्यक्षतेखाली Committee on Communication Network for Banks and SWIFT Implementation ची स्थापना करण्यात आलेली होती, सन १९९४ मध्ये श्री डब्ल्यू एस् सराफ यांचे अध्यक्षतेखाली Committee on Technology issues relating to payments systems cheque clearing and securities settelment in the Banking Industry तर १९९५ मध्ये श्रीमती के.एस् शेरे यांचे अध्यक्षतेखाली Committee for Proposing Legislation on Electronic Fund Transfer and other Electronic Payment ची स्थापना झालेली होती. या सर्व समित्यांनी केलेल्या शिफारशी व RBI च्या प्रयत्नामध्ये भारतीय बँकांमध्ये मोठ्या प्रमाणात संगणक आणि ICT चा वापर सुरू झालेला दिसून येतो यामधील काही महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

### १) बँकांचे संगणकीकरण (Bank Computerization) :

सन १९८५ पर्यंतच्या काळात बहुतांश भारतीय बँका परंपरागत पद्धतीने बँकींग व्यवसायातील कामकाज करत होता परंतू सन १९८५ ते १९८९ मधील संगणकीकरण योजनेमुळे देशातील बहुतांश राष्ट्रीयकृत बँकामध्ये संगणक प्रणाली वसवण्यात आल्या. सध्या देशातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका संगणकीकृत झाल्या असून त्याचा वापर करत असल्याचे दिसून येते.

### २) इलेक्ट्रॉनिक डेटा स्टोरेज (Electronic Data Store)

पूर्वीच्या काळी बँकींग संस्था आपल्यामधील कार्यालयीन माहिती तसेच ग्राहकांची माहिती साठवणूक करण्यासाठी विविध प्रकारचे लेखी दस्तावेज आणि रजिस्टरचा वापर करत होत्या परंतू सध्या बँकेतील सर्व प्रकारची माहिती डेटा इलेक्ट्रॉनिक फॉर्म मध्ये साठवणूक करु लागल्या आहेत. त्यालाच इलेक्ट्रॉनिक

डेटा स्टोरेज EDS असे म्हटले जाते.

### ३) इलेक्ट्रॉनिक डेटा इन्टरचेंज (Electronic Data Interchange)

माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे बँकींग संस्था केवळ आपल्याकडील माहिती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवण्याचे काम करत नसून या बँका आपल्याकडील माहिती दुसऱ्या शाखा, RBI किंवा इतर संस्थांकडे आवश्यकतेप्रमाणे पाठवत असतात. ICT च्या वापरामुळे ही माहिती आता छापील स्वरूपात न पाठवता इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवता येणे शक्य झालेले आहे. त्यास EDI असे म्हणतात.

### ४) इलेक्ट्रॉनिक डेटा मायनिंग (Electronic Data Mining)

बँकींग संस्थांकडे साठवून ठेवलेली प्रचंड व व्यापक स्वरूपाच्या माहितीमधून एखाद्या विशिष्ट ग्राहकाची किंवा त्याने केलेल्या विशिष्ट व्यवहाराची माहिती शोधणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारासाठी वापर करणे ही बाब पूर्वीच्या काळी अत्यंत अवघड होती. मात्र सध्या Electronic Data Mining - EDM तंत्रज्ञानामुळे हे काम खूप सुलभ व सोयीस्कर झालेले आहे.

### ५) नेटवर्क व संबंधित यंत्रणेचा वापर :

बँकींग क्षेत्रात माहितीचे देवाण-घेवाण करण्यासाठी बँकींग संस्था विविध प्रकारच्या नेटवर्क तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. यामध्ये BANKNET आणि INFINET (Banking Network आणि Indian Financial Network यांचा वापर करत आहेत. INFINET मुळे भारतीय बँकांना एक स्वतंत्र नेटवर्क उपलब्ध झालेले असून या नेटवर्कद्वारे सुरक्षित डेटा पाठवण्याची सोय झालेली आहे.

### ६) इलेक्ट्रॉनिक यंत्रांचा वापर :

बँकींग संस्था आपल्या कार्यालयीन कामकाजासाठी तसेच ग्राहकांना विविध प्रकारच्या सेवा देण्यासाठी विविध प्रकारची इलेक्ट्रॉनिक यंत्रे वापरू लागल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पैसे मोजण्याचे यंत्र, ATM, Point of Sale (POS), MICR स्कॅनर, खोट्या नोटा शोधण्याचे तंत्र, इलेक्ट्रॉनिक नोटीस बोर्ड इत्यादीचा समावेश होतो.

### ७) MICR तंत्रज्ञानाचा वापर :

बँकींग संस्था भारतातील चेक वटवण्याच्या सुविधेसाठी Magnetic Ink Charactor Regonition (MIRC) तंत्रज्ञानाचा वापर करत असून चेकची वटवणूक आणि डेटा फिडींग जलदपणे करण्यासाठी हे तंत्रज्ञान बँकांना अत्यंत उपयुक्त ठरत आहे. सध्या या तंत्रज्ञानावर आधारीत असणारी Electronic Cheque Cleaning - ECC सेवाही प्रदान केली जात आहे.

### ८) वायर्ड व वायरलेस इंटरनेट सेवेचा वापर :

बँकींग संस्था विविध प्रकारच्या इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग व इलेक्ट्रॉनिक समाशोधन सुविधा

उपलब्ध करून देण्यासाठी वायर्ड आणि वायरलेस इंटरनेट सेवांचा Wired and Wireless Internet वापर करत आहेत. वेबसाईट, मोबाईल बँकींग ॲप्स, Point of Sale (POS) टर्मिनल, स्कॅन अँड पे, इत्यादी सेवा देण्यासाठी आज बँका या दोन्ही प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर करत असून त्याद्वारे अधिकाधिक दर्जेदार सेवा देण्याचा प्रयत्न करत आहेत.

**९) विविध सॉफ्टवेअरचा वापर :**

बँकींग व्यवस्थापन, बँकींग सेवा बँकींग व्यवहाराची स्वयंचलीत पद्धतीने व्यवहारपूर्ती करण्यासाठी बँका विविध प्रकारच्या सॉफ्टवेअरचा वापर करत असून यामध्ये Infosys Finacle, Oracle Financial Services, Conopus E pay Suite, NLS Banking Solution, Fiserv इत्यादींचा समावेश आहे. सॉफ्टवेअरमुळे बँकींग व्यवहार व त्याची माहिती साठवणे आणि त्याचा गरजेनुसार वापर व पुनर्वापर करणे अत्यंत गरजेनुसार वापर व पुनर्वापर करणे अत्यंत सोईस्कर झालेले आहे.

**१०) रोबोटीक तंत्रज्ञानाचा वापर :**

आधुनिक बँका आपल्या ग्राहकांना उत्तम सेवा देण्यासाठी केवळ संगणकाचा वापर करत नसून आज बँका पैसे देणे, पैसे मोजणे, डेटा एन्ट्री करणे, सिक्युरीटी सर्व्हीसेस, लॉकर्स, ATM सेवा ग्राहक मित्र सेवा इत्यादी सेवा देण्यासाठी रोबोट चा वापर करु लागल्या आहेत. जगातील प्रगत देशातील बँकांबरोबरच आज ICICI Bank, HDFC बँक, युनियन बँक अशा बँकाही रोबोटीक्सचा वापर करु लागल्या आहेत.

**११) आर्टिफिशीयल इन्टलीजन्सचा वापर :**

अलिकडील काळात Artifical Intelligence (AI) हे उत्तम तंत्रज्ञान उपलब्ध झालेले असून त्याचा वापर विविध प्रकारचा उद्योग व्यवसायात होऊ लागलेला आहे. पर्यायाने बँकींग क्षेत्रही त्याला अपवाद नसून अनेक बँका (AI) तंत्रज्ञानाचा वापर करू लागल्या आहेत. ग्राहक सेवा, बँकींग व्यवस्थापन, नियोजन, कार्यवाही इत्यादी प्रकारच्या सेवा देणे (AI) मुळे शक्य झालेले आहे.

**१.२.१ : माहिती तंत्रज्ञानाच्या वापराचे बँकींग क्षेत्रातील महत्त्व/ उपयुक्तता :**

बँकींग क्षेत्रातील वाढता (ICT) चा वापर किंवा उपयोग पुढील विविध कारणासाठी महत्त्वाचा असून त्यामधील काही महत्त्वाचे योगदान किंवा उपयुक्तता पुढीलप्रमाणे आहेत. :

१) (ICT) च्या वापरामुळे बँकेच्या अंतर्गत व्यवस्थापन व कारभारामध्ये गती व अचुकता येते.

२) बँकींग ग्राहकांना विविध प्रकारच्या आधुनिक सेवा सुविधा देता येणे शक्य होते.

३) बँक ग्राहकांना उत्तम व दर्जेदार सेवा देणे शक्य होते.

४) बँकींग व्यवहारातील मानवी चुकांमुळे होणारे दोष किंवा समस्या कमीत कमी करता येतात.

५) बँकींग क्षेत्रातील लेखी व कागदोपत्री व्यवहार कमी करून पेपर लेस बँकींग करता येण्यास मदत होते.

६) (ICT) च्या वापराकडे दुर्गम भागापर्यंत बँकींग सेवा पोहचवून वित्तीय समावेशनात वाढ करता येणे शक्य होते.

७) (ICT) च्या वापराकडे स्वयंचलित व स्वयंप्रयोजित बँकींग सेवा प्रदान करता येणे शक्य होते.

८) (ICT) च्या वापराकडे २४ × ७ म्हणजेच सदासर्वकाळ बँकींग सेवा प्रदान करता येणे शक्य होते.

९) संगणकीकरण आणि नेटवर्कमुळे विविध बँकींग सेवा जलदपणे देता येणे शक्य होते त्यावरील खर्चही कमी होतो.

१०) (ICT) बेसड् सेवामुळे ग्राहकांच्या संख्येत वाढ होण्यास मदत होऊन बँकींग व्यवसाय वाढतो.

**१.२.२ : भारतीय बँकींग तंत्रज्ञान विकास व संशोधन संस्था :**

भारतीय अर्थव्यवस्थेत बँकींग तंत्रज्ञानाचा विकास व त्याबाबत संशोधन, प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणारी संस्था स्थापन करणे बाबत Committee on Technology Upgradution in the Payment System-1994 ने शिफारस केलेली होती. या शिफारशी व देशातील बँकींग तंत्रज्ञानाच्या विकासाची गरज लक्षात घेऊन मार्च १९९६ मध्ये IDRBT या म्हणजेच Institute for Development and Research in Banking Technology या स्वायत्त संस्थेची (Autonomous Institutions) ची स्थापना करण्यात आली.

**IDRBT ची उद्दिष्ट्ये :**

१) देशातील बँकींग व वित्तीय क्षेत्रातील तंत्रज्ञानाची गरज ओळखून त्याचे संशोधन व विकास करणे.

२) सोयीस्कर व उत्तम दर्जाच्या बँकींग सेवा देण्यासाठी बँकींग तंत्रज्ञानाचा वापर करणे.

३) जगभरातील उद्योन्मुख तंत्रज्ञानाचा कल लक्षात घेऊन देशातील बँकींग व वित्तीय क्षेत्रास त्याप्रमाणे मार्गदर्शन करणे.

४) बँकींग व वित्तीय क्षेत्रास तंत्रज्ञान, पायाभूत सेवा सुविधा, आणि तंत्रज्ञानाच्या व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षण, सल्ला व मार्गदर्शन करणे.

५) बँकींग तंत्रज्ञान क्षेत्रातील अभ्यास क्षेत्राचा विस्तार करणे.

६) नाविन्यपूर्ण आणि दर्जेदार शिक्षणाद्वारे बँकींग तंत्रज्ञानातील तज्ञ व्यावसायिक तयार करणे.

७) बँकींग तंत्रज्ञानाबाबतची मानके व व्यवहार पद्धती ठरवण्यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहभागी होणे.

**IDRBT ची बँकींग तंत्रज्ञान क्षेत्रातील भूमिका / महत्त्व :**

**IDRBT** ही संस्था सध्या भारतीय बँकींग क्षेत्रातील विविध प्रकारच्या बँकींग तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन, नवप्रवर्तन आणि विकास कार्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे त्यामधील काही महत्त्वाच्या भूमिका पुढीलप्रमाणे आहेत.

१) बँकींग संस्थांना विविध प्रकारचे वित्तीय व्यवहार करण्यासाठी आवश्यक असणारे INFINET हा प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन डेटा ट्रान्स्फर चे कार्य करण्यास मदत करत आहे.

२) बँकांना माहितीचे आदान-प्रदान करण्यासाठी Multi-Pocket-Label Switch (MPLS) हे तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्याचे कार्य IDRBT करत आहे.

३) देशातील बँकांना शेअर्ड, ATM सेवा (Shured ATM Network) सेवा देण्यासाठी IDRBT ने National Financial Switch - NFS करुन दिलेला असून सध्या हे काम (NPCI) पाहत आहे.

४) बँकींग क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या युवा वर्गास बँकींग तंत्रज्ञानाबाबतचे विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम, M.Tech, Post Graduate Diploma, Ph.D, Post Doctorat Research इत्यादी कोर्सेस सुरू केलेले आहेत.

५) बँकींग क्षेत्रातील तज्ञ, अधिकारी व अभ्यासकांना बँकींग तंत्रज्ञानामध्ये संशोधन करण्यासाठी IDRBT Research Project Scheme (IRPS) सुरु केलेली आहे.

६) बँकींग व वित्तीय क्षेत्रातील उत्तम संशोधन व विस्तार कार्यासाठी IDRBT ने खालील संशोधन केंद्रे सुरु केलेली आहेत.

Center of Excellence in Analytics.

Center of Excellence in Cyber Security.

Center For Mobile Banking.

Center For Affordable Technologies.

Center For Cloud Computing.

Center For Payment Systems.

७) बँकींग क्षेत्रातील महत्त्वाच्या विषयावर विचारमंथन घडवून आणण्यासाठी IDRBT ही संस्था प्रतिवर्षी विविध प्रकारच्या कॉन्फरन्सेसचे आयोजन करत असते. यामध्ये विविध देशातील तज्ञांना आमंत्रित करुन त्यांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाते.

८) IDRBT ही संस्था देशातील बँकांना उत्तम तंत्रज्ञान व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याचाही प्रयत्न करत असून त्यासाठी IDRBT ने IIT, IIM, NPCI, University of Buffalo, C-DAC ISACA

इत्यादी संस्थांबरोबर सामंजस्य करार (MOU) करून संबंध प्रस्थापित केलेले आहेत.

९) IDRBT ने देशातील विविध बँका व वित्तीय संस्थामधील अधिकारी माहिती तंत्रज्ञान अधिकारी, वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या इत्यादीचे फोरम तयार केलेले असून त्यामधूनही मार्गदर्शन आणि दिशादर्शन करावयाचे कार्य केले जाते. उदा.

* Indian Banks Chief Information Officers Forum.

* Chief Analytics Officers Forum.

* Chief Information Security Officers Forum

* Fin-Tech Forum.

१०) देशातील बँकांना उत्तम तंत्रज्ञानाच्या वापरासाठी मार्गदर्शन करण्याबरोबरच त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकारचे पारितोषिके देऊन प्रोत्साहित करण्याचे कार्यही IDRBT करत आहे.

**१.३ इंटरनेट बँकींग (Internet Banking)**

इंटरनेट बँकींग हा भारतीय बँकींग विश्वासातीलच नव्हे तर जगभरातील बँकींग क्षेत्रातील एक मोठा अविष्कार असून इंटरनेट बँकींगमुळे आज अनेक व्यवहार अत्यंत सुलभ व सोयीस्कर झालेले असल्याचे दिसून येते. प्रस्तुत घटकामध्ये आपण इंटरनेट बँकींग सेवेचे स्वरूप, त्याची व्याप्ती आणि त्याबाबत RBI च्या मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करणार आहोत.

**अ) इंटरनेट बँकींग सेवेचे स्वरूप किंवा अर्थ :**

इंटरनेट बँकींग सेवा म्हणजे अशी व्यवहार पद्धती की ज्यामध्ये बँकींग सेवा देण्यासाठी इंटरनेट आणि इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. Internet Banking is a method of banking in which transactions are conducted electronically via the Internet)

* इंटरनेट बँकींग सेवा इंटरनेटवर आधारीत असते.

* इंटरनेट बँकींग साठी इलेक्ट्रॉनिक उपकरणाचा वापर केला जातो.

* इंटरनेट बँकींग साठी संगणकीय तंत्रज्ञान वापरले जाते.

* इंटरनेट बँकींगलाच E-Banking किंवा Online Banking असेही म्हणतात.

* इंटरनेट बँकींग सेवा ही Self - Service Banking म्हणूनही ओळखली जाते.

**ब) इंटरनेट बँकींग सेवांची व्याप्ती :**

इंटरनेट बँकींग सेवांची व्याप्ती ही प्रामुख्याने पुढील प्रकारामध्ये मांडता येईल.

**१) वेबसाईटद्वारे बँकींग सेवा** : बँकींगसारख्या आपल्या ग्राहकास हवी असणारी माहिती आपल्या

बँकेच्या वेबसाईटवर ठेवतात. तसेच बँकींग ग्राहकास हवे असणारी आवेदनपत्रे अर्ज इत्यादी देखील वेबसाईटवरून उपलब्ध करून देत असतात की ज्यामुळे बँक ग्राहकास घरबसल्या किंवा आपल्या ऑफीसमधून बँकींगची माहिती घेता येते तसेच बँकेशी व्यवहार करता येतात.

**२) ऑनलाईन फंड ट्रान्स्फर :**

पूर्वीच्या काळी पैसे पाठविण्यासाठी बँकेत जाऊन Demand Draft किंवा Mail Transfer करणे आवश्यक होते. मात्र सध्या NEFT, RTGS द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठवता येणे सहज शक्य झाले आहे.

**३) ATM सेवा :**

बँकेच्या खात्यातून पैसे काढण्यासाठी आता बँकेत जाण्याची आवश्यकता नसून त्यासाठी ATM ची सुविधा उपलब्ध झालेली असून तसेच Shared ATM Network द्वारे कोणत्याही बँकेच्या ATM मधून पैसे काढता येणे शक्य झालेले आहे.

**४) EPOS मशिनद्वारे सेवा :**

विविध व्यापारी अस्थापना, दुकाने व विक्रीच्या ठिकाणी वस्तू व सेवा खरेदी केल्यानंतर त्याचे ऑनलाईन किंवा इलेक्ट्रॉनिक पेमेंट करण्यासाठी बँकांना Electronic Point of Scale (EPOS) ची सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याद्वारे कार्ड स्वाईप करून पेमेंट करता येणे शक्य झालेले आहे.

**५) CDM मशीन :**

बँक ग्राहकास आपल्या बँक खात्यामध्ये पैसे भरण्यासाठी म्हणजेच रोख रक्कम भरण्यासाठी देखील आता बँकेत जाण्याची आवश्यकता नसून इंटरनेटद्वारे बँकेस जोडणी असलेल्या Cash Deposit Machine (CDM) द्वारे कोणत्याही ठिकाणाहून आपल्या बँकेच्या खात्यात पैसे भरणे शक्य झालेले आहे.

**६) कोणत्याही शाखेतून सेवा :**

सध्या सर्व बँका आपल्या व्यवहारासाठी कोअर बँकींग प्रणाली वापरत असून Core Banking प्रणालीमुळे एका विशिष्ट बँकेच्या कोणत्याही शाखेतून पैसे काढणे किंवा पैसे भरता येणे, तसेच इतर व्यवहार करता येणे शक्य झालेले आहे यालाच Any Branch Banking ABB असे म्हणतात.

**७) ऑनलाईन आदेश व विनंती :**

इंटरनेट सेवा प्राप्त झाल्यास संबंधीत बँक ग्राहक आपल्या बँकेस सूचना, आदेश किंवा विनंती देण्यासाठी बँकेत जाण्याची आवश्यकता राहिलेली नाही तर संबंधित ग्राहक चेकची मागणी करणे, DD काढणे,पैसे पाठवणे, बिल भरणे, स्टॉप पेमेंट, स्टँडींग इन्स्ट्रक्शन देणे इत्यादी आदेश व सूचना ऑनलाईन पद्धतीने करु शकतो.

### ८) ई – पासबुक व अकाऊंट स्टेटमेंट :

पूर्वीच्या काळी बँकेच्या खाते उतारा घेण्यासाठी किंवा पासबुक अपडेट करुन घेण्यासाठी बँकेत जाण्याची आवश्यकता होती मग सध्या इंटरनेट बँकींगमुळे ग्राहकाच्या ई-मेलवर ई-पासबुक किंवा इलेक्ट्रॉनिक बँक खाते उतारा पाठवून देण्याची सोय झालेली आहे.

### ९) ऑनलाईन अर्ज :

बँकेतील विविध सेवा सुविधा घेण्यासाठी करावयाचे अर्ज सध्या ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आले असून खाते उघडण्याचा अर्ज, विविध प्रकारच्या कर्जाचे अर्ज, पैसे ट्रान्स्फर करण्यासाठीचा विनंती फॉर्म, मुदत ठेवीचा अर्ज इत्यादी अर्ज हे ऑनलाईन भरून ते जमा करण्याची सोय इंटरनेट बँकींग सेवेमुळे शक्य झालेली आहे.

### १०) मोबाईल बँकींग :

मोबाईल बँकींग सेवा ही एक इंटरनेट बँकींग सेवाच असून ती मोबाईल फोनद्वारे दिली जात असल्याने त्यास मोबाईल बँकींग असे म्हटले जाते. यामध्ये इंटरनेट बँकींगमधील काही सेवा व इतर काही माफक व मर्यादित स्वरूपातील सेवा प्रदान केल्या जात असतात.

### क) इंटरनेट बँकींग सेवांबाबत RBI च्या मार्गदर्शक सूचना :

**(RBI's Guidlines for Internet Banking Services)**

भारतीय बँकांमध्ये इंटरनेट बँकींग सेवा प्रदान करण्याबाबत RBI द्वारे वेळोवेळी मार्गदर्शक सूचना जारी केल्या जात असतात. तथापि RBI ने १४ जाने. २००१ रोजी देशातील सर्व सूचित बँकांसाठी व्यापक स्वरूपातील मार्गदर्शक सूचना जारी केल्या त्यास Internet Banking in India - Guidlines-2001 असे म्हटले जाते. त्यानंतर वेळोवेळी यामध्ये सुधारणाही करण्यात आलेल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांमध्ये काही महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

**१) तंत्रज्ञान आणि सुरक्षा प्रमाणके : (Technology and Security Standard)**

* बँकेने इंटरनेट बँकींग सेवेसाठी नेटवर्क व डेटाबेस अ‍ॅडमिनिस्ट्रेटरची नेमणूक करणे आवश्यक आहे.
* बँकेने आपल्या संचालक महामंडळामध्ये इंटरनेट बँकींग सिक्युरीटी पॉलिसी मंजूर करुन घेऊन त्यासाठी सेक्युरिटी ऑफीसरची नियुक्ती करणे आवश्यक आहे.
* इंटरनेट बँकींग सेवेसाठी बसवण्यात आलेल्या यंत्रणेचे Information and System Audit करुन घेणे आवश्यक आहे.
* इंटरनेट बँकींग सेवेसाठी तार्कीक स्वरूपाची ओळख यंत्रणा निर्माण करुन त्यासाठी पीन, पासवर्ड, स्मार्ट कार्ड, बायोमेट्रीक इत्यादीचा वापर करावा.

* बँकेने आपल्याकडे Poxy Server System आणि Firewall वापराव्यात की जेणेकरून बँकेची सिस्टीम थेट इंटरनेटला कनेक्ट होणार नाही.

* इंटरनेट बँकींग साठी बँकांना Real Time Security Alerts बसवून घेणे आवश्यक आहे.

* बँकेच्या सर्व डायलप सिस्टीम ॲप्लिकेशन सर्व्हरपासून स्वतंत्रपणे कार्य करणाऱ्या असतात त्या मुख्य सर्व्हरला अडथळा निर्माण करणाऱ्या नसाव्यात.

* प्रत्येक बँकेने विशिष्ट प्रकारचे डेटा सेंटर आणि डिझास्टर रिकव्हरी साईट (DC and DR Site) निर्माण करून घ्याव्यात.

* बँकेचे Public Key Insfrastructure (PKI) हे बाजारातील प्रचिलित तंत्रज्ञानास मॅच करणारे असावे.

* इतर नेटवर्कच्या यंत्रणा कनेक्ट झाल्याने अडथळा व धोके निर्माण होऊ नयेत यासाठी Firewall System आणि Secured Socket Layer - SSL तंत्रज्ञानाचा वापर करावा.

* बँकेचा ई-मेल सर्व्हर आणि File Transfer Protocall - FTT Server, Telnet इत्यादी इंटरनेट बँकींग सर्व्हर पासून अलिप्त ठेवावा.

* बँकेच्या सर्व्हरमध्ये यशस्वी किंवा अयशस्वी लॉग इन करणाऱ्या सर्व इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसचे ट्रॅक रेकॉर्ड आणि फॉलो ॲप घेण्याची व्यवस्था असावी.

* बँकेच्या सिस्टीम ऑफीसर आणि ऑडीटरने कालांतराने पासवर्डचा अंदाज घेणे, क्रॉस चेकींग, बँक डोअर प्रोग्रॅम चेक, अटॅक, व्होअरलोडींग ॲप्लिकेशन इत्यादीची पडताळणी करुन घ्यावी.

* बँकेकडे नियमितपणे डेटा बँक - अप घेण्याची यंत्रणा असावी त्याचे Encryption आणि Decryption ची सोय असावी व इतर आवश्यक खबरदारी घेतलेली असावी.

**२) वैधानिक बाबी (Legal Issues) :**

* बँकेची इंटरनेट बँकींग सेवा वापरणाऱ्या ग्राहकाची ओळख पटवण्याची वैधानिक यंत्रणा प्रस्थापित केलेली असावी.

* बँक ग्राहकाची ओळख पटवण्याबरोबरच त्याचा प्रामाणिकपणा आणि त्याची प्रतिक्षा या बाबीची खातरजमा करुन घेण्याची व्यवस्था IT सुविधांमध्ये असावी.

* ऑनलाईन सेवा प्रदान करण्यापूर्वी संबंधित बँक ग्राहकाची आवश्यकतेनुसार वास्तविक तपासणी व आवश्यकतेनुसार पुर्नपडताळणी करण्याची व्यवस्था निर्माण केलेली असावी.

* माहिती तंत्रज्ञान कायदा -२००० मधील सेक्शन ३ (२) मधील तरतुदीनुसार पडताळणी यंत्रणा (Authentication System) कार्यान्वित केलेली असावी.

* इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवून ठेवलेली ग्राहकाची व त्याच्या खात्याबाबतची माहिती गोपनीय ठेवण्याबाबतची पूर्ण व्यवस्था करण्यात आलेली असावी.

* इंटरनेट बँकींग सेवेमध्ये स्टॉप पेमेंट सेवा देण्यांवर अनेक मर्यादा असल्याने त्याबाबतचा कालावधी आणि मर्यादाची ग्राहकांना स्पष्ट सूचना देणे आवश्यक असते.

* इंटरनेट बँकींग सेवा प्रदान करतेवेळी निर्माण होणाऱ्या धोक्याबाबत ग्राहकांना कल्पना देऊन त्याबाबत करार करुन घेणे आवश्यक असते. त्यामध्ये अधिकार आणि जबाबदाऱ्या या दोहोचा उल्लेख केलेला असावा.

**३) नियंत्रणात्मक आणि पर्यवेक्षणात्मक बाबी : (Regulatory and Supervisory Issues)**

* भारतात इंटरनेट बँकींग सेवा प्रदान करण्यासाठी संबंधित बँक भारतात वस्तुस्थितीमध्ये अस्तित्वात असणे (Physical Presence) आवश्यक असून तिला RBI ने परवाना दिलेला असणे आवश्यक आहे.

* इंटरनेट बँकींगच्या सेवा ह्या बँकेतील खातेदारांपुरत्याच मर्यादित असणे आवश्यक आहे.

* इंटरनेट बँकींग सेवेमध्ये केवळ भारतीय चलनामध्ये प्रदर्शित अथवा रुपांतरित होणाऱ्या बँकींग सेवांचाच समावेश करणे आवश्यक आहे.

* भारतीय बँका व भारतातील विदेशी बँकांमधील FEMA कायद्यातील तरतुदीनुसार होणाऱ्या व्यवहाराव्यतिरिक्त इतर इंटरनेट बँकींग सेवा RBI च्या परवानगी खेरीज देण्यात येऊ नयेत.

* भारतातील बँका परदेशात बँकींग व्यवसाय करण्यासाठी गेल्यास त्या देशातील ग्राहकांना इंटरनेट बँकींग सेवा देऊ शकतात तथापि त्यांना त्या देशातील आणि आपल्या देशातील नियमावलीच्या अधिन राहून सेवा द्याव्या लागतील.

* भारतात कोणत्याही बँकेस RBI च्या पूर्वपरवानगीशिवाय ट्रॅन्झॅक्शनल इंटरनेट बँकींग सेवा सुरू करता येणार नाही.

* बँक थर्ड पार्टीच्या मदतीने इंटरनेट बँकींग सेवा देत असल्यास माहितीच्या गोपनियतेचा (Data Confidentiality) करार करणे आवश्यक असते.

* इंटरनेट बँकींग सेवेमध्ये ऑनलाईन पेमेंटसाठी म्हणजेच पेमेंट गेट वे कडे कनेक्टीव्हीटी देण्यासाठी अत्यंत सुरक्षित Data Interface तंत्रज्ञान वापरणे आवश्यक असते.

या व्यतिरिक्त बँकांनी RBI ने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे आवश्यक असते.

**४) सहकारी बँकांसाठी इंटरनेट बँकींगचे नियम :**

देशातील राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि नागरी सहकारी बँकांना

इंटरनेट बँकींग सेवा प्रदान करावयाच्या असल्यास त्या दोन प्रकारात देता येतात. त्यासाठी पुढील सेवा, अटी, नियम असतात.

**✲ इंटरनेट बँकींग – व्यूव्ह ओन्ली फॅसिलिटी :**

बँकींग संस्था जेव्हा आपल्या ग्राहकास आपले खाते आणि खाते व्यवहार ऑनलाईन पाहण्याची सुविधा देते तेव्हा त्यास View Only Internet Facility असे म्हणतात.

अ) व्यूव्ह ओन्ली इंटरनेट बँकींगसाठी RBI च्या परवानगीची आवश्यकता नसते.

ब) यासाठी कोअर बँकींग प्रणाली कार्यान्वित असणे गरजेचे असते.

क) यामध्ये कोणतेही वित्तीय व्यवहार करण्याची परवानगी नसते.

ड) ही सुविधा सुरु केल्यास एक महिन्याच्या आत RBI ला कळविणे आवश्यक असते.

**✲ इंटरनेट बँकींग – व्यवहार सुविधा :**

इंटरनेट बँकींग सेवांद्वारे जेव्हा पैशाची देवाण-घेवाण करता येते तेव्हा त्यास Transactional Internet Banking असे म्हणतात यासाठी पुढील अटीची पूर्तता करावी लागते.

अ) बँकेच्या Capital to Risk Asset Ratio -CRAR हा १०% पेक्षा कमी असू नये.

ब) बँकेची भांडवली उलाढाल ५० कोटी रु. किंवा अधिक असावी.

क) बँकेचा स्थुल NPA ७% आणि निव्वळ NPA ३% पेक्षा अधिक नसावा.

ड) सलग तीन वर्षे बँकेस निव्वळ नफा झालेला असावा.

ई) बँकेने SLR व CRR ने नियम मोडलेले नसावेत.

फ) बँक नियमाप्रमाणे कार्य करीत असावी तसेच बँकेच्या संचालक मंडळावर दोन व्यावसायिक डायरेक्टर असावेत.

## १.४ मोबाईल बँकींग : (Mobile Banking)

भारतातील बँकांमध्ये मोबाईल बँकींग सेवा अधिकृत रित्या सन २००८ पासून सुरु करण्यात आलेल्या असून काळाच्या ओघात त्यामध्ये नानाविध प्रकारचे बदलही झाल्याचे दिसून येते. प्रस्तूत उपघटकामध्ये आपण भारतातील मोबाईल बँकींग सेवाचे स्वरूप, व्याप्ती, विविध प्रकारचे मोबाईल ॲप्स आणि मोबाईल बँकींग सेवेबाबत RBI ने दिलेल्या महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास करणार आहोत.

### अ) मोबाईल बँकींगचा अर्थ व स्वरूप :

विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक बँकींग सेवा वापरण्यासाठी जेव्हा मोबाईल फोन (Cellular Phone) चा वापर केला जातो तेव्हा त्यास मोबाईल बँकींग सेवा असे म्हणतात. (Mobile Banking Referes

to internet based facility provided by banks that enables the customers to execute bank transactions via Cellular Phone.)

* मोबाईल बँकींग सेवा मोबाईल फोनमधून वापरल्या जातात.

* या सेवा मोबाईलमधील Wireless Application Protocall (WAP), GPRS, 3G, 4G इत्यादीद्वारे वापरता येतात.

* मोबाईल बँकींग सेवाचा वापर Short Massaging Services - SMS द्वारेही वापरता येतात.

* इंटरनेट शिवाय मोबाईल बँकींग सेवा वापरण्यासाठी Unstructured Supplementry Service Data (USSD) तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

* मोबाईल बँकींगसाठी विविध प्रकारचे ॲप्लिकेशन्स वापरली जातात.

**ब) मोबाईल बँकींग सेवांची व्याप्ती :**

मोबाईल बँकींग सेवा ही इंटरनेट पॅकंग सेवेप्रमाणेच सेवा असून या सेवेमध्ये इंटरनेट बँकींग मधील काही सेवांबरोबरच इतरही काही अधिकच्या सेवा उपलब्ध असतात त्याची व्याप्ती पुढीलप्रमाणे आहे.

* बँकेच्या खात्यात प्रवेश करणे व पाहणे.
* बँक खात्याचा खाते उतारा किंवा शेवटचे व्यवहार पाहणे.
* इलेक्ट्रॉनिक पासबुक डाऊनलोड करणे.
* ऑनलाईन पेमेंट करणे फंड ट्रान्स्फर करणे.
* खात्यातील शिल्लक रक्कम तपासणे.
* ऑनलाईन बिल पेमेंट, टॅक्स पेमेंट करणे.
* ATM लोकेटवर आणि ब्रँच लोकेटद्वारे शोध घेणे.
* फंड ट्रान्स्फरसाठी लाभार्थी ॲड करणे, काढून टाकणे.
* बँकेस कायम सूचना/आदेश देणे (Standing Orders)
* चेकबुक किंवा डीडी ची मागणी करणे.
* दिलेल्या चेकसाठी स्टॉप पेमेंट आदेश देणे.
* मोबाईल बँकिंग ॲपद्वारे विविध व्यवहार करणे.
* मोबाईल, डिश रिचार्ज किंवा देणगी देणे.
* एम् पीन (M-PIN) किंवा पासवर्ड बदलणे.

* विविध प्रकारच्या गुंतवणूक खात्यात पैसे गुंतवणे.
* विविध प्रकारच्या इतर मुल्यवर्धीत सेवा वापरणे.

**क) मोबाईल बँकींग ॲप्लिकेशन्स : (Mobile Banking Application)**

भारतातील विविध बँका, वित्तीय संस्था आणि बिगर बँकींग वित्तीय संस्था, बिगर वित्तीय संस्थांनी आपल्या व्यवहारासाठी अनेक विविध प्रकारचे मोबाईल बँकींग ॲप्लिकेशन्स सुरु केलेली आहेत. त्यामधील काही महत्त्वाची मोबाईल बँकींग ॲप्लिकेशन्स पुढीलप्रमाणे आहेत.

**युनिव्हर्सल मोबाईल ॲप्स :**

* भिम ॲप : (BHIM APP)
* पे.टी.एम् : (Paytm APP)
* फोन - पे : (Phone Pe APP)
* गुगल पे : (Google Pay APP)
* पे-विझ : (Pay Wiz APP)
* ट्रू - पे : (True Pay APP)

**विविध बँकांची मोबाईल ॲप्स**

* महा सेक्युअर - (Maha Secure)
* आय मोबाईल - (i Mobile)
* एम्-कनेक्ट - (M-Connect)
* योनो - (YONO)
* ॲक्सीस मोबाईल - (Axis Mobile)
* इंन्डस् मोबाईल - (Indus Mobile)
* यु - मोबाईल - (U Mobile)
* इन्ड - पे - (Ind Pay)
* सेंट - मोबाईल - (Cent Mobile)

**इतर सर्वसामान्य मोबाईल ॲप्स :**

* Pay Pal Mobile Cash

* Jio Money Wallet
* Airtel Payment
* LIC Pay Direct
* Bharat Pay for Merchents
* Fino B- Pay
* Eazy Pay
* Pay Unow
* Easy Pay
* Mi Pay

वरील विविध प्रकारचे मोबाईल बँकींग ॲप्लिकेशन्स उपलब्ध करून काही ॲप्स सर्व बँकांसाठी वापरता येतात तर काही ॲप्स विशिष्ठ बँकांसाठीच तयार करण्यात आलेली आहेत. त्यामुळे ती ॲप्स फक्त त्या बँकेच्याच मोबाईल बँकींग सेवेसाठी वापरता येतात. तसेच विविध प्रकारचे वित्तीय संस्था, व्यापारी स्थापना इत्यादींनी सुरु केलेली ॲप्स ही वैयक्तिकरित्या वापरता येतात. तसेच त्याचा मनी वॉलेट सारखा वापर करता येतो.

**ड) मोबाईल बँकींग सेवांबाबत RBI च्या मार्गदर्शक सूचना :**

**(RBI's Guidlines for Mobile Banking Services)**

भारतात मोबाईल बँकींग सेवेबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेने सर्वप्रथम ०८ ऑक्टोबर २००८ मध्ये मार्गदर्शक सूचना जारी केल्या त्यानंतर सन २००९, २०११, २०१४, २०१५, २०१७ मध्ये त्यामध्ये वेळोवेळी आवश्यक त्या सुधारणा केल्या. त्यामधील महत्त्वाच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

१) भारतात अस्तित्त्वात असलेल्या आणि RBI ने परवानगी दिलेल्या बँकेलाच मोबाईल बँकींग सेवा सुरु करता येतात. तसेच त्यांनी आपल्याकडे कोअर बँकींग सेवा कार्यान्वित केलेली असणे आवश्यक असते.

२) मोबाईल बँकींग सेवा ही केवळ आपल्या बँकेच्या खातेदारास, क्रेडीट किंवा डेबीट कार्ड धारकासच देता येते.

३) मोबाईल बँकींग द्वारे फक्त भारतीय चलनातील व्यवहारच करता येतात.

४) मोबाईल बँकींग सेवेकरीता बँकेने KYC अँटी मनी लॉन्डरींग याबाबतची आवश्यक ती पूर्तता केलेली असावी.

५) ग्राहकांना मोबाईल बँकींग सेवेसाठी नोंदणी करण्याची व्यवस्था सोईस्कर तथापि सुरक्षित असावी.

६) मोबाईल बँकींगसाठी M-PIN जनरेट करण्याची सुविधा ATM, मोबाईल ॲप्स व शाखेतून उपलब्ध करुन द्यावी.

७) मोबाईल बँकींग तंत्रज्ञानामधील Confidentialitiy, Intergreaty and Non-Repudiability ची खात्री करून घेणे आवश्यक असते.

८) बँकांनी ५००० रुपये पर्यंतचे व्यवहार वगळता इतर मोठ्या व्यवहारासाठी End-To-End Encryption ची सुविधा देणे अत्यावश्यक असते.

९) बँकांच्या मोबाईल बँकींग सेवेचे तंत्रज्ञान देशातील सर्व मोबाईल नेटवर्क ऑपरेटरच्या यंत्रणा आणि तंत्रज्ञानाबरोबर साधर्म्य साधणाऱ्या असाव्यात.

१०) मोबाईल बँकींग फंड ट्रान्स्फर मधील मेसेज किंवा डेटा एका मोबाईल ऑपरेटरकडून दुसऱ्या ऑपरेटरकडे आणि एका बँकेकडून दुसऱ्या बँकेकडे जात असल्यास त्यामधील डेटा ट्रान्स्फरचे साधर्म्य निर्माण करून घेणे आवश्यक असते.

११) बँकांनी आपली मोबाईल बँकींग यंत्रणा २४ × ७ म्हणजे सदासर्वकाळ सुरु ठेवणे आवश्यक असते.

१२) मोबाईल बँकींगद्वारे खरेदीसाठी उच्चत्तम मर्यादा ठेवू नये मात्र फंड ट्रान्स्फरसाठी आपल्या धोरणाप्रमाणे प्रति व्यवहार उच्चत्तम मर्यादा निर्धारित करु शकतात.

१३) बँकेने आपले मोबाईल बँकींग धोरण संचालक मंडळामध्ये मंजूर करून त्याची अंमलबजावणी करणं आवश्यक असते.

१४) नवीन बँक ग्राहकाच्या खाते उघडण्याच्या फॉर्ममध्ये मोबाईल बँकींगचा पर्याय द्यावा, जुन्या ग्राहकाला मागणीनुसार ही सेवा देण्याची व्यवस्था असावी.

१५) मोबाईल बँकींगमधील डेबीट व्यवहार (Debit Entry) साठी दुहेरी सुरक्षा कि (Two Factor Authentication)असावे.

१६) इंटरनेट बँकींगप्रमाणे सर्व तांत्रिक नियमाची पूर्तता करुन घेणे आवश्यक आहे तथापि किमान वर्षातून एकदा मोबाईल बँकींग सेवेची Security Vulunerablity Test घ्यावी.

१७) मोबाईल बँकींग धारकास स्वतंत्र मोबाईल बँकींग ID व पासवर्ड द्यावा तो इंटरनेट बँकींगप्रमाणे नसावा.

वरील विविध सूचनांबरोबरच इंटरनेट बँकींगसाठी घ्यावी लागणारी सर्व प्रकारची काळजी बँकेने घेणे आवश्यक असते.

## १.५ इलेक्ट्रॉनिक समाशोधन : (Electronic Clearing)

ई-बँकींग सेवांमध्ये अलिकडील काळात विविध प्रकारच्या अत्याधुनिक सेवा सुविधा सुरु करण्यात बँकांना यश आलेले असून आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करुन ग्राहकांना अधिक दर्जेदार व उत्तम समाशोधन व फंड ट्रान्स्फरच्या सेवा देण्याचा प्रयत्न बँकींग संस्थांद्वारे केला जात आहे. परिणामी पैशाची इलेक्ट्रॉनिक देवाण-घेवाण करण्यासाठी विविध प्रकारच्या पद्धती उपलब्ध झालेल्या आहेत. त्यामधील काही महत्त्वाच्या पद्धती व सुविधांचा अभ्यास आपण या सदरामध्ये करणार आहोत.

### अ) इलेक्ट्रॉनिक समाशोधन सुविधा : (Electronic Clearing Service - ECS)

इलेक्ट्रॉनिक समाशोधन ही एक वारंवार कराव्या लागणाऱ्या देयकाची अंमलबजावणी करण्यासाठीची तसेच मोठ्या रकमेची आणि संख्येने अधिक असणाऱ्या देयकाची कार्यवाही करण्याची स्वयंचलित पद्धती असून कामगाराचे पगार जमा करणे, भागधारकांचा लाभांश वाटप करणे, पेन्शनधारकाची पेन्शन अदा करणे इत्यादी प्रकारच्या मोठ्या देयकाची (Bulk Payments) अंमलबजावणी करण्यसाठी या सुविधेचा वापर केला जातो. भारतात ESC सेवा १९९० च्या दशकात सुरु झालेली असली तरी संपूर्ण भारतात ही सेवा National Electronic Clearing Service - NECS या नावाने सप्टेंबर २००८ पासून सुरु झाली.

* ECS मध्ये ECS-Credit आणि ECS-Debit अशा दोन प्रणाली आहेत.
* ECS प्रणाली National Automated Cleaning House - NACH द्वारे चालवली जाते.
* ECS चे सर्व नियंत्रण National Payment Corporation of India (NPCI) कडे आहे.
* ECS द्वारे केवळ भारतातील बँक शाखांमध्येच पैसे दिले घातले जातात.
* ECS क्लिअरिंग ही स्वयंचलित समाशोधन प्रणाली असून ती कोअर बँकींग तंत्रज्ञानावर आधारित असते.
* ECS क्लिअरिंग हे MICR कोडच्या आधारे होत असते.

**ECS - Credit Sheme :**

ECS क्रेडीट म्हणजे एका संस्थेच्या खात्यातून एकाचवेळी अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे ट्रान्सफर करण्याची सेवा होय. उदा. एखाद्या कारखान्यातील कामगारांचे मासिक वेतन स्वयंचलित पद्धतीने करण्यासाठी ECS-Credit सुविधेचा वापर केला जातो. या पद्धतीत लाभार्थ्याचे नाव, बँक, शाखा, खाते नंबर, MICR कोड, रक्कम आणि ट्रान्स्फर करावयाची तारीख ही माहिती दिली असता बँकेची यंत्रणा त्याप्रमाणे पेमेंट करते.

**ECS - Debit Sheme :**

ECS डेबीट सुविधा ही पेमेंट वसूल करण्याबाबतची इलेक्ट्रॉनिक सुविधा असून यामध्ये वापरकर्ती संस्था आपणास येणी असणारे बिल, चार्जेस, फी, हप्ते, कररक्कम, प्रिमियम इत्यादीची स्वयंचलित पद्धतीने वसुली करून आपल्या खात्यात जमा करुन घेण्यासाठी ही सुविधा वापरतात. त्यासाठी संबंधित संस्थेस आपली नोंदणी ECS सेंटरला करावी लागते व संबंधित खात्याची आवश्यक माहिती पेमेंट करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेस द्यावी लागते. त्यानुसार ECS सिस्टमद्वारे देयक देणाऱ्या व्यक्तीचे खाते आपसुकपणे डेबीट करुन लाभार्थी संस्थेचे खाते क्रेडीट करते.

थोडक्यात एका खात्यातून अनेक खात्यात रक्कम स्वयंचलित पद्धतीने पाठवण्यासाठी ECS - Credit ही सुविधा असून विविध खात्यातून रक्कम गोळा करून एका विशिष्ट खात्यात जमा करून घेण्यासाठी ECS - Debit ही सुविधा उपलब्ध आहे.

**ब) तात्काळ प्रदान सेवा (Immediate Payment Service)**

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने निधीची देवाण घेवाण करण्यासाठी NEFT, RTGS तसेच ESC अशा विविध पद्धती उपलब्ध असल्या तरी या सेवेला वेळ आणि कालावधीचे निर्बंध होते. कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतर व्यवहार करता येणे शक्य नव्हते म्हणून देशातील विविध राष्ट्रीयकृत बँका व खाजगी बँकांनी २२ नोव्हेंबर २०१० मध्ये RBI च्या तत्कालिन डेप्युटी गव्हर्नर श्रीमती शामला गोपीनाथ यांच्या हस्ते ही सुविधा सुरु केलेली आहे. त्यास Immediate Payment Service म्हणजेच IMPS असे म्हणतात.

* IMPS सुविधा National Payment Corporation of India (NPCI) द्वारे चालवली जाते.

* IMPS ही तात्काळ पैसे पाठवण्याची सुविधा असून या सुविधेद्वारे जलद पैसे पाठवता येतात ही सेवा मोफत असते.

* IMPS सेवा देशातील बँका आणि प्रिपेड पेमेंट इश्युअर (PPI)याच्याद्वारे दिल्या जातात.

* ही सुविधा सदासर्वकाळ 24×7×364 सुरु असते. सुट्टीच्या दिवशीही ही सेवा कार्यरत असते.

* मोबाईल हप्ते IMPS सेवा वापरण्यासाठी Mobile Money Identifier (MMID) बँकेकडून घेणे आवश्यक असते.

* IMPS द्वारे पैसे पाठवण्यासाठी MMID, M-PIN तसेच लाभार्थी व्यक्ती, संस्थेचे बँक खात्याचा तपशील वापरावा लागतो.

* पैसे पाठवण्याकरीता IMPS मध्ये पुढील पर्याय असतात.

- पर्याय - १ मोबाईल नंबर आणि MMID
- पर्याय - २ बँक खाते नंबर आणि IFSC

- पर्याय - ३ खातेदाराचा आधार नंबर

सध्या देशातील विविध प्रकारच्या बँका व वित्तीय संस्था आपल्या ग्राहकांसाठी IMPS ची सुविधा उपलब्ध करून देत आहेत. यामध्ये प्रामुख्याने ऑगस्ट २०१९ अखेर पुढील बँकांचा समावेश आहे.

- सहकारी बँका - ३६१ बँका
- प्रादेशिक ग्रामीण बँका - ४५
- प्रिपेड पेमेंट इश्युअर - २६ संस्था
- पेमेंट बँका - ०६ बँका
- स्मॉल फायनान्स बँका - १० बँका
- व्यापारी बँका - ५० बँका

(संदर्भ NPCI २०१९)

**क) राष्ट्रीय स्वयंचलित समाशोधन गृह**

**(National Automated Clearing House - NACH)**

राष्ट्रीय स्वयंचलित समाशोधन गृह (NACH) ही नॅशनल पेमेंट कॉर्पोरेटशन ऑफ इंडिया (NPCI) द्वारे चालवली जाणारी स्वयंचलित आदान-प्रदान पद्धती असून त्यामध्ये एका बँकेच्या ग्राहकाने दुसऱ्या बँकेच्या ग्राहकासाठी पाठवलेल्या प्रदानाचे देयक देण्यासाठी ही यंत्रणा काम करते.

* NACH ही मोठ्या रकमेच्या समाशोधनाची अंतरबँक समाशोधन सुविधा आहे. तिचा वापर अंतरबँक अदान-प्रदानाची परिपूर्ती करण्यासाठी केला जातो.

* NACH मध्ये NACH-Debit आणि NACH-Credit सेटलमेंट अशा दोन प्रकारचे व्यवहार असतात.

* NACH चा वापर बँका, वित्तीय संस्था, कार्पोरेट कंपन्या आणि शासनास बल्क पेमेंट (Bulk Payments) करण्यासाठी होतो. ही पद्धती ECS-Debit and ECS-Credit क्लिअरिंग साठी काम करते.

* NACH ही ECS मधील विविध व्यवहाराचे बँकेनुसार एकत्रिकरण (Consodition) करुन व्यवहाराची परीपूर्ती करण्याचे कार्य करते.

* शासकीय यंत्रणेस अनुदान वाटप आणि इतर देयके देण्यासाठी Aadhar Payment Bridge-APBसाठी नेटवर्क आणि समाशोधन सुविधा उपलब्ध करुन देते.

* NACH चे संपूर्ण व्यवस्थापन व नियंत्रण NPCI या संस्थेद्वारे केले जाते.

* NACH व्यवहारामध्ये रक्कम पाठवणारा, रक्कम पाठवणाऱ्याची बँक, लाभार्थी व लाभार्थ्याच्या बँकेबरोबरच NACH हा मध्यस्थ असतो.

* NACH साठी ग्राहकाकडून Mandate किंवा e-mandate घेतले जाते. त्यातील माहितीच्या आधारे सर्व व्यवहार पूर्ण केले जातात.

**ड) चेक ट्रंकेशन सेवा (Cheque Trancation Service - CTS)**

चेक ट्रंकेशन ही ग्राहकाने वटवणूकीसाठी बँकेकडे दिलेल्या चेकची जलद वटवणूक करण्यासाठीची अतिजलद सुविधा असून भारतात सन २००८ मध्ये दिल्ली शहरात CTS पायलट प्रोजेक्ट राबवण्यात आल्यानंतर सन २०१३ सन पासून CTS प्रकल्प संपूर्ण भारतातील समाशोधन गृहामध्ये राबवला जात आहे.

CTS सेवेचा अर्थ : बँक ग्राहकाने वटवणूकीसाठी दिलेला धनादेश किंवा चेक वटवणूकीसाठी प्रदायी बँकेकडे प्रत्यक्षात न पाठवता संबंधित धनादेशाची डिजिटल इमेज (Truncated Cheque) पाठवून चेकचे पैसे वसूल करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या सेवेस CTS सेवा असे म्हणतात. थोडक्यात यामध्ये फिजिकल चेक ऐवजी डिजिटल इमेजचा वापर केला जातो.

१) CTS ग्रीड - संपूर्ण भारतात CTS चेक क्लिअरिंग सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या यंत्रणेचे तीन विभागात वर्गिकरण केलेले असून त्यास CTS ग्रीड असे म्हणतात.

* नवी दिल्ली ग्रीड

* मुंबई ग्रीड

* चेन्नई ग्रीड

२) CTS ग्रीडची मेंबरशीप CTS सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी व त्याचा लाभ आपल्या ग्राहकांना देण्यासाठी संबंधित बँकेने CTS ग्रीडचे सभासदत्व घेणे आवश्यक असते. हे सभासदत्व चार प्रकारचे असते.

* प्रत्यक्ष सभासदत्व - (Direct Membership)

* अप्रत्यक्ष सभासदत्व - (Indirect Membership)

* उप सभासदत्व - (Sub Membership)

* सर्व्हीस ब्यूरो- (Service Bureau)

३) CTS स्टँडर्ड २०१० - CTS सुविधेसाठी बँकेने आपल्या ग्राहकास RBI ने विहीत केलेल्या CTS- Standard 2010 नुसार छपाई व वैशिष्ट्ये असणारे चेकबुक प्रदान करणे आवश्यक असते. त्यामध्ये अल्ट्रा व्हायलेट डल कागद, CTS-INDIA शब्द, VOID Pantograph, Bank Logo, IFSC, खाते नंबर, खातेदाराचे इत्यादी बाबी असाव्यात.

**CTS चेक प्रोसेसिंग व वटवणूक प्रक्रिया**

१) बँकेकडे वटवण्यासाठी चेक MICR चेक स्कॅनिंग मशीनखाली स्कॅनिंग करुन त्याची डिजीटल इमेज तयार केली जाते.

२) डिजीटल इमेज बँक आपल्या क्लिअरिंग सेंटरला पाठवते क्लिअरिंग सेंटरद्वारे ही इमेज प्रदायी बँकेकडे तपासणी व स्वीकारार्हते (Acceptance) साठी पाठवली जाते.

३) प्रदायी बँक चेक वैद्य असल्याची खात्री करून क्लिअरिंग सेंटरला ॲक्सेप्टन्स / होकार देते. त्यानुसार क्लिअरिंग सेंटर प्रदायी बँकेचे खाते डेबीट Debit करुन वसुली बँकेचे खाते क्रेडीट Credit करते.

४) वसुली बँकेचे खाते क्रेडीट झाल्याप्रमाणे वसुली बँक आपल्या खातेदाराचे खाते तेवढ्या रकमेने क्रेडीट करते.

CTS चेक प्रोसेसिंगमुळे चेकचे वर्गिकरण्याचा त्रास तसेच तो चेक वटवणूक गृहामध्ये घेऊन जाण्याचा त्रास कमी होऊन चेकची जलद वटवणूक होण्यासाठी त्याची खूप मोठी मदत झालेली असून CTS मध्ये T+1 म्हणजेच ट्रॅन्झॅक्शन डे + वन डे मध्ये खातेदाराच्या चेकचे पैसे त्याच्या खात्यावर जमा होतात त्यामुळे चेक वटवणूकीची गती व कार्यक्षमता वाढल्याचे दिसून येते.

**ई) भारत देयक प्रदान प्रणाली (Bharat Bill Payment System)**

विविध प्रकारची देयके, फी, अथवा येणी-देणी भागवण्यासाठी एक समन्वीत यंत्रणा (Intergreated System) सुरु करण्याच्या उद्देशाने National Payment Corpration of India (NPCI) ने सन २०१३ मध्ये Bharat Bill Payment System (BBPS) शोधून काढली प्रत्यक्षात भारतात ही यंत्रणा २०१६ पासून सुरू करण्यात आली. BBPS ही ऑनलाईन पेमेंट करण्यासाठी खाजगी पेमेंट गेटवे वापरण्याऐवजी तसेच विविध प्रकारचे पेमेंट गेट-वे वापरण्याऐवजी एकच समन्वीत स्वरूपाचे पेमेंट गेट-वे उपलब्ध करुन देण्याचे कार्य करते. तसेच एक खात्रीशीर पेमेंट गेट वे उपलब्ध करुन देण्यासाठी NPCI ने BBPS ही सुविधा सुरु केलेली आहे.

* BBPS ही One Stop बिल पेमेंट सुविधा आहे. याचा वापर बँका व वित्तीय संस्थांबरोबरच इतर व्यापारी अस्थापनादेखील करू शकतात.

* BBPS ही बहुचलित पेमेंट पद्धती असून विविध प्रकारची पेमेंट करण्यासाठी याचा उपयोग करता येतो.

* BBPS द्वारे वीजबिल, फोन बिल, DTH रिचार्ज, फोन रिचार्ज, शाळा महाविद्यालयाची फी, इत्यादी पेमेंट करता येतात.

* BBPS सेवा मोबाईल बँकींग, इंटरनेट बँकींग, POS मशीन, मोबाईल वॉलेटस्, ATM, बिझनेस करस्पाँडन्टस्च्या माध्यमातून वापरता येते.

* BBPS मध्ये RBI ने NPCI ला BBPS Unit म्हणून मान्यता दिलेली असून ही यंत्रणा हाताळण्याचे व त्याचे व्यवस्थापन करण्याचे कार्य NPCI करते.

**फ) NEFT व RTGS**

भारतीय बँकींग व्यवसायामध्ये इलेक्ट्रॉनिक आदान-प्रदान करण्यासाठी पहिली व्यवस्था म्हणून सन २००५ मध्ये RBI National Electronic Fund Transfer (NEFT) आणि Real Time Gross Settelment (RTGS) या दोन महत्त्वाच्या फंड ट्रान्स्फर प्रणाली सुरु केल्या. देशभरातील विविध बँका या सुविधाचा लाभ आपल्या ग्राहकांना उपलब्ध करुन देत आहेत.

**NEFT** - ही भारतातील किरकोळ रकमेची इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर सिस्टीम असून या सुविधेद्वारे २ लाख रु. पर्यंतची रक्कम पाठवण्याची सुविधा असते.

**RTGS** ही भारतातील मोठ्या रकमेसाठी इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्स्फर करण्याची सुविधा कअसून त्यास Large Value Payment System असे म्हणतात. याद्वारे २ लाख रु. पेक्षा अधिकची रक्कम पाठवता येते.

NEFT व RTGS द्वारे पैसे पाठवण्यासाठी लाभार्थीची पुढील माहिती आवश्यक असते.

खातेदाराचे नाव :

खातेदाराच्या बँकेचे व शाखेचे नाव

बँक शाखेचा IFSC

खातेदारांचा खातेनंबर व प्रकार

* IFSC हा असतो तो Indian Financial System Code दिलेला विशिष्ट कोड असतो तो 11 डिजीटचा अल्फा न्युमरिक (Alphanumric) कोड असतो.

* NEFT व RTGS द्वारे रक्कम पाठवण्यासाठी पाठवणाऱ्या व्यक्तीने देखील बँक खाते असणे आवश्यक असते.

* या सुविधेद्वारे फक्त भारतातील बँक शाखामध्येच पैसे पाठवता येतात तथापि NEFT मधील Indo-Nepal Remittance Scheme अंतर्गत नेपाळमध्ये रक्कम पाठवता येते.

* ऑगस्ट २०१९ पर्यंत NEFT आणि RTGS मधील इनवर्ड ट्रॅन्झॅक्शन फ्री आणि आऊटवर्ड ट्रॅन्झॅक्शन पेड होते मात्र सध्या RBI ने या सेवेवरील शुल्क काढून टाकणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

* NEFT मधील व्यवहार दर-एक तासाच्या अंतराने सेटल होत असतात तर RBI मधील व्यवहार तात्काळ सेटल होत असतात.

* NEFT व्यवहारासाठी Net Settelment Basis वर होतात तर RTGS चे व्यवहार Gross Settelment Basis वर होतात.

* NEFT व RTGS व्यवहारासाठी सध्या बँकेने ठरवून दिलेल्या निर्धारीत वेळेमध्येच व्यवहार करता येतात म्हणजेच वेळेनंतर किंवा सुट्टीच्या दिवशी व्यवहार करता येत नाहीत. तथापि सेवा सदासर्वकाळ सुरु करण्याबाबत RBI विचार करत आहे.

**ग) SWIFT ट्रान्स्फर सेवा :**

भारतातील बँकेतून भारतातील बँकांमध्ये रक्कम ट्रान्सफर करण्यासाठी NEFT व RTGS सेवांचा वापर करावा लागतो मात्र विदेशात पैसे पाठवण्यासाठी किंवा विदेशातून आपल्या खात्यावर पैसे ट्रान्स्फर करून घेण्यासाठी या सेवाचा उपयोग करता येत नाही तर यासाठी SWIFT प्रणालीचा वापर करावा लागतो. Society for Worldwide Interbank Financial Telecommunication - SWIFT ही सन १९७३ मध्ये बेल्झियम या देशात सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली आंतरराष्ट्रीय संस्था असून ती जगभरातील विविध देशातील बँकांना आंतरराष्ट्रीय निधी वापरण्याची सेवा देत आहे.

* **SWIFT** ची सदस्य असलेल्या बँकेलाच या सेवेद्वारे पैसे पाठवता येतात.

* **SWIFT** द्वारे एका देशातून दुसऱ्या देशात पैसे पाठवता येतात.

* या सुविधेचा वापर करून रक्कम पाठवण्यासाठी खातेदारांच्या खात्याबाबतच्या माहितीबरोबरच बँकेचा **SWIFT Code** ही वापरावा लागतो.

* **SWIFT** कोड ११ डिजीटलचा कोड असतो जुने **SWIFT** कोड ८ डिजीटलचे आहेत.

**१.६ सारांश**

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नाविण्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या बँकींग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वापर होत असून विविध प्रकारच्या ई-बँकींग सेवा उपलब्ध होत आहेत तसेच बँकेच्या व्यवस्थापनामध्येही या तंत्रज्ञानाचा वापर करुन त्यामध्ये कार्यक्षमता वृद्धी व दर्जेदार व्यवस्थापन केले जात आहे. भारतातील बँकींग तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी भारतीय बँकींग तंत्रज्ञान विकास व संशोधन संस्था (IDRBT) महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत.

ICT च्या वापरामुळे बँकींग संस्था विविध प्रकारच्या इंटरनेट बँकींग आणि मोबाईल बँकींग सेवा उपलब्ध करून देत असून वेब बँकींग, ATM, EPOS, CDM, ABB, EFT मोबाईल ॲप्लिकेशन्स, BHIM, Paytm, PhonePe, Google Pay इत्यादी उपलब्ध झालेली आहेत की ज्यामुळे वेळ, श्रमाची बचत होत आहे. तथापि या सेवामध्ये सुरक्षितता आणि विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी **RBI** ने

इंटरनेट बँकींग व मोबाईल बँकींग सेवेबाबत मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या असून त्यामध्ये विविध तांत्रिक, व्यवस्थापकीय कायदेशीर व नियंत्रणात्मक बाबीविषयी तरतुदी केलेल्या आहेत.

इलेक्ट्रॉनिक समाशोधन आणि फंड ट्रान्स्फर सेवांमध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून यामध्ये ECS-Credit, ESC-Debit, NACH, IMPS, CTS, BBPS, NEFT RTGS आणि SWIFT सारख्या निधी हस्तांतरण आणि समाशोधन सेवा उपलब्ध झालेल्या आहेत की ज्यामुळे चेकची जलद वटवणूक करणे, इलेक्ट्रॉनिक पेमेंट करणे, २४×७ सेवा उपलब्ध करून देणे शक्य झालेले आहे. BBPS व IMPS मुळे सदासर्वकाळ पेमेंट करण्याच्या सुलभ व सोईस्कर तसेच अतिजलद पेमेंट सेवा उपलब्ध झालेल्या आहेत.

**१.७ पारिभाषिक शब्द :**

* **डेटा मायनिंग** : हे एक संगणकीय तंत्रज्ञान असून त्याच्या आधारे मोठ्या माहितीच्या साठातून विशिष्ट माहिती तात्काळ शोधण्यासाठी याचा उपयोग होतो.

* **आर्टिफिशियल इंटलिजन्स** : एक अत्याधुनिक कृत्रिम बुद्धीमत्ता वापराबाबतचे तंत्रज्ञान असून मेमरी व लॉजीकच्या आधारे निर्णय घेणे, पर्याय सूचवणे इत्यादी बाबी शक्य होतात.

* **EPOS** – हे एक नेटवर्क बँकेशी जोडलेले इलेक्ट्रॉनिक यंत्र असून त्याद्वारे ATM आपण क्रेडीट कार्डाद्वारे इलेक्ट्रॉनिक पेमेंट करता येते. सामान्य भाषेत यास स्वॅप मशीन असेही संबोधले जाते.

* **फायरवॉल** संगणकीय प्रणालीमध्ये बाहेरील नेटवर्क मधून शिरकाव होऊ नये यासाठी सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरच्या सुरक्षेसाठी प्रस्थापित केलेली सॉफ्टवेअर स्वरूपातील सुरक्षा यंत्रणा होय.

* **डेटा इंटरफेस –** जेव्हा दोन वेगवेगळ्या संस्थाकडून वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअर अथवा यंत्रणेमधील माहीतीचे आदान-प्रदान करुन त्याद्वारे व्यवहार करण्यासाठी निर्माण केलेली सॉफ्टवेअर व डेटा कोडींग डिकोटींग प्रणाली होय.

**१.८ बहुपर्यायी प्रश्न व उत्तरे :**

१) INFINET मध्ये F म्हणजे......

अ) Forward ब) Financial क) Forex ड) Firewall

२) .............कोअर बँकींगसाठी सॉफ्टवेअर आहे.

अ) Finacle ब) Microsoft क) Ios ड) SWIFT

३) IDRBT या संस्थेची स्थापना ......या वर्षी झाली.

अ) १९९१ ब) १९९६ क) २०११ ड) २०१८

४) CDM हे पैसे........मशीन आहे.

अ) पैसे काढण्याचे ब) पैसे जमा करण्याचे क) पैसे सुट्टे करण्याचे
ड) पैसे ऑनलाईन ट्रान्स्फर करण्याचे

५) इंटरनेट बँकींग सेवा सुरू करण्यासाठी ..... करणे आवश्यक असते.

अ) फायनाशियल ऑडीट ब) वित्तीय ऑडीट क) स्ट्रक्चरल ऑडीट
ड) इन्फॉरमेशन अँड सिस्टीम ऑडीट

६) ......... हे NPCI द्वारे नियंत्रित केले जाते.

अ) BBPS ब) NACH क) CTS ड) हे सर्व

**उत्तरे : १) ब २) अ ३) ब ४) ब ५) ड ६) ड**

**१.९ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) बँकींग क्षेत्रातील ICT च्या वापरावर टिप्पणी करा.

२) इंटरनेट बँकींगचे स्वरूप सांगून त्याबाबतच्या RBI च्या मार्गदर्शक सूचना स्पष्ट करा.

३) मोबाईल बँकींगचे स्वरूप सांगून त्याबाबतच्या RBI च्या मार्गदर्शक सूचना स्पष्ट करा.

४) इलेक्ट्रॉनिक समाशोधन व देयकाच्या विविध सेवा स्पष्ट करा.

**टिपा लिहा.**

१) बँकींग क्षेत्रातील ICT च्या वापराचे महत्त्व

२) IDRBT

३) मोबाईल बँकींगची व्याप्ती व ॲप्लीकेशन्स

४) NEFT, RTGS व SWIFT

५) ECS Debit व ECS Credit

६) CTS व BBPS

## १.१० अधिक वाचनासाठी पुस्तके व संदर्भ :

1) IIBF (2016) Information Systems for Banks, Macmillan Publications. 2016.

2) Bhansali SR (2003) Information Technology Act 2000, University Books House Pvt, Jaipur.

3) RBI (2005)Electronic Clearing Service.

4) RBI (2005) Proceedurul Guidlines for NEFT and RTGS - www.rbi.org.in

5) RBI (2016)Mobile Banking Transactions - Openetive Guidlnes for Banks-2016

6) RBI (2001)Internet Banking in India-Guidlines June -2001.

7) www.rbi.org.in

8) www.npci.org.in

9) www. swift.com.

***

# घटक - २

## बँकांमधील पत आणि जोखिम व्यवस्थापन

## ( Credit and Risk Management in Bank )

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापन - मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाबाबत आरबीआयची मार्गदर्शक तत्त्वे

२.२.२ भांडवल पर्याप्तता - दूरदर्शी आणि असुरक्षीतता निकष - बँकिंगविषयक बेसल निकष

२.२.३ बँक जोखीमीचे प्रकार - जोखीम व्यवस्थापनाची तत्वे

२.२.४ मालमत्ता दायित्व समितीचे संघटन - मालमत्ता दायित्व समितीची कार्ये

२.३ सारांश

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे

२.६ पारिभाषिक शब्द

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रथ


**२.०. उद्दिष्ट्ये :**

सदर प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील बाबींची अधिक कल्पना येण्यास मदत होते.

१. मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापन, मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाबाबत आरबीआयची मार्गदर्शक तत्त्वे अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

२. भांडवल पर्याप्तता, दूरदर्शी आणि असुरक्षीतता निकष, बँकिंगविषयक बेसल निकष स्पष्ट होण्यास मदत होते.

३. बँक जोखीमीचे प्रकार, जोखीम व्यवस्थापनाची तत्वे अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

४. मालमत्ता दायित्व समितीचे संघटन, मालमत्ता दायित्व समितीची कार्ये स्पष्ट होतात.

**२.१ प्रस्तावना :**

व्यवहारामध्ये अनेक अनिश्चितता निर्माण होत असतात. प्रत्येक क्षेत्र अनिश्चित, असंभाव्य घटकांनी अस्थिर आहे. शेतीमध्ये निसर्ग प्रतिकूल राहील्यास उत्पादनावर त्याचा विपरित परिणाम घडून येतो. औद्योगिक क्षेत्रात मंदी, तांत्रिक बदल यासारख्या कारणांनी उत्पादक धोक्यात येऊ शकतो, म्हणजेच अनिश्चिततेधूनच जोखीम निर्माण होत असते व ती त्या उद्योगाच्या, व्यवसायाच्या, कार्यक्षमतेवर, उत्पादकतेवर कमी-अधिक प्रमाणात प्रभाव टाकत असते. एखादा व्यवसाय धोक्यात आल्यास त्यामधून उत्पादकता, उत्पादन, मागणी, पुरवठा, नफा, गुंतवणूक यावर विपरित परिणाम होऊन गुणक पद्धतीने अर्थव्यवस्थेतील अनेक क्षेत्रे धोक्यामध्ये गुरफटली जातात व काही कालावधीनंतर अर्थव्यवस्थाच आर्थिक संकटामध्ये सापडते. संकट निर्माण होण्यापूर्वीच दक्षता घेतल्यास संकटाची तीव्रता कमी होते. त्याचप्रमाणे व्यवसायामध्ये जोखीम निर्माण होऊ नये तसेच निर्माण झाल्यास त्याची तीव्रता कमी असावी यासाठी घेतलेली दक्षता म्हणजे जोखीम व्यवस्थापन होय.

**जोखीमीचा अर्थ :**

धोका (Risk) हा शब्द इटालियन भाषेतील 'Rischo' या शब्दापासून तयार झाला आहे की, जी लॅटीन भाषेतील 'Rischare' या शब्दावर आधारित आहे. 'Rischare' या शब्दाचा अर्थ 'धोक्यातून वाटचाल करणे (To Run Into Danger) ''अर्थव्यवस्थेतील विविध चलांध्ये काही अनिश्चित, असंभाव्य बदल झाल्याने व्यवसायामध्ये काही विपरित समस्या निर्माण होतात, त्यांना 'धोका' म्हणतात.'' त्या व्यवसायाच्या जोखीम व्यवस्थापनाच्या धोरणावरती विशिष्ट जोखीम व्यवसायाचे किती नुकसान करेल हे ठरत असते. शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेले धोका व्यवस्थापन हे धोक्यांच्या प्रतिकूल परिणामांची तीव्रता कमी करणारे ठरते याउलट धोका व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष केल्यास तो व्यवसाय मोठ्या संकटात सापडू शकतो. उदाहरणार्थ, जागतिक अर्थव्यवस्थेत मंदीची सुरूवात झाल्यास भारतीय रिझर्व्ह बँकेने जर मंदीला अनुसरून स्वत: पैशाचे धोरण राबविले तर मंदीच्या प्रतिकूल परिणामांची तीव्रता देशामध्ये कमी असेल अन्यथा भारतीय अर्थव्यवस्था सुद्धा जागतिक मंदीमध्ये जाऊ शकते म्हणजेच बँकींग व्यवसायामध्ये जोखीम व्यवस्थापनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

**धोका व्यवस्थापनातील समाविष्ट बाबी :**

इतर अनेक क्षेत्राप्रमाणेच बँकींग क्षेत्रामधील धोका व्यवस्थापन हे शेती, उद्योग तसेच सेवाक्षेत्राच्या विकासाला पोषक असे ठरते कारण बँकींग व्यवसाय या सर्वच क्षेत्राशी निगडीत असणारा व्यवसाय आहे. बँकींग धोका व्यवस्थापनामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

१) धोका ओळखणे

२) जोखीमीची कारणे

३) धोक्याची तीव्रता निश्चित करणे

४) धोक्याची व्याप्ती

५) जोखीमीचे परिणाम

६) जोखीम व्यवस्थापनाबाबत नियोजन

७) जोखीम व्यवस्थापनाच्या रचनेची निश्चिती

८) जोखीमीचे वर्गीकरण

९) जोखीम कमी करण्याचे उपाय

१०) उपायांच्या प्राधान्यक्रमाची निश्चिती

वरील विविध मुद्दयांवरून बँक जोखीम व्यवस्थापनामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो हे स्पष्ट होण्यास मदत होते.

### २.२.१.अ. मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापन (Asset Liability Management) :

मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापन ही संकल्पना ताळेबंदातील पध्दतशीर व्यवस्थापनाशी संबधीत असणारी संकल्पना आहे. यामध्ये मालमत्ता आणि देयता यामध्ये समतोल साध्य करण्याच्यादृष्टीने प्रयत्न केला जातो. कर्जपुरवठा, रोखता, व्याजदर आणि चलनपुरवठा यामधील असमतोलातून निर्माण झालेला धोका कमी करण्याचे कार्य मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाच्या माध्यमातून केले जाते. मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापन हे जोखिम रोखू शकत नाही तर ते जोखिम व्यवस्थापन व नफ्याची शाश्वतता राखण्याचे कार्य करते. जोखिमेबाबत माहिती जमा करणे आणि त्याचे वर्गिकरण तसेच देखरेख करण्याचे कार्य मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनामार्फत केले जाते. मत्ता तसेच देयता यामध्ये योग्य ते बदल करून जोखिम व्यवस्थापन करणे त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्याचे कार्य करते.

मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनामध्ये बँकेच्या एकत्रित निधीच्या उत्पन्न आणि खर्चाच्या अनुषंगाने नियोजन करणे, त्याला दिशा देणे आणि नियंत्रण करण्याचे कार्य केले जाते. बँकेच्या सर्व प्रकारची जमा आणि खर्च या अनुषंगाने योग्य ते नियोजन आणि व्यवस्थापन करण्याची क्रिया म्हणजे मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापन होय. मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाच्या माध्यमातून मत्ता व देयतेच्या अनूषंगाने पत धोका तसेच बाजार धोका जाणून घेण्याचे कार्य करते. देशांतर्गत बाजार आणि विदेशी बाजारामधील वाढत्या उदारीकरणामधून बँकिंग धोका मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सद्यस्थितीला देशांतर्गत व्याजदर आणि विदेशी विनीमय दर यामधील अस्थिरता वाढत असल्याचे दिसून येते. सर्वोच्च व्यवस्थापन वर्गामध्ये बाजार धोका तसेच व्याजदराबाबतच्या

हालचाली व त्याचे बँकाच्या कार्यपध्दतीवर होणारे संभाव्य परीणाम याची जाणिव होण्याच्या दृष्टीने मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाचे कार्य महत्वाचे ठरते.

**२.२.१.ब. मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाबाबत आरबीआयची मार्गदर्शक तत्त्वे** (RBI Guidelines – ALCO Guidelines Techniques Tools) : मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाबाबत आरबीआयची मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा १० सप्टेंबर १९९८ रोजी तयार करण्यात आला. सदर मार्गदर्शक तत्त्वांचा अंतिम मसुदा १० फेब्रुवारी १९९९ रोजी तयार करण्यात आला व त्यांची अंमलबजावणी १ एप्रिल १९९९ रोजी सुरू झाली. सुरवातीला कमीत कमी ६० टक्के मत्ता आणि देयतेचा यामध्ये समामवेश करण्यात आला. तर १ एप्रिल २००० मध्ये १०० टक्के मत्ता आणि देयतेचा यामध्ये समावेश करावा अशी तरतूद करण्यात आली. एप्रिल २००५ मध्ये नाबार्डने बँकांच्या धोका व्यवस्थापन पध्दतीबाबत मार्गदर्शक तत्त्वे मांडली व ती मोजक्या ५ राज्य सहकारी बँकांना लागू करण्यात आली त्यामध्ये आंध्र प्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र, पंजाब आणि पश्चिम बंगाल या राज्यातील राज्य सहकारी बँकांचा समावेश करण्यात आला.

मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाबाबत आरबीआय आणि नाबार्डची मार्गदर्शक तत्त्वे : मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाबाबत आरबीआय आणि नाबार्डने जी मार्गदर्शक तत्त्वे मांडलेली आहेत ती पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. बँकांमधील संगणिकरणाचे परिक्षण करणे.

२. मनुष्यबळाची योग्यरीत्या अंमलबजावणी.

३. मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापन धोरणाला संचालक मंडळाडून मंजूरी देण्यात यावी.

४. मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाच्या योग्य अंमलबजावणीसाठी मालमत्ता उत्तरदायित्त्व समितीची स्थापना करण्यात यावी.

५. आवश्यकतेनुसार अहवाल तयार करण्यास प्रारंभ करण्यात यावा.

६. नोडल अधिकाऱ्याच्या क्षमता वाढविण्यावर भर देण्यात यावा.

७. संस्थेचे मासिक प्रगती अहवाल सादर करण्याची जबाबदारी सदर समितीवर असेल.

८. संस्थेचे मासिक प्रगती अहवालामध्ये संस्थेची सद्यस्थिती, प्रगती आणि भविष्यकालीन नियोजित आराखडा यांचा समावेश असावा

अशा स्वरूपाची मार्गदर्शक तत्वे बँका आणि वित्तीय संस्थांनी कार्यक्षमपणे कार्य करावे त्याच्या जोखमिचे प्रमाण कमी व्हावे यादृष्टीने आरबीआय आणि नाबार्ड यांनी स्पष्ट केली आहेत.

**२.२.२. अ. भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) :**

सन १९९८ मध्ये भारताच्या अर्थमंत्र्यानी एम. नरसिंहम् यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील बँकींग क्षेत्रातील सुधारणांची पाहणी करण्यासाठी व वित्तीय सुधारणा सूचविण्यासाठी समितीचे गठन केले. त्या समितीने सादर

भारतात बळकट बँकींग प्रणालीची आवश्यकता आहे, मर्यादित बँकींगची संकल्पना, लहान स्थानिक बँका, भांडवल पर्याप्ता गुणोत्तर, सार्वजनिक (सरकारी) मालकी व वास्तव स्वातंत्र्य, बँकीग कायद्यात सुधारणा, सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचे संगणकीकरण, व्यापारीकरण, राजकीय हस्तक्षेपापासून मुक्तता, प्रशिक्षित नोकर भरती इत्यादी सुधारणांच्या संदर्भात आपल्या अहवालामध्ये महत्त्वपूर्ण शिफारसी केल्या आणि त्यापैकी अनेक शिफारसीच्या आधारे आरबीआयने बँकिंग क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. यामधील महत्वपूर्ण शिफारस जी होती ती म्हणजे भांडवल पर्यायिता होय.

देशाच्या बँकिंग क्षेत्रातील संकट रोखण्यासाठी मध्यवर्ती बँकेकडून बँका आणि वित्तीय संस्थांना भागभांडवल धारकांच्यामार्फत भांडवलामध्ये वाढ घडविण्यासाठी जे बंधन लादन्यात आले त्यालाच भांडवल पर्याप्तता असे संबोधले जाते. बँकेकडे जेवढे अधिक भागभांडवल असेल तेवढ्या अधिक प्रमाणात भविष्यात उदभवणाऱ्या संकटावर मात करण्याची त्या बँकेची क्षमता अधिक असते. म्हणूनच सदर निकषाच्या आधारे प्रत्येक व्यापारी बँकेने आपले भागभांडवल वाढविण्यावर भर द्यावा असे बंधन त्यांच्यावर भांडवल पर्याप्तता निकषाच्या अंतर्गत आरबीआयने लादलेले आहे.

अपयशी ठरणाऱ्या बँकेला वाचविण्यासाठी सरकार किंवा केद्रिंय बँकेकडून केलेली तरतुद किंवा उपाययोजना या अनुषंगाने भांडवल पर्याप्ततेकडे बघावे लागते. भांडवल पर्याप्तता प्रमाण किंवा भांडवल आणि जोखमीचे मालमत्ता प्रमाण होय. याचाच अर्थ असा होतो की बँकेसाठी आवश्यक असणारे भांडवल, की जे बँकेकडून वाटप करण्यात आलेल्या मालमत्तेचा विचार करून मोजले जाते. पात्र भांडवल आणि दिलेल्या कर्ज व व्याजातील जोखीम मयामधील तडजोड यांच्यामधील प्रमाणास भांडवल पर्याप्तता प्रमाण असे संबोधले जाते. सुरवातीला ८ टक्के असणारे भांडवल पर्याप्तता प्रमाण २००० मध्ये ९ टक्के करण्यात आले. ज्या बँकेकडे उच्च भांडवल आहे तिला उच्च मालमत्ता असणारी बँक असे संबोधले गेले व त्या बँकेमध्ये जोखीम पेलण्याची अधिक क्षमता असते.

### २.२.२ ब. दूरदर्शी आणि असुरक्षीतता निकष (Prudential and Exposure Norms) :

भारतातील वित्तीय क्षेत्रामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी भारत सरकारने १४ ऑगस्ट १९९१ रोजी आरबीआयचे माजी गव्हर्नर मा. एम. नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठण करण्यात आले. या समितीलाच वित्तीय क्षेत्रातील सुधारणा विषयक नरसिंहन असे म्हटले जाते. सदर समितीने आपला अहवाल १६ नोव्हेंबर १९९९ रोजी सादर केला, ज्यामध्ये वित्तीय क्षेत्रातील सुधारणांच्या संदर्भात अनेक शिफारसी केल्या. ज्यामध्ये रोख राखीव प्रमाण कमी करणे, वैधानिक रोखता प्रमाण कमी करणे, अग्रकम क्षेत्राला करावयाच्या कर्ज पुरवठ्याचे लक्ष ४० टक्क्यांवरून १० टक्के पर्यंत कमी करणे, देशात चार स्तरीय बँक व्यवस्था निर्माण करणे, बँकांवर दुरदर्शी निकष लागू करणे, बँकाच्या राष्ट्रीयकरणाची प्रक्रिया थांबविणे, सार्वजनिक बँकांवरील नियंत्रणे कमी करून त्यांना अधिक स्वायत्तता देण्यात यावी, मालमत्ता पुनर्रचना निधीची स्थापना करण्यात यावी यासारख्या अनेक सुधारणा सुचविण्यात आल्या त्यामध्ये बँकांवर दूरदर्शी निकष लागू करणे ही एक महत्त्वपुर्ण शिफारस मानली जाते.

भारतातील बँकिंग कार्यपध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी एम. नरसिंहन यांनी बँकांवर विविध स्वरूपाचे दूरदर्शी निकष बंधनकारक केले. त्या निकषांमध्ये पुढील निकषांचा समावेश होतो.

**१. मालमत्ता वर्गीकरण निकष :** बँका या ठेवीदारांच्या ठेवींच्या आधारे कर्जदारांना कर्ज देण्याचे महत्त्वपुर्ण कार्य करत असतात. त्यांनी कर्जदारांना दिलेली कर्जे ही त्यांची महत्त्वाची मालमत्ता असते. या मालमत्तेची व्याजा सहीत वेळेवर परतफेड होते की नाही याच्या आधारावर तीचे प्रमाणित मालमत्ता, निम प्रमाणित मालमत्ता, शंकास्पद मालमत्ता, बुडित मालमत्ता अशा चार प्रकारामध्ये वर्गिकरण करण्यात येते.

**अ. प्रमाणित मालमत्ता (Standerd Assets) :**

बँकांनी दिलेल्या कर्ज आणि व्याजाचे हप्ते जर वेळेवर परत येत असतील तर त्यांचा समावेश प्रमाणित मालमत्तेमध्ये केला जातो. ही कर्जे वेळेवर परत होत असल्याने ती बुडण्याची अजीबात शंका असत नाही. या मालमत्तेलाच लाभदायी मालमत्ता असेही म्हंटले जाते. तीन महिन्याच्या आत जर कर्ज आणि व्याजाचे हप्ते भरले जात असेल तर ती लाभदायी मालमत्ता असे संबोधले जाते. तीन महिन्यांपेक्षा अधिकचा कालखंड जर कर्ज व व्याजाचे हप्ते थकित असतील तर त्याचा अमावेश अलाभदायक किंवा अकार्यक्षम मत्तेमध्ये करण्यात येतो. एकूण कर्जामध्ये लाभदायक मत्तेचे प्रमाण जेवढे अधिक असते तेवढ्या प्रमाणात ती बँक अधिक कार्यक्षमपणे कार्य करताना दिसून येते. अशा रकमेला पर्यायी तरतूद म्हणून आपल्या नफ्यातून प्रमाणित मालमत्तेच्या ०.४०% रक्कम तरतूद करणे आवश्यक असते.

**ब. उप प्रमाणित मालमत्ता (Sub - Standerd Assets) :**

बँकेने दिलेल्या कर्ज व व्याजाच्या परतफेडीचा हप्ता बारा महिने किंवा कमी कालखंडासाठी थकीत असतो किंवा त्याची परतफेड झालेली नसते तेव्हा अशा कर्जाचा समावेश उपप्रमाणित मालमत्तेमध्ये केला जातो. त्यालाच उपप्रमाण मालमत्ता असे म्हंटले जाते. या कर्जाचे प्रमाण वाढत गेल्यास बँक पुढील टप्प्यात धोक्यात येण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रत्येक व्यापारी बँकेला आपल्या निमप्रमाणित कर्जाच्या एकूण येणे रकमेच्या १० टक्के रकमेची तरतुद करावी लागते. ही १० टक्क्यांची मर्यादा आरबीआय कायद्यातील नियमावलीनुसार बंधनकारक करण्यात आली आहे.

**क. शंकास्पद मालमत्ता (Doubtful assets) :**

एखाद्या बँकेने दिलेल्या कर्ज व व्याजाच्या परतफेडीचा हप्ता १२ महिन्यांपेक्षा अधिक कालखंडासाठी थकीत असतो किंवा त्याची परतफेड झालेली नसते तेव्हा अशा कर्जाचा समावेश शंकास्पद मालमत्तेमध्ये केला जातो. त्यालाच संशयास्पद मालमत्ता असे म्हंटले जाते. प्रत्येक व्यापारी बँकेला आपल्या शंकास्पद मालमत्तेच्या तारण रहीत भागाच्या १०० टक्के रक्कम तर तारणसहीत भागाच्या २० ते ५० टक्के रकमेची तरतुद करावी लागते.

**ड. बुडित मालमत्ता (Loss assets) :**

जेव्हा बँकेने दिलेल्या कर्जाची परतफेड होऊच शकत नाही तेव्हा त्या बँकेमार्फत किंवा आरबीआयमार्फत सदर कर्जाचा समावेश बुडित मालमत्तेमध्ये केला जातो. थोडक्यात ज्या रक्कमेच्या संदर्भात तोटा होणार आहे हे सिध्द झालेले असते किंवा जी मालमत्ता तीन वर्षापेक्षा अधिक कालखंड निष्क्रीय राहीलेली असते तीला बुडीत मालमत्ता असे म्हंटले जाते. अशा रकमेसाठी एकूण येणे असणाऱ्या रकमेच्या १०० टक्के रकमेची तरतूद करणे त्या बँकेला आरबीआय कायद्यातील तरतुदीनुसार बंधनकारक असते.

### २. उत्पन्न गणना :

बँका तसेच वित्तीय संस्थांनी दिलेल्या कर्जावरील व्याज उत्पन्न प्रत्यक्ष मिळण्याची शक्यता असल्यास त्याचा समावेश उत्पन्नामध्ये करणे म्हणजेच उत्पन्न गणना होय. ज्या व्याजाची परतफेड होणे शक्य नाही त्याची उत्पन्न गणना करू नये असे आरबीआयने स्पष्ट केले आहे. बँकांच्या सोईसाठी सर्व प्रकारच्या अग्रिमांचे वर्गिकरण करून त्यांना संकेतांक देण्यात आलेले आहेत. विशिष्ट अग्रिमाला जो संकेतांक देण्यात आलेला आहे त्यावरून त्याची आर्थिक स्थिती सुरक्षीत आहे की धोकादायक आहे हे स्पष्ट होण्यास मदत होते.

### ३. अकार्यक्षम मालमत्ता निकष :

बँका किंवा वित्तीय संस्थांनी व्यक्ती आणि संस्थांना जी कर्जे दिलेली असतात ती त्याची मत्ता मानली जाते. जर अशी कर्जे व त्याच्या व्याजाचे हप्ते वेळेवर परतफेड होत असेल तर त्यांना कार्यक्षम मत्ता असे म्हणतात. याउलट जर कर्ज व व्याजाचे हप्ते वेळेवर भरले जात नसेल ते बराच कालावधीसाठी थकीत असेल तर त्यास अकार्यक्षम संपत्ती किंवा अकार्यक्षम मालमत्ता असे म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर ९० दिवस रक्कम थकीत असेल तर त्याचा समावेश अकार्यक्षम मत्तेमध्ये केला जातो. भारतामध्ये हा कार्यकाल १८० दिवस गृहीत धरलेला होता. सन २००४ मध्ये बदल करून तो ९० दिवसांपर्यंत कमी करण्यात आलेला आहे.

### ४. मालमत्ता तरतूद निकष :

बँकेने दिलेल्या कर्जाच्या आणि व्याजाच्या परतफेडीचे प्रमाण घटल्यास बँक धोक्यात येण्याची शक्यता असते. म्हणूनच बँकेने दिलेले कर्ज व त्यावरील व्याज किती कालावधीसाठी थकीत आहे याचा विचार करून त्याचे प्रमाणित मालमत्ता, निमप्रमाणित मालमत्ता, संशयास्पद मालमत्ता तसेच बुडीत मालमत्ता असे प्रकार केले जातात. तसेच कोणकोणत्या प्रकारामध्ये किती रक्कम थकीत आहे याच्या आधारावर विशिष्ट रकमेच्या निधीची तरतुद करावी अशा स्वरूपाचे बंधन बँकावर आरबीआय मार्फत लादले जाते. सद्यस्थितीला धोका निर्माण झालेला नसल्याने ही रक्कम बँकेच्या जमा खर्चात पूरक भांडवल म्हणून विचारात घेतला जातो. मालमत्तेच्या वर्गिकरणानुसार त्यासाठी किती तरतुद करावी याबाबत आरबीआयचे निकष पुढील प्रमाणे आहेत.

**अ. प्रमाणित मालमत्ता :** कृषी, सुक्ष्म व लघु उद्योगांसाठी ०.२५ टक्के, निवासी गृहकर्जासाठी ०.७५ टक्के, रिअल इस्टेट साठी १ टक्के आणि इतर कर्जासाठी ०.४ टक्के तरतुद करावी लागते.

**ब. उप प्रमाणित मालमत्ता** : तारण सहीत कर्जासाठी थकीत रकमेच्या १५ टक्के तारण विरहीत कर्जासाठी २५ टक्के तरतुद करावी लागते.

**क. संशयास्पद मालमत्ता :** तारण विरहीत कर्जासाठी १०० टक्के तरतुद करावी लागते. तर तारण सहीत कर्जासाठी:

१. १ वर्षापर्यंत संशयास्पद असेल तर २० टक्के रकमेची तरतुद

२. १ ते २ वर्षांपर्यंत संशयास्पद असेल तर ३० टक्के रकमेची तरतुद

३. ३ वर्षांपर्यंत अधिक कालावधीसाठी संशयास्पद असेल तर ५० टक्के रकमेची तरतुद

ड. बुडित मालमत्ता : बुडित मालमत्तेसाठी थकीत रकमेच्या १०० टक्के रकमेची तरतुद करावी लागते.

**५. भांडवल पर्याप्तता निकष :**

सन १९९२ मध्ये आरबीआयने भारतातील व्यापारी बँकांना भांडवल पर्याप्तता निकषाचे पालन करण्याचे बंधन लादण्यात आले. सुरवातीला प्रत्येक व्यापारी बँकेला ८ टक्के भांडवल पर्यायता निकष बंधनकारक करण्यात आला. त्यामध्ये वाढ करून सन २००० मध्ये ९ टक्के भांडवल पर्याप्तता गुणोत्तर राखण्याचे प्रत्येक बँकेला बंधनकारक करण्यात आले. वाढत्या थकीत कर्जापासून वाढत जाणाऱ्या जोखमीपासून बँकांना सुरक्षीतता देण्याच्यादृष्टीने बँकांनी आपले भांडवल वाढवावे यासाठी या निकषाबाबत सक्ती करण्यात आली आहे. भांडवल पर्याप्तता गुणोत्तरालाच भांडवल – जोखीम भारीत मालमत्ता गुणोत्तर असेही म्हंटले जाते.

भारतीय बँकींग क्षेत्रात जागतिकीकरणास तोंड देण्यासाठी काय बदल करावे लागतील, त्याबाबत शिफारशी करण्यासाठी भारत सरकारने आर.बी.आय चे माजी गव्हर्नर श्री. एम. नरसिंहम् यांच्या अध्यक्षतेखाली १९९१ मध्ये समिती नेमली होती. जागतिकीकरणामुळे भारतीय बँकांना परकीय बँकांशी स्पर्धा करावी लागणार असल्याने भारतीय बँकींग क्षेत्रात कायम सुधारणा कराव्यात याबाबत या समितीने शिफारशी केल्या. सार्वजनिक क्षेत्रातील बँका व विकास बँकाची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी उपाय योजना सूचविणे, सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचे संघटन, रचना, कार्ये, बँकाची कार्यपध्दती यांचे परीक्षण करुन उपाय सुचविणे, भारतातील वित्तीय व्यवस्था जागतिकीकरणाच्या संदर्भात अधिक बाजाराभिमुख करणे यासारखी उद्दिष्टे विचारात घेऊन नरसिंहम समितीने कायदेशीर रोखता प्रमाण कमी करणे, रोख राखीव निधी प्रमाण कमी करणे, व्याजदर टप्पे, दूरदर्शी निकष, भांडवल बाजार, नवीन खाजगी बँका, मत्ता पुनर्रचना फंडाची स्थापना, बँकावरील दुहेरी नियंत्रण, मुक्त व स्वतंत्र बँका, वगैरेबाबत शिफारशी केल्या व त्या सर्व शिफारसी सरकारने स्विकारलेल्या दिसतात.

**२.२.२. क. बँकिंगविषयक बेसल निकष (BASEL I, II, III) :**

आज आंतरराष्ट्रीय स्तरावर कर्जाबाबत, मालमत्तेबाबत तसेच कार्यपध्दतीबाबत अनेक जोखिम निर्माण होऊ शकतात. अशा जोखीमांपासून जागतिक स्तरावर कार्य करणाऱ्या बँकांना संरक्षण मिळावे यासाठी त्याच्यावर जे बंधनात्मक निकष लादण्यात आलेले आहेत. त्यांना बेसल निकष असे संबोधले जाते. बेसल हे स्वित्झर्लंडमधील एक शहर असून ते इंटरनॅशनल सेटलमेंट ब्युरोचे मुख्यालय देखील आहे. विविध देशातील मध्यवर्ती बँकामध्ये सहकार्य प्रस्थापीत करणे त्यामधून आर्थिक स्थैर्य व बँकींग नियमनाचे सर्वसामान्य प्रमाण ठरविणे हा या ब्युरोचा मुख्य उद्देश आहे. सध्या या ब्युरोचे २७ राष्ट्रे सभासद आहेत. मध्यवर्ती बँकाच्या गटाने म्हणजे बेसल कमिटीने बँकाच्या देखरेखीखाली जे प्रमाण ठरविले आहे, त्यांना बेसलच्या मार्गदर्शक सूचना असे म्हटले जाते. या ब्युरोने बँकाचे धोके व आर्थिक पध्दतीबाबत ज्या मार्गदर्शक सूचनांच्या संचाला मान्यता दिलेली आहे त्याला बेसल ॲकार्ड असे म्हणतात या ॲकार्डचा उद्देश वित्तिय कंपन्याना पुरेसे भांडवल उपलब्ध व्हावे व त्यांना जे अनपेक्षित तोटे होतात त्यांना तोंड देता यावे. भारताने हा बेसल ॲकॉर्ड बँकींग पध्दतीसाठी स्विकारला आहे. बेसल नॉम्स् तीन

**बेसल – १ (Basel - I ) :** सन १९८८ मध्ये बँकाच्या कर्ज जोखिमेशी संबधीत तयार केलेल्या निकषांना बेसल – १ निकष असे म्हणतात. बँकिंग व्यवसायावरील बँकिंग समितीने बँकाचे भांडवल मोजण्याची पध्दती तयार केली त्याला बेसल भांडवल अॅकॉर्ड असे म्हणतात. या अॅकॉर्डने पतपुरवठ्यातील धोक्यावर आपले लक्ष केंद्रीत केले. त्याने बँकाच्या भांडवल व धोक्याच्या भाराची संरचना याची व्याख्या दिली. बँकानी या अॅकॉर्डने धोकाभारीत मत्तेच्या ८ टक्के किमान भांडवल ची तरतूद करावी असे सांगितले. धोकाभारीत मत्ता ही वेगवेगळ्या प्रकारची असते. ज्या कर्जाला तारण असते ती कमी धोका असणारी मत्ता तर तारण नसणारी कर्जे अधिक धोका/जोखीम असणारी असतात. रिझर्व्ह बँकेने हे निकष भारतीय बँकाना १९९२ मध्ये लागू केले. तर ज्या भारतीय बँकांच्या परदेशात शाखा आहेत त्यांना ते १९९४ पर्यंत तर इतर बँकांना मार्च १९९६ पर्यंत सदर निकषांती पुर्तता करण्याचे बंधन लादण्यात आले. सन २००० मध्ये भांडवल पर्याप्तता निकषाची मर्यादा ९ टक्के पर्यंत वाढविण्यात आली.

**बेसल – २ (Basel - II ) :** बेसल बँकिंग समितीने २००४ मध्ये बेसल –२ ची मार्गदर्शक तत्वे प्रकाशित केली, ही तत्वे तीन घटकांवर आधारीत आहेत. बँकानी धोकेभारीत मत्तासाठी किमान ८% भांडवल पर्याप्तता गुणोत्तर राखावे बँकानी धोके व्यवस्थापन तंत्राचा विकास करावा व त्याचा वापर करावा बँकानी त्यांचे धोके मध्यवर्ती बँकेला (रिझर्व्ह बँक) स्पष्ट करणे (कळविणे) बंधनकारक आहे.

भारतात हे बेसल – २ नॉर्म्स् संपूर्णतः लागू करावयाचे आहेत. बेसल–२ नॉर्म्स् बँकानी धोक्याना यशस्वीरित्या तोंड देण्यासाठी पुरेसे भांडवल राखावे याबाबतचे आंतरराष्ट्रीय व्यावसायिक प्रमाण आहे. बँसल अॅकॉर्डमध्ये अनेक बँकींग कायदे व नियंत्रणे समाविष्ट आहेत. बेसल – २ ही बेसल – १ ची १९८० मध्ये तयार केलेली आवृत्ती आहे. बेसल – २ मध्ये देखील बँकानी धोकाभारीत मत्ता व त्यांची व्यवस्थापन पध्दती जाहीर करणे आवश्यक आहे.

**बेसल – २ चे आवश्यक मुद्दे :** बेसल – २ चे खालील तीन आवश्यक मुद्दे होत.

१) जास्त धोके असणाऱ्या व्यवसायात भांडवल गुंतवणूकीवर बँक मॅनेजरनी बंधने घालावीत

२) कर्जातील धोके व कामकाजातील धोके वेगळे करुन त्यांची संख्येत गणना करणे.

३) वास्तव अथवा वित्तीय धोक्यांचे प्रयत्नपूर्वक नियंत्रणाव्दारे मूल्यमापन करुन लवादाची व्याप्ती किंवा शक्यता कमी करणे.

बेसल – २ नॉर्म्स्मध्ये बँकासाठी धोकेभारीत गुंतवणूकीबाबत अनेक उपाय योजना सूचविल्या आहेत उदा. उपतारण बाजार, धोकेभारीत मत्ता बँकाच्या अनियंत्रित भागाकडे वर्ग करणे गुंतवणूकीतील धोके सरळ गुंतवणूकदारावर रोख्याव्दारे टाकणे ज्या रोख्यांची खुल्याबाजारात खरेदी विक्री होते. भारतीय बँकांच्या परदेशात शाखा आहेत त्यांना मार्च २००८ पर्यंत तर विभागीय ग्रामीण वगळता अन्य बँकांना मार्च २००९ पर्यंत सदर निकषांती पुर्तता करण्याचे बंधन लादण्यात आले.

**बेसल – ३ (Basel - III ) :** सन २०१० मध्ये बेसल – ३ ची मार्गदर्शक तत्वे जाहीर करण्यात आली. ही तत्वे सन २००८ च्या जागतिक आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमिवर जाहीर करण्यात आली. आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमिवर जाहीर करण्यात आली. आर्थिक मंदीच्या पार्श्वभूमीवर बँकींग क्षेत्र बळकट करण्याची गरज निर्माण झाली होती. विकसित देशातील बँका या भांडवलाबाबत कमकुवत होत्या तसेच त्या आर्थिक मदतीवर अल्पकालीन निधीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून होत्या तसेच बेसल-२ तत्वामध्ये सांगितलेले भांडवल भविष्यकालीन धोक्यांना तोंड देण्यासाठी पुरेसे नव्हते. बेसल – ३ तत्वाचा उद्देश बँकाची कार्यप्रणाली जास्तीत जास्त भांडवल प्रधान करणे हा उद्देश आहे.

बेसल – ३ मार्गदर्शक तत्वे बँकींग पध्दती चार घटकांवर आधारित निर्माण करण्याचे स्पष्ट करतात. हे चार घटक पुढीलप्रमाणे होत.

१) भांडवल

२) आर्थिक मदत

३) निधी पुरवठा

४) रोखता

बेसल ३ – आर्थिक संकटाच्या काळात आंतरराष्ट्रीय बँकानी पुरेसे भांडवल राखावे यासाठीची प्रमाणके व कार्यपध्दती समाविष्ट असणाऱ्या मार्गदर्शक तत्वांचा संच होय. बेसल-३ तत्वे बँक नियंत्रणासाठी आवश्यक ज्यादा तत्वे असणारा बँसल-२ तत्वांचा संच व बँसल-१ तत्वाचे केलेले शुध्दीकरण होय. बेसल-३ तत्वे बँकानी धोक्यांना तोंड देण्यासाठी मोठ्या प्रमाणात आपल्याकडे भांडवल ठेवण्यावर/राखण्यावर भर देतात. त्यामध्ये भांडवल संवर्धन राखीव निधी एकूण मतांच्या २.५% इतका असावा असे स्पष्ट करतात. भारतीय बँकांना सदर निकष १ एप्रिल २०१३ मध्ये लागू करण्याची घोषणा करण्यात आली तर मार्च २०१९ पर्यंत सदर निकषांची टप्प्याटप्प्याने यांची अंमलबाजवणी केली जाईल असे निश्चित करण्यात आले.

अशा रितीने बेसल नॉर्म्स् हे बँक विषयक कायदे व नियम संबंधी बेसल समितीच्या शिफारशीचा संच आहे.

**२.२.३.अ. बँक जोखीमीचे प्रकार :**

अर्थव्यवस्थेमध्ये झालेल्या प्रतिकूल बदलांुळे तसेच बँकीग क्षेत्रामध्ये झालेल्या बदलांमुळे बँकींग व्यवसायामध्ये जोखीम निर्माण होत असते. बँकींग क्षेत्रामध्ये निर्माण झालेल्या जोखीमीची तीव्रता कमी करणे किंवा जोखीम पूर्णतः नाहीसी करणे आवश्यक असते. त्याकरिता बँकींग क्षेत्राकडून जोखीमीच्या परिणामांची तीव्रता कमी करण्याकरता प्रयत्न केले जातात. म्हणजेच बँकींग व्यवसायाकडून या जोखीमीचे विपरित परिणाम कमी करण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन केले जाते. हे जोखीम व्यवस्थापन करत असताना बँकींग क्षेत्रामध्ये निर्माणझालेली जोखीम कोणत्या प्रकारची आहे ? बँक व्यवसायातील कोणत्या प्रतिकूल बदलामुळे ती निर्माण झाली आहे हे जाणून घेणे जोखीम नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

बँकींग व्यवसायामध्ये निर्माण झालेली जोखीम ही नेमकी कोणत्या कारणाने निर्माण झाली आहे ? ती

निर्माण होण्याआधी बँकींग क्षेत्रामध्ये प्रामुख्याने कोणते बदल झाले की त्यामुळे धोका निर्माण झाला आहे ? हे जर बँकींग क्षेत्राने जोखीम नियंत्रणात आणण्यासाठी करीत असलेल्या जोखीम व्यवस्थापनामध्ये जाणून घेतले तर ते धोक्याचे परिणाम कमी करण्याकरता अत्यंत आवश्यक ठरेल. बँकींग क्षेत्राला एकदा का जोखीम कोणत्या प्रकारची आहे हेच समजले तर त्यानुसार जोखीम व्यवस्थापनाचा आराखडास बनवून जोखीम नियंत्रणाचे काम करणे अगदी सोपे होईल. बँकींग क्षेत्राने जोखीम नियंत्रणात आणण्याकरता केलेल्या जोखीम व्यवस्थापनामध्ये जोखीमीचे प्रकार हा घटक प्रामुख्याने विचारात घेतला पाहिजे. त्यामधूनच जोखीमीचे विपरित परिणाम कमी करण्याच्या दृष्टीने बँकेला योग्य ती उपायांची अंलबजावणी करता येईल.जोखीम म्हणजे एखाद्या क्षेत्रामध्ये अनिश्चिततेच्या पुष्कळ, वेगवेगळ्या स्त्रोतांमुळे निर्माण झालेली विपरित परिणाम घडवून आणणारी स्थिती होय. जोखीमीचे प्रामुख्याने कोणते प्रकार आहेत ते खालीलप्रमाणे.

**जोखमीचे प्रकार**

**वित्तीय जोखीम**

(Financial Risk)

१) पत जोखीम (Credit Risk)

२) रोखता जोखीम (Liquidity Risk)

३) व्याजदर जोखीम (Interest Rate Risk)

४) बाजार जोखीम (Market Risk)

५) पर्यावरणीय जोखीम (Environmental Risk)

६) नियमनात्मक जोखीम (Regulatory Risk)

**अवित्तीय जोखीम**

(Non-Financial Risk)

१) व्यावसायिक जोखीम

(Business Risk)

२) व्यूहरचनात्मक जोखीम

(Strategic Risk)

**वित्तीय जोखीम :**

वित्तीय क्षेत्रामध्ये झालेल्या बदलांमुळे किंवा चढ-उतारांमुळे अर्थव्यवस्थेध्ये बदल घडून आल्याने बँकींग क्षेत्रामध्ये ज्या जोखीम निर्माण होतात. त्यांस वित्तीय जोखीम असे म्हणतात. म्हणजेच जी जोखीम वित्तीय क्षेत्रातील बदलांचा परिणाम म्हणून निर्माण झालेली आहे. तसेच ती बँकींग क्षेत्राच्या कार्यावरती परिणाम घडवून आणते त्यास वित्तीय जोखीम म्हटले जाते. त्यामध्ये पुढील जोखीमींचा समावेश होतो.

**१) पत जोखीम (Credit Risk) :**

जेव्हा कर्जदार बँकेसोबत केलेल्या व्यवहाराच्या बंधनांची पूर्तता करण्यामध्ये ठरतात, तेव्हा बँकेला पतजोखीमीला सामोरे जावे लागते. बँकेच्या कर्जावरील व्याज व कर्जाचे हप्ते मुदतीमध्ये परतफेड न झाल्याने जी जोखीम निर्माण होते, त्यास 'पत जोखीम' असे म्हणतात. चुकीचे पत व्यवस्थापन हे पतजोखीमीस कारणीभूत ठरणारा महत्त्वाचा घटक आहे. माहितीचा अभाव, योग्य संवादाचा अभाव, माहिती परीक्षणाचा अभाव, अपर्याप्त

पतनिश्चिती पद्धती यासारख्या कारणांनी पतव्यवस्थापन कमी दर्जाचे राहिल्याने पत धोका निर्माण होतो.

## २) रोखता जोखीम (Liquidity Risk) :

जेव्हा बँक आपल्या ग्राहकांच्या कर्जाच्या आणि ठेवीच्या मागणीची पूर्तता करण्यास असमर्थ ठरतात तेव्हा बँकेला रोखता जोखीमेला सामोरे जावे लागते. रोखता जोखीमेलाच 'तरलता जोखीम'असे देखील म्हणतात. बँकेने ठेवीदारांना त्यांची रक्कम मागताच क्षणी परत करण्याचे आश्वासन दिलेले असते जेव्हा विशिष्ट परिस्थितीमध्ये बँक हे आश्वासन पूर्ण करण्यामध्ये असमर्थ ठरतात, तेव्हा त्या रोखता जोखीमेला सामोरे जातात. दैनंदिन व्यवहारासाठी बँकांना स्वत: जवळ रोख रक्कम बाळगावे लागते. ग्राहकांच्या गरजांची पूर्तता वेळेवर करण्यासाठी ती आवश्यक असते. बँक आणि ग्राहक यांच्यातील संबंध विश्वासावर आधारित ठेवायचे असतात. ग्राहकांची केव्हाही कर्जाला मागणी येऊ शकते, या उद्देशाने बँका रोखता रूपांतर सहजपणे रोखतेत करता येते. रोखता धोका हा बदलत्या काळाबरोबर, किंमतीतील चढ-उताराबरोबर जास्तच वाढत जाणारा असतो.

## ३) व्याजदर जोखीम (Interest Rate Risk) :

अर्थव्यवस्थेतील चढ-उतारांमधून व्याजदरामध्ये बदल घडून आल्याने मालमत्तेचे किंवा संपत्तीचे मूल्य कमी-अधिक होऊन जे नुकसान सहन करावे लागते; त्यास 'व्याजदर जोखीम' असे म्हणतात. व्याजदरातील चढउतार हे वित्तीय क्षेत्रामध्ये घडून येणारे बदल असल्याने या जोखीमीचा समावेश वित्तीय जोखीमीमध्ये करण्यात येतो. भांडवलाची मागणी आणि भांडवलाचा पुरवठा यामध्ये बदल घडून आल्याने व्याजदर बदलतात, तसेच देशाच्या मध्यवर्ती बँकेचे पतविषयक धोरण देखील व्याजदर बदलास कारणीभूत ठरते. कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थामधील स्पर्धा देखील व्याजदर बदलास कारणीभूत ठरते. या कारणाने जेव्हा व्याजदर बदलतो व ठेवींवरील व्याजदर आणि कर्जावरील व्याजदर यामधील अंतर कमी होते तेव्हा बँकेला व्याजदर जोखीमेला सामोरे जावे लागते.

## ४) बाजार जोखीम (Market Risk) :

बाजारपेठेतील बदलांचा परिणाम म्हणून जेव्हा बँक व्यवसायासमोर विविध स्वरूपाचे धोके निर्माण होतात, तेव्हा त्यास बाजार जोखीम असे म्हणतात. भांडवलशाही राष्ट्रांमध्ये तेजी-मंदीच्या कालखंडात तीव्र स्वरूपाचे चढ-उतार घडून येत असतात आणि त्यामधून वस्तू सेवा यांच्याबरोबरच शेअर्स, कर्जरोखे, सोने, गुंतवणूक यांचे मूल्य देखील तीव्र स्वरूपात बदलते. समजा बाजारातील बदलांचा परिणाम म्हणून बँकेने शेअर्स, कर्जरोखे, सोने यामध्ये केलेल्या गुंतवणूकीचे मूल्य घटत जाते, तेव्हा बाजार जोखीम निर्माण होते. या जोखीमेच्या मापनासाठी व्याजदरातील बदलांची तीव्रता, रोखे बाजारातील बदल, विनिमय दरातील बदल, किंमतीमधील चढ-उतार, शेअर बाजारातील चढ-उतार हे घटक विचारात घेतले जातात.

## ५) पर्यावरणीय जोखीम (Environmental Risk) :

अर्थव्यवस्थेवरील पर्यावरणीय बदलाचा परिणाम म्हणून जेव्हा बँक व्यवसायासमोर जोखीम निर्माण होते, तेव्हा त्याचा समावेश पर्यावरणीय जोखीममध्ये केला जातो. विकास साध्य करत असताना पाणी-प्रदूषण, हवाप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, मृदा-प्रदूषण यासारखे बदल घडून येतात. त्यामधून शेतजमिन जर मोठ्या प्रमाणात

प्रदूषित होत असेल किंवा विशिष्ट भागामध्ये प्रदूषणाचा परिणाम म्हणून त्याठिकाणच्या संपत्तीचे, मालमत्तेचे मूल्य अचानक कमी होत असेल आणि त्याच संपत्तीच्या तारणावर बँकेने पूर्वी कर्ज दिले असेल तर कर्जाच्या परतफेडीची शक्यता कमी राहून बँक व्यवसाय धोक्यात येऊ शकतो त्यालाच पर्यावरणीय जोखीम असे म्हणतात.

**६) नियमनात्मक जोखीम (Regulatory Risk) :**

बँकींग क्षेत्रामध्ये नियमनात्मक बदल घडून आल्याने जी जोखीम निर्माण होते त्यास नियमनात्मक जोखीम असे म्हणतात. जेव्हा सरकारमार्फत किंवा देशाच्या मध्यवर्ती बँकेमार्फत अस्तित्वातील बँकींग नियमनामध्ये बदल करून नविन नियमावली तयार करून तिचा अवलंब केला गेला तर बँक व्यवसायासमोर काही समस्या निर्माण होऊ शकतात त्यास नियमनात्मक जोखीम असे म्हणतात. उदाहरणार्थ :- बँकांचे राष्ट्रीयकरण, बँकांचे खाजगीकरण बँकांचे विलीनीकरण यासारख्या नियमनात्मक बदलामुळे बँक व्यवसाय जोखीमेला सामोरे जातो, त्याचा समावेश नियमात्मक जोखीमेत केला जातो.

**अवित्तीय जोखीम (Non-Financial Risk) :**

बँकींग क्षेत्रामध्ये जेव्हा वित्तीय घटकांच्याशिवाय अन्य घटकांनी जोखीम निर्माण होत असते. तेव्हा त्यास अवित्तीय जोखीम असे म्हणतात. अवित्तीय जोखीमीचे प्रकार पुढीप्रमाणे .

**१) व्यावसायिक जोखीम (Business Risk) :**

बँकींग व्यवसाय कार्य करीत असताना जेव्हा सभासदांना, ग्राहकांना अधिक सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने विशिष्ट धोरणे राबविली जातात त्यामधून जोखीम निर्माण होते, त्यास 'व्यावसायिक धोका' म्हणतात. जेव्हा आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ई-बँकींग, मोबाईल-बँकींग यांचा वापर करून जर जोखीम निर्माण होत असेल तर त्यास व्यावसायिक जोखीम म्हणतात.

**२) व्यूहरचनात्मक जोखीम (Strategic Risk) :**

जेव्हा अर्थव्यवस्थेध्ये मूलभूत बदल किंवा राजकीय बदल घडून आल्याने जोखीम निर्माण होते तेव्हा तिचा समावेश व्यूहरचनात्मक जोखीमेध्ये केला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेध्ये खाजगी बँकांचे राष्ट्रीयकरण, नवीन आर्थिक धोरण स्विकारण्यात आले त्यामधून बँक व्यवसायासमोर जी जोखीम निर्माण झाली तिचा समावेश या जोखीमेध्ये करण्यात येतो.

वरील मुद्दयांवरून जोखीमेचे विविध प्रकार कोणकोणते आहेत हे स्पष्ट होण्यास मदत होते.

**२.२.३ ब. जोखीम व्यवस्थापनाची तत्त्वे :**

सन १९९९ मध्ये बँकांना जोखिम व्यवस्थापनासाठी योग्य अशा मार्गदर्शक तत्त्वाची गरज आहे. हे आरबीआयच्या लक्षात आले. त्यानंतर आरबीआयने त्या मार्गदर्शक तत्त्वाची मांडणी केल्याचे दिसून येते. व्यापार चक्रे, आर्थिक बदल, राजकीय सत्ती, अयोग्य निर्णय, वाढती स्पर्धा, तांत्रिक बदल, यासारख्या अनेक कारणांनी बँक व्यवसायामध्ये जोखीम निर्माण होत असते. या जोखीमीच्या व्यवस्थापनासाठी अनेक उपायांची अंलबजावणी

केली जाते हे जोखीम व्यवस्थापन करत असताना काही मार्गदर्शक तत्वे समोर ठेवावी लागतात. बँक व्यवसायामध्ये उद्‌भवणारी जोखीम नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीकोनातून जो मार्गदर्शक नियमावलीचा किंवा नियमांचा संच तयार केला जातो, त्यास बँक जोखीम व्यवस्थापनाची तत्वे असे म्हणतात.

१) **मूल्यनिर्मिती करणारे** : आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वानुसार बँक व्यवसायामध्ये निर्माण झालेल्या जोखीमीचे व्यवस्थापन करत असताना स्विकारण्यात आलेले जोखीम व्यवस्थापन हे मूल्य निर्माण करणारे असावे. म्हणजेच मूल्यनिर्मिती हे जोखीम व्यवस्थापनाचे अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शक तत्व आहे.

२) **व्यवसाय प्रक्रियेत सहभागी होणारे :** जोखीम व्यवस्थापन हे जसे मूल्यनिर्मित करणारे असावे तसेच ते व्यवसाय प्रक्रियेध्ये सहभागी होऊन व्यवसाय प्रक्रियेचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून कार्य करणारे असावे असे मार्गदर्शक तत्व आरबीआयने स्पष्ट केले आहे. जर जोखीम व्यवस्थापन व्यवसाय प्रक्रीयेध्ये सहभागी होत असेल तरच व्यवसायामध्ये निर्माण झालेल्या कारण, परिणाम, उपाय, स्वरूप, व्याप्ती या सर्व बाबींचा अभ्यास करून त्यांच्यावरती योग्य ते प्रभावी उपाय योजू शकते. त्यामधून बँक व्यवसायामध्ये निर्माण होणाऱ्या धोक्याची तीव्रता कमी होऊ शकते.

३) **निर्णयप्रक्रीयेत सहभागी होणारे :** बँक व्यवसायामध्ये निर्माण होणाऱ्या धोक्याचे व्यवस्थापन करत असताना जे धोका व्यवस्थापन स्वीकारले जाते ते बँक व्यवसायाच्या निर्णय प्रक्रीयेमध्ये सहभागी होणारे असावे असे मार्गदर्शक तत्व आरबीआयने स्पष्ट केले आहे. जर जोखीम व्यवस्थापन बँक व्यवसायाच्या निर्णय प्रक्रीयेत सहभागी होत नसेल किंवा सहभागी होऊ दिले जात नसेल तर धोका व्यवस्थापनामध्ये ज्या विविध उपायांची अंमलबजावणी सक्षमपणे करता येत नाही त्यामधून धोक्याचे पूर्णत: निर्मूलन करणे शक्य होत नाही. म्हणूनच धोका व्यवस्थापन हे व्यवसायाच्या निर्णय प्रक्रीयेचा भाग असावे किंवा निर्णय प्रक्रीयेत सहभागी होणारे असावे आवश्यक ठरते.

४) **अनिश्चिततेची तीव्रता दर्शविणारे :** बँक व्यवसायामध्ये धोका निर्माण होण्यामध्ये अर्थव्यवस्थेतील विविध घटकांच्या बदलामधील अनिश्चितता कारणीभूत ठरत असते. बँक जोखीम व्यवस्थापनामध्ये जी मार्गदर्शक तत्वे स्वीकारली जातात त्यामध्ये अनिश्चितता किती तीव्र स्वरूपाची आहे किंवा अनिश्चिततेची तीव्रता काय आहे ? हे अत्यंत महत्वाचे असते. म्हणूनच अनिश्चिततेची तीव्रता दर्शविणे हे जोखीम व्यवस्थापनाचे मार्गदर्शक तत्व मानले जाते.

५) **पद्धतशीर असावे :** बँक व्यवसायामध्ये विविध स्वरूपाच्या अनिश्चिततेने निर्माण झालेली जोखीम कमी करण्याच्या दृष्टीकोनातून ज्या जोखीम व्यवस्थापनाची अंमलबजावणी केली जाते ती पद्धतशीर असावी. शास्त्रशुद्ध असावी असे मार्गदर्शक जर जोखीम व्यवस्थापन पद्धतशीर असेल तर धोका निर्मितीची कारणे, परिणाम, स्वरूप, व्याप्ती याचे अचूक विश्लेषण होऊन योग्य त्या उपायांची अंमलबजावणी करता आल्याने धोक्याची तीव्रता कमी होण्यास मदत होते म्हणूनच पद्धतशीर जोखीम व्यवस्थापन हे मार्गदर्शक तत्व मानले गेले.

**६) रचनात्मक असावे :** बँक जोखीम व्यवस्थापन हे रचनात्मक असावे अशा स्वरूपाचे मार्गदर्शक तत्व आरबीआयने स्पष्ट केलेले आहे. बँक व्यवस्थापन जे रचनात्मक असेल म्हणजेच जोखीम व्यवस्थापनाची सर्व टप्पे निश्चित असतील तर जोखीम व्यवस्थापन यशस्वी ठरून बँक जोखीम नियंत्रणात येण्यास व त्याची तीव्रता कमी होण्यास मदत होते.

**७) उत्कृष्ट माहितीवर आधारलेले** : बँक जोखीम व्यवस्थापन हे जसे मूल्यनिर्मिती करणारे, अनिश्चिततेची तीव्रता दर्शविणारे, पद्धतशीर, रचनात्मक असावे तसेच ते उत्कृष्ट माहितीवरती आधारलेले असावे. असे तत्व आरबीआयने स्पष्ट केले आहे. जर बँक जोखीम व्यवस्थापन उत्कृष्ट माहितीवरती आधारलेले नसेल तर जोखीमीची अचूक कारणे स्पष्ट होत नाहीत. त्याची व्याप्ती, स्वरूप संदिग्ध राहते परिणामाची कल्पना येत नाही व उपाययोजना अचूक न करता आल्याने जोखीमीचा प्रभाव कमी करण्यात अडचणी निर्माण होतात म्हणूनच उत्कृष्ट माहितीवर आधारलेले जोखीम व्यवस्थापन महत्त्वपूर्ण मानले जाते.

**८) पारदर्शक स्वरूपाचे असावे :** बँक व्यवसायामध्ये निर्माण झालेल्या जोखीमीच्या नियंत्रणासाठी स्वीकारलेले जोखीम व्यवस्थापन हे पारदर्शक स्वरूपाचे असावे असे मत आरबीआयने स्पष्ट केले आहे. जोखीम व्यवस्थापन, जोखीम व्यवस्थापनातील धोरणे, तत्वे जोखीम व्यवस्थापनातील उपाययोजना हे सर्व जर पारदर्शक असेल तर जोखीम व्यवस्थापनाची कार्य पद्धती उपायांची अंलबजावणी अधिक सुस्पष्ट स्वरूपात राहिल्याने जोखीम व्यवस्थापन प्रभावीपणे यशस्वी होण्यास मदत होते. याउलट त्याच्या अंलबजावणीमध्ये पारदर्शकता नसेल संदिग्धता असेल तर ते अयशस्वी होऊन बँक व्यवसायाला मोठ्या प्रमाणात नुकसानीस सामोरे जावे लागते.

**९) सर्वसमावेशक असावे :** बँक धोका व्यवस्थापन ज्याप्रमाणे पारदर्शक असणे आवश्यक असते त्याचप्रमाणे ते सर्वसमावेशक देखील असावे हे तत्व आरबीआयने बँक जोखीम व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये समाविष्ट केले आहे. म्हणजेच बँक मध्ये निर्माण झालेल्या धोक्याचे व्यवस्थापन करत असताना व्यवस्थापनाच्या प्रत्येक टप्प्यामध्ये असणारे अनेक घटक सामावून घेऊन व्यवस्थापन करणे आवश्यक असते. कर्मचारी, अधिकारी वर्ग, व्यवस्थापन मंडळ या सर्वच घटकांना सामावून घेऊन तर धोका नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला गेल्यास बँक जोखीम व्यवस्थापन यशस्वी ठरण्यास मदत होते अन्यथा त्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होऊ शकतात.

**१०) मानवी घटकांना सामावून घेणारे :** आरबीआयने बँक व्यवस्थापनाबाबत अनेक मार्गदर्शक तत्वे सांगितली त्यामध्ये बँक जोखीम व्यवस्थापन हे मानवी घटकांना सामावून घेणारे असावे हे एक मार्गदर्शक तत्व सांगितले आहे.

**११) सुयोग्य धोरण सुचविणारे असावे :** बँकेमध्ये निर्माण झालेला धोका नियंत्रणात आणण्यासाठी जे बँक जोखीम व्यवस्थापन स्वीकारले जाते, ते त्या बँकेस सुयोग्य धोरण सुचविणारे असावे, असेही एक मार्गदर्शक तत्व आरबीआयने स्पष्ट केले आहे. या तत्वानुसार जोखीम व्यवस्थापनाची एक अत्यंत महत्त्वाची जबाबदारी असते. ती म्हणजे बँकेसमोर निर्माण झालेली जोखीम कमी करणे तसेच या स्वरूपाची जोखीम पुढच्या कालखंडामध्ये बँकेसमोर निर्माण होऊ नये यासाठी सर्वसमावेशक, अचूक, शास्त्रशुद्ध, धोरण उपलब्ध करून देणे आवश्यक असते.

**१२) लवचिक असावे :** बदलत्या परिस्थितीला अनुसरून जोखीम व्यवस्थापनामध्ये बदल करता येईल असे जोखीम व्यवस्थापनाचे धोरण म्हणजेच जोखीम व्यवस्थापनाचे लवचिक धोरण होय. आरबीआयने जोखीम व्यवस्थापनाचे धोरण हे अर्थव्यवस्थेतील चढउतारांबरोबर विविध चलांमध्ये होणाऱ्या बदलांबरोबर अगदी सहज बदलू शकेल यास्वरूपात लवचिक असावे असे तत्त्व आरबीआयने सांगितलेले आहे. बदलत्या परिस्थितीला योग्य प्रतिसाद देणारे जोखीम व्यवस्थापन धोरण असेल तर ते अधिक प्रभावी ठरू शकते व जोखीमीचे अचूक नियंत्रण त्यामधून साध्य होऊ शकते.

### २.२.४. अ. मालमत्ता दायित्व समितीचे संघटन (Organization of ALCO) :

मालमत्ता दायित्व समितीमधील सदस्यांची संख्या ही त्या – त्या बँकेच्या किंवा व्यवसायाच्या आकारावर तसेच व्यवसायाच्या संघटनात्मक गुंतागुतीवर अवलंबून असते. सीईओ सीएमडी हे सदर समितीचे मुख्य किंवा अध्यक्ष असतात व ते वरिष्ट अधिकाऱ्याच्या निर्णयाबाबत योग्य ती दक्षता घेऊन कार्यवाही करण्याच्यादृष्टीने महत्त्वाची भूमीका पार पाडत असतो. सदर समितीमधील अन्य सदस्य पुढील प्रमाणे असतात.

१. गुंतवणूक विभाग प्रमूख

२. पत विभाग प्रमुख

३. संसाधन व्यवस्थापन आणि नियोजन विभाग प्रमुख

४. निधी व्यवस्थापन विभाग प्रमुख

५. ट्रेझरी विभाग प्रमूख

६. आंतरराष्ट्रीय बँकींग मुख्य

७. आर्थिक संशोधन प्रमुख

८. तंत्रज्ञान विभाग प्रमुख देखील सदर समितीचे निमंत्रीत सदस्य असतात.

९. या सर्व सदस्यांच्या सोबतच शिवाय काही बँकांमध्ये आवश्यकतेनुसार अन्य काही उप समित्यांचे गठण केले जाते तसेच सहाय्यक गट सुध्दा निर्माण केले जातात.

या सर्व सदस्यांच्या समावेशासह मालमत्ता दायित्व समिती प्रभावीपणे कार्य करते. बँकेमध्ये निर्माण येऊ घातलेल्या धोक्यांचा अंदाज घेऊन योग्य ती दक्षता घेऊन सदर धोका किंवा त्या धोक्यांची तीव्रता कमी करण्याचे कार्य सदर समिती करत असते.

### २.२.४.ब. मालमत्ता दायित्व समितीची कार्ये (Functions of ALCO) :

बँकांच्या धोका व्यवस्थापन प्रक्रियेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रभावी समितीची भूमीका महत्त्वपूर्ण असते. सदर समितीवर धोका व्यवस्थापनाबाबत संपूर्ण जबाबदारी सोपविली जाते तसेच धोका व्यवस्थापनाबाबत धोरण निश्चित करण्याबरोबरच पुढील अनेक कार्ये करावी लागतात.

१. धोका व्यवस्थापनाबाबत धोरणाची अंमलबजावणी करण्याचे कार्य सदर समितीवर सोपविले जाते.

२. रोखतेच्या मर्यादा निश्चित करणे, व्याजदर निश्चिती, विदेशी विनीमय, रोखे किंमत धोक्याबाबत धोरणाच्या अंमलबजावणीचे कार्य ही या समितीला करावे लागते.

३. मालमत्ता दायित्व समितीमध्ये बँकेच्या सीईओसह अन्य सर्व वरिष्ठ व्यवस्थापनाचा समावेश करण्यात आलेला असतो व ते सर्वजन निश्चित केलेल्या मर्यादांचे पालन सुनिश्चित करण्याचे कार्य करतात. तसेच ते बँकाच्या मालमत्ता दायित्वाच्या बाजूने व्यावसायीक धोरण निश्चित करणे आणि धोका व्यवस्थापनाची उद्दिष्ट्ये निश्चित करण्याचे कार्य करतात.

४. कार्यरत कर्मचारी वर्ग हा मालमत्ता दायित्व समितीला धोक्याबाबतच्या संपुर्ण माहितीचे विश्लेषण, देखरेख आणि अहवाल देण्याबाबत संपुर्णत: जबाबदार मानला जातो.

५. कार्यरत कर्मचारी वर्ग हा बाजारपेठेमध्ये बँक ताळेबंदाच्या अनुषंगाने पुढील कालखंडात अपेक्षीत असणाऱ्या महत्त्वपूर्ण बदलांचा अंदाज घेऊन त्याच्या आधारे बँकेने कोणती दक्षता घेणे गरजेचे आहे याबाबत सुचना देण्याचे कार्य करतो.

६. मालमत्ता दायित्व समिती ही व्याजदर तसेच रोखता जोखिमेच्या संदर्भात योग्य ती दक्षता घेऊन ताळेबंदाचे नियोजन करण्याच्या अनुषंगाने महत्वपुर्ण भुमिका पार पाडते.

७. प्रत्येक बँकेमध्ये मालमत्ता दायित्व समितीची कार्ये आणि भुमिका स्पष्ट केलेल्या असतात. त्या अनुषंगाने समितीने घेतलेल्या निर्णयांच्या पुर्ततेचे कार्य देखील या समितीला करावे लागते.

८. बँकेच्या जोखिम स्तरावर देखरेख ठेवण्याचे कार्य देखील मालमत्ता दायित्व समितीला करावे लागते.

९. अगोदरच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांची योग्यपध्दतीने अंमलबजावणी होत आहे की नाही याचे पाहणी व परिक्षण करण्याचे कार्य मालमत्ता दायित्व समितीस करावे लागते.

१०. बँकेचा चालू व्याजदर काय आहे याचा विचार करून व्यवसायाची भविष्यकालीन धोरण काय असावे याबाबत निर्णय घेण्याचे कार्य सदर समितीला करावे लागते.

११. निधी उभारण्याच्या अनुषंगाने कोणत्या मार्गाचा अवलंब करणे अधिक योग्य ठरेल त्याचा अग्रक्रम काय असेल याबाबत निर्णय घेण्याचे कार्य देखील सदर समितीला करावे लागते.

१२. रोखता जोखमीचे व्यवस्थापन करणे.

१३. बाजार जोखमीचे व्यवस्थापन करण्याचे कार्य करणे.

१४. व्यापार धोक्याचे व्यवस्थापन करणे.

१५. निधी आणि भांडवलाबाबत नियोजन करणे.

१६. नफा नियोजन आणि व्यवसाय वृध्दीच्या दृष्टीने अंदाज मांडणे

१७. सदर समिती भविष्यकालीन कालखंडात व्याजदरातील बदल कसा असेल याचा विचार करून निधीची उभारणी स्थिर दराने करावी की बदलत्या दराने करावी, किरकोळ की घाऊक ठेवी स्विकारावयाच्या, नाणेबाजारातून की भांडवलबाजारातून निधी उभारावा, देशांतर्गत बाजारातून की विदेशी बाजारातून निधी उभारावा याबाबत निर्णय घेऊन त्या अनुषंगाने योग्य ती धोरणात्मक बदल करण्याचे कार्य देखील मालमत्ता दायित्व समितीला करावे लागते.

वरील स्वरूपाची विविध कार्ये मालमत्ता दायित्व समितीला पार पाडावी लागतात.

### २.४.ब. जोखिम व्यवस्थापनाबाबत केस स्टडी (Case Studies on Risk Management) :

सदर विषयाला अनुसरूप विद्यार्थ्यांना विषयाची अधिक माहिती मिळावी, अधिक अभ्यास व संशोधनाला चालना मिळावी यासाठी विविध विषयांच्या अनुषंगाने केस स्टडीच्या स्वरूपात विद्यार्थ्यांनी अभ्यासावा.

**केस स्टडीचे विषय :**

१. जोखिम व्यवस्थापन अभ्यास.

२. बँकिंग क्षेत्रातील जोखिमींचा अभ्यास.

केस स्टडीची मांडणी करत असताना पुढील घटक विचारात घेऊन मांडणी केल्यास संशोधकास अधिक चांगल्या पध्दतीने विषयाचा अभ्यास व मांडणी करण्याच्या दृष्टीने फायदा होईल.

१. विषयाबाबत प्रस्तावना मांडण्यात यावी.

२. विषयाचे स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करावे.

४. विषयाचे महत्त्व व मर्यादा स्पष्ट कराव्यात.

५. गृहीतांची मांडणी करावी.

६. माहिती संकलन व वर्गीकरण करावे.

७. निष्कर्ष आणि शिफारसीचा समावेश करावा.

### २.३ सारांश :

बँकींग क्षेत्र हे अर्थव्यवस्थेमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याने तसेच अनेक क्षेत्रांचा केंद्रबिंदू असल्याने बँकींग जोखीम व्यवस्थापन हा अत्यंत महत्त्वाचा विषय मानला जातो. बँका या बचतदार व गुंतवणूकदार या दोहोंच्यामध्ये मध्यस्थांची भूमिका बजावत असतात. अतिरिक्त बचत जमा करून ती आवश्यक त्या ठिकाणी गुंतवणूक करण्याचे कार्य करण्याबरोबरच पतपैशाची निर्मिती देखील या क्षेत्रामध्ये होते. पतपैशाचे प्रमाण कमी-अधिक झाल्यास अर्थव्यवस्था धोक्यात येऊ शकते, तर बचतदारांचा पैसा त्यांनी मागता क्षणी परत करता आला नाही किंवा कर्जदारांनी घेतलेली कर्जे व्याजासहीत परत फेडली नाही तर बँकींग समोर मोठी जोखीम निर्माण होऊ शकते. म्हणूनच बँक जोखीम व्यवस्थापन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## २.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ. खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) बँकींग क्षेत्रामध्ये जेव्हा वित्तीय घटकांच्याशिवाय अन्य घटकांनी जोखीम निर्माण होत असते. तेव्हा त्यास . . . . . जोखीम असे म्हणतात.

अ) अवित्तीय ब) वित्तीय क) बँकिंग ड) यापैकी नाही.

२) सन . . . . . मध्ये आरबीआयने भारतातील व्यापारी बँकांना भांडवल पर्याप्तता निकषाचे पालन करण्याचे बंधन लादण्यात आले.

अ) १९९० ब) १९९२ क) १९९४ ड) १९९६

३) जोखीमीचे प्रामुख्याने ------- प्रकार पडतात.

अ) दोन ब) तीन क) चार ड) सहा

४) वित्तीय जोखीम या प्रकारात--------- जोखीमीचा समावेश होतो.

अ) व्यावसायिक जोखीम ब) पत जोखीम क) रोखता जोखीम ड) ब व क

५) बँकेच्या कर्जावरील व्याज व कर्जाचे हप्ते, मुदतीमध्ये परतफेड न झाल्याने जी जोखीम निर्माण होते, तिला ----- जोखीम म्हणतात.

अ) रोखता ब) बाजार क) व्याजदर ड) पत

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) 'जोखीम' म्हणजे काय ?

२) 'जोखीम व्यवस्थापनाची तत्त्वे' म्हणजे काय ?

३) भारताच्या अर्थमंत्र्यानी एम. नरसिंहम् यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील बँकींग क्षेत्रातील सुधारणांची पाहणी करण्यासाठी व वित्तीय सुधारणा सूचविण्यासाठी समितीचे गठन केले कधी केले ?

४) वित्तीय धोके कोणते ?

५) 'अवित्तीय जोखीम' म्हणजे काय ?

## २.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे

**अ. खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) अ) अवित्तीय

२) ब) १९९२

३) अ) दोन

४) ड) ब व क

५) ड) पत

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अर्थव्यवस्थेतील विविध चलांध्ये काही अनिश्चित, असंभाव्य बदल झाल्याने व्यवसायामध्ये काही विपरित बदल होतात, त्यांना 'जोखीम' असे म्हणतात.

२) विविध घटकांनी प्रभावित होऊन निर्माण होणाऱ्या जोखीमीच्या व्यवस्थापनासाठी जी मार्गदर्शक नियमावली किंवा नियमांचा संच तयार केला जातो, त्यास 'जोखीम व्यवस्थापनाची तत्त्वे' म्हणतात.

३) १९९८

४) १) पत धोका २) रोखता धोका ३) व्याजदर धोका ४) पर्यावरणीय धोका

५) बाजार धोका ६) नियमनात्मक धोका

५) बँकींग क्षेत्रामध्ये जेव्हा वित्तीय घटकांच्याशिवाय अन्य घटकांनी जोखीम निर्माण होते, तेव्हा त्यास 'अवित्तीय जोखीम' म्हणतात.

**२.६ पारिभाषिक शब्द**

**१) वित्तीय जोखीम** : वित्तीय क्षेत्रामध्ये झालेल्या बदलांमुळे किंवा चढ-उतारुंळे अर्थव्यवस्थेध्ये बदल घडून आल्याने बँकींग क्षेत्रामध्ये ज्या जोखीम निर्माण होतात. त्यांस वित्तीय जोखीम असे म्हणतात.

**२) पत जोखीम :** जेव्हा कर्जदार बँकेसोबत केलेल्या व्यवहाराच्या बंधनांची पूर्तता करण्यामध्ये ठरतात, तेव्हा बँकेला पतजोखीमीला सामोरे जावे लागते. बँकेच्या कर्जावरील व्याज व कर्जाचे हप्ते मुदतीमध्ये परतफेड न झाल्याने जी जोखीम निर्माण होते, त्यास 'पत जोखीम' असे म्हणतात.

**३) रोखता जोखीम :** जेव्हा बँक आपल्या ग्राहकांच्या कर्जाच्या आणि ठेवीच्या मागणीची पूर्तता करण्यास असमर्थ ठरतात तेव्हा बँकेला रोखता जोखीमेला सामोरे जावे लागते. रोखता जोखीमेलाच 'तरलता जोखीम'असे देखील म्हणतात.

**४) व्याजदर जोखीम :** अर्थव्यवस्थेतील चढ-उतारांमधून व्याजदरामध्ये बदल घडून आल्याने मालमत्तेचे किंवा संपत्तीचे मूल्य कमी-अधिक होऊन जे नुकसान सहन करावे लागते; त्यास 'व्याजदर जोखीम' असे म्हणतात.

**५) बाजार जोखीम :** बाजारपेठेतील बदलांचा परिणाम म्हणून जेव्हा बँक व्यवसायासमोर विविध स्वरूपाचे धोके निर्माण होतात, तेव्हा त्यास बाजार जोखीम असे म्हणतात.

**६) पर्यावरणीय जोखीम :** अर्थव्यवस्थेवरील पर्यावरणीय बदलाचा परिणाम म्हणून जेव्हा बँक व्यवसायासमोर जोखीम निर्माण होते, तेव्हा त्याचा समावेश पर्यावरणीय जोखीममध्ये केला जातो.

**७) नियमनात्मक जोखीम :** बँकींग क्षेत्रामध्ये नियमनात्मक बदल घडून आल्याने जी जोखीम निर्माण होते त्यास नियमनात्मक जोखीम असे म्हणतात.

**८) अवित्तीय जोखीम :** बँकींग क्षेत्रामध्ये जेव्हा वित्तीय घटकांच्याशिवाय अन्य घटकांनी जोखीम निर्माण होत असते. तेव्हा त्यास अवित्तीय जोखीम असे म्हणतात.

**९) व्यावसायिक जोखीम :** बँकींग व्यवसाय कार्य करीत असताना जेव्हा सभासदांना, ग्राहकांना अधिक सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने विशिष्ट धोरणे राबविली जातात त्यामधून जोखीम निर्माण होते, त्यास 'व्यावसायिक धोका' म्हणतात.

**१०) व्यूहरचनात्मक जोखीम :** जेव्हा अर्थव्यवस्थेध्ये मूलभूत बदल किंवा राजकीय बदल घडून आल्याने जोखीम निर्माण होते तेव्हा तिचा समावेश व्यूहरचनात्मक जोखीममध्ये केला जातो.

### २.७ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहा**

१) वित्तीय जोखीम व तिचे प्रकार

२) बँकिंगविषयक बेसल निकष

३) पत जोखीम

४) जोखीमीचा अर्थ व व्याख्या

५) भांडवल पर्याप्तता

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न**

१) मालमत्ता उत्तरदायित्त्व व्यवस्थापनाबाबत आरबीआयची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करा.

२) दूरदर्शी आणि असुरक्षीतता निकष विशद करा.

३) बँकिंगविषयक बेसल निकषांची चर्चा करा.

४) जोखीम व्यवस्थापनाची तत्वे सविस्तर स्पष्ट करा.

५) मालमत्ता दायित्व समितीची कार्ये स्पष्ट करा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


1. IIBF, Credit and Risk Management, McMillan Publications
2. Jyotsna Sethi and Nishwan Bhatia, Elements of Banking and Insurance, Prentice Hall of India: New Delhi
3. M.L.Tannan, C.R. Datta & S.K. Kataria (2011) Banking Law and Practice, Wadhwa & Company, Nagpur
4. The Bankers'Books Evidence Act–1891
5. The Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act–(SARFASI-2002)
6. Vasant C. Joshi and Vinay V Joshi (1998), Managing Indian Banks: The Challenges Ahead, Response Books, New Delhi.


✻✻✻

# घटक क्र. ३
# बँकिंग आणि सायबर कायदे
# ( Banking & Cyber Laws )

**अनुक्रमणिका**

३.०. उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१. चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ – चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे स्वरूप – चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील तरतुदी – बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायदा १८९१ – बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यातील तरतुदी

३.२.२. सर्फेसी कायदा २००२ – बँका व वित्तीय संस्थांना दिलेले अधिकार – कर्जदाराचे हक्क – बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायदा २००२ – बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्याचे उद्देश – बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यातील महत्त्वपुर्ण तरतुदी

३.२.३ बँकिंग क्षेत्रातील सायबर गुन्ह्याचा अर्थ – सायबर गुन्ह्यांचे प्रकार – माहिती तंत्रज्ञान कायदा २००० – माहिती तंत्रज्ञान कायदा – २००० चे महत्त्व – माहिती तंत्रज्ञान कायद्याचे भाग – माहिती तंत्रज्ञान कायद्यातील सुधारणा –२००८ – माहिती तंत्रज्ञान सुधारणा कायदा २००८ मधील महत्वपूर्ण सुधारणा – डेटा सुरक्षा आणि महत्त्व – डेटा सुरक्षेसाठी घ्यावयाची काळजी

३.२.४ सायबर गुन्हेगारी घटनेचा अभ्यास – केस स्टडीचे विषय

३.३ सारांश

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे

३.६ पारिभाषिक शब्द

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये :

१. चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१, त्याचे स्वरूप, कायद्यातील तरतुदी तसेच बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायदा १८९१, कायद्यातील तरतुदी यांचे स्पष्टीकरण प्राप्त होण्यास मदत होते.

२. सर्फेसी कायदा २००२, बँका व वित्तीय संस्थांना दिलेले अधिकार, कर्जदाराचे हक्क, बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायदा २००२, कायद्याचे उद्देश, कायद्यातील महत्त्वपुर्ण तरतुदी स्पष्ट होण्यास मदत होते.

३. बँकिंग क्षेत्रातील सायबर गुन्ह्याचा अर्थ, प्रकार, माहिती तंत्रज्ञान कायदा २००० त्याचे महत्त्व, माहिती तंत्रज्ञान कायद्यातील सुधारणा, यासारख्या संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

४. डेटा सुरक्षा, सायबर गुन्हेगारी तसेच अन्य बँकिंग विषयक कायद्याच्या केस स्टडीच्या माध्यामातून स्पष्ट होते.

## ३.१ प्रास्ताविक :

दि न्यू टेस्टामेंट स्पष्ट करते की जेरुसलेम येथील मंदिरात प्राचीन काळापासून पैशाची देवाणघेवाण करणारे लोक होते. इ.स. पूर्व २००० मध्ये ग्रीसमध्ये इफेसस डेलकी व ऑलिम्पीया मंदिराचा उपयोग लोक पैसे साठविणे व पैशाचे व्यवहार करण्यासाठी करीत होते. त्या मंदिराचे पुजारी (Priests) मध्यस्थ म्हणून काम करीत असत. मध्ययुगात युरोपमध्ये ज्यू लोक पैसा व्याजाने देणे व घेण्याचे काम करीत होते. प्राचीन व्यापारी बँकाचा विकास पैशाच्या देवाण घेवाणीशी निगडीत होता. तत्कालीन राजांना कर्जाऊ पैसे देणे व त्याबदल्यात त्यांच्याकडून कर्जाच्या देवाण घेवाणीचे हक्क मिळविणे, याबाबत ॲडम स्मिथ म्हणतो सुरुवातीच्या काळात इटलीतील बँका, जेथे त्यांना बँक हे नांव मिळाले, त्या वित्तीय संस्था होत्या. त्या कर्जे देत होत्या त्यानंतर दीर्घकाळात बँका स्थापन झाल्या.

आजच्या स्वरुपातील सार्वजनिक बँकीग संस्था इटलीत सन ११५७ मध्ये दि बँक ऑफ व्हेनिस या नावाने सुरु झाली. जगात पहिली आधुनिक बँक इटलीतील जिनेव्हा येथे सन १४०६ मध्ये स्थापन करण्यात आली. पैशाची देखरेख करणे व तो सुरक्षित ठेवण्यासाठी आणि ग्राहकांच्या आदेशाप्रमाणे त्यांना पैसे देण्यासाठी स्थापन केलेली संस्था म्हणजे बँक होय.

बँकाच्या स्थापनेपासूनच त्याची जागतीक तसेच प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेमधील भूमीका सातत्याने वाढत गेल्याचे दिसुन येते. बँकांना आपली कार्ये सुरळीत पार पाडता यावीत यासाठी अनेक कायदे करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने चलनक्षम दस्तऐवज कायदा, बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायदा, सर्फेसी कायदा, बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायदा, माहिती तंत्रज्ञान कायदा यासारख्या कायद्यांचा समावेश होतो. या कायद्यांबाबात अधिक माहिती सदर प्रकरणामध्ये विचारात घेणार आहोत.

## ३.२. विषय विवेचन :

### ३.२.१.अ. चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ (Negotiable Instruments Act 1981) :

चलनक्षम दस्तऐवज सर्फेसी कायदा १८८१ हा चलनक्षम दस्तऐवज संदर्भातील पहिला कायदा असून बॅंकिंग

क्षेत्रातील सर्वात जुना कायदा आहे. भारतामध्ये ९ डिसेंबर १८८१ रोजी सदर कायदा संमत करण्यात आला असून मार्च १९८२ मध्ये तो कायदा लागू करण्यात आला. जवळपास १४० वर्षांपुर्वी करण्यात आलेल्या या कायद्यामध्ये थोड्याफार प्रमाणात सुधारणा केल्या असल्या तरी आजही त्याचे मुख्य स्वरूप आहे तसेच आहे. सदर कायद्यामध्ये १७ प्रकरणे आणि १४२ कलमे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ हा कायदा चलनक्षम दस्तऐवजांच्या संदर्भातील अत्यंत महत्त्वाचा कायदा असून त्यामध्ये वचनचिठ्ठ्या, हुंड्या व धनादेश या तीनच दस्तऐवजांचा समावेश करण्यात आलेला आहे. वाहक कर्जरोखा, रेल्वे पावती यासारख्या चलनक्षम दस्तऐवजांचा समावेश या कायद्यामध्ये करण्यात आलेला नाही.

**चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे स्वरूप :** हा कायदा चलनक्षम दस्तऐवजांच्या संदर्भातील वचनचिठ्ठ्या, हुंड्या व धनादेश या तीनच दस्तऐवजांचा समावेश यामध्ये करण्यात आलेला असला तरी याला पुढील अपवाद आहेत.

१. भारतीय कागदी चलन कायदा १९७१ मधील कलम २१ हे या कायद्याला अपवाद मानले आहे.

२. दस्तऐवजांच्या संदर्भात मूळ भाषेत असणाऱ्या परंपरा तसेच संकेत याचा कायद्यात समावेश नसावा.

३. लेखप्रमाणकासंबधी स्वतंत्र असा कायदा १९५२ मध्ये केला गेल्याने त्यामधील तरतुदी सदर कायद्यामधून वगळण्यात आल्या.

४. लेखप्रमाणक कायदा १९५२ मधील कलम १६ देखील चलनक्षम कायद्यामधून वगळण्यात आले आहे.

**चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी** : १८८१ साली वचनचिठ्ठ्या, हुंड्या व धनादेश या चलनक्षम दस्तऐवजांच्या संदर्भात जो कायदा करण्यात आला आहे त्यामध्ये पुढील तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

**१. व्याप्ती :** चलनक्षम दस्तऐवज कायदा १८८१ हा चलनक्षम दस्तऐवज संदर्भातील जो कायदा करण्यात आला त्याच्या पहिल्या प्रकरणामध्ये सदर कायद्याची व्याप्ती स्पष्ट केली आहे. तसेच या कायद्याच्या दुसऱ्या प्रकरणातील कलम ४, ५ आणि ६ मधील तरतुदीनुसार या कायद्याच्या कक्षेमध्ये वचनचिठ्ठया, हुंड्या व धनादेश यांचाच समावेश होतो हे स्पष्ट होते.

**२. चलनक्षम होणे :** चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील कलम १४ नुसार एखादा दस्तऐवज चलनक्षम होणे म्हणजे काय याचा अर्थ स्पष्ट करण्यात आला आहे. त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे वचनचिठ्ठी, हुंडी किंवा धनादेश या दस्तऐवजांचे एखाद्या व्यक्तीस हस्तांतरण करणे ज्यामूळे ती व्यक्ती त्या दस्तऐवजांचा कायदेशीर धारक झाल्यास तो दस्तऐवज चलनक्षम झाला असे म्हंटले जाते. चलनक्षम होण्याचे अ. सोपवणुकीद्वारे चलनक्षम आणि ब. पृष्ठांकनाव्दारे चलनक्षम असे दोन प्रकार केले जातात.

**३. चलनक्षम दस्तऐवज :** १८८१ मध्ये करण्यात आलेल्या चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील कलम १३ मध्ये चलनक्षम दस्तऐवज म्हणजे नेमके काय याचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. सदर कलमामध्ये स्पष्ट केल्यानुसार आदेश देय किंवा वाहक देय असलेली वचनचिठ्ठी, हुंडी किंवा धनादेश म्हणजे चलनक्षम दस्तऐवज होय.

**४. वचनचिठ्ठी :** १८८१ मध्ये करण्यात आलेल्या चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील कलम ४ मध्ये वचनचिठ्ठी म्हणजे काय याचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. सदर कलमामध्ये नमुद केल्यानुसार निश्चित व्यक्तीस किंवा तिच्या आदेशानुसार दुसऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या वाहकास देय असलेला, निश्चित रक्कम देण्याचे विनाशर्त दिलेले, कर्त्याच्या सहीचे, लेखी वचन असलेला दस्तऐवज होय.

**५. हुंडी :** चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील कलम ५ मध्ये हुंडीचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. सदर कलमामध्ये नमुद केल्यानुसार केवळ निश्चित व्यक्तीस किंवा तिच्या आदेशानुसार दुसऱ्या व्यक्तीस किंवा वाहकास विशिष्ट रक्कम देणेबाबत कर्त्याने सही करून दुसऱ्या व्यक्तीस लेखी स्वरूपात दिलेल्या विनाशर्त आदेशाचा दस्तऐवज म्हणजे हुंडी होय.

**६. धनादेश :** धनादेश हा सुध्दा एक महत्त्वाचा चलनक्षम दस्तऐवज आहे. चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील कलम ६ मध्ये धनादेशाचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. त्यानुसार मागताक्षणी देण्याव्यतिरिक्त दुसऱ्या प्रकारे देय नसलेली व विशिष्ट बॅंकेवर काढलेली हुंडी म्हणजे धनादेश होय.

**७. दस्तऐवज काढण्याचा अधिकार :** चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील प्रकरण ३ मधील कलम २६, २७, २८ आणि २९ मध्ये दस्तऐवज कोणाला काढता येऊ शकतो व त्याबाबतच्या अन्य तरतुदींचा समावेश करण्यात आलेला आहे. यामधील तरतुदीनुसार पुढील घटकांना दस्तऐवज काढता येऊ शकतो.

अ. करार करण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला वचनचिठ्ठी, हुंडी किंवा धनादेश काढण्याचा अधिकार आहे.

ब. अज्ञान व्यक्तीलाही दस्तऐवज काढण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

क. करार करण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने अधिकार दिलेल्या अभिकर्त्यास दस्तऐवज काढता येतो.

ड. दस्तऐवज काढण्याचा अधिकार असणाऱ्या व्यक्तींना पृष्ठांकन, हस्तांतर, चलनक्षम, सोपवणूक, स्वीकृती इ. बाबत अधिकार दिलेला असतो.

इ. मयत व्यक्तीच्या प्रतिनिधीस देखील दस्तऐवज काढण्याचा, पृष्ठांकन, हस्तांतर, चलनक्षम, सोपवणूक, स्वीकृती इ. बाबत अधिकार दिला जातो.

**८. रेखांकित धनादेश :** १८८१ मध्ये करण्यात आलेल्या चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील प्रकरण १४ मध्ये धनादेशाच्या रेखांकनाबाबतच्या तरतुदींचा समावेश करण्यात आलेला आहे. या प्रकरणामधील कलम १२३ मध्ये सर्वसाधारण रेखांकन तर कलम १२४ मध्ये विशेष रेखांकनाचा अर्थ तसेच अन्य तरतुदी स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर कलमामधील स्पष्टीकरणामध्ये धनादेशाच्या धारकाला देखील रेखांकन करण्याचा अधिकार दिलेला आहे.

**९. अनादराबाबत शिक्षा किंवा दंड :** १८८१ मध्ये करण्यात आलेल्या चलनक्षम दस्तऐवज कायद्यातील तरतुदीनुसार बॅंकेच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने किंवा बॅंकेने द्यावयाच्या रकमेपेक्षा धनादेशाची

रक्कम जास्त असल्याने आदेशकाने काढलेल्या धनादेशाचा अनादर झाल्यास सदर कायद्यातील कलम १३८ नुसार आदेशकाला एक वर्षापर्यंतची कैद किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट दंड यापैकी कोणतीही एक किंवा दोन्ही शिक्षा करण्याबातची तरतुद करण्यात आलेली आहे.

**३.२.१.ब. बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायदा १८९१**

**(The Bankers' Books Evidence Act – 1891) :**

प्रत्येक बँकेला आपले ग्राहक, त्यांच्या ठेवी तसेच अन्य व्यवहारांच्या बाबतीत गुप्तता पाळावी लागते. ग्राहकांची आपल्या बॅकांच्याबाबतची विश्वासहर्ता यावर अवलंबून असते. ग्राहकाच्या पैशाबाबतची माहिती तसेच त्याच्या खात्यासंबधी माहिती फोडल्यास तो कायदेशीर गुन्हा ठरतो. त्यामुळेच प्रत्येक बँक आपल्या खातेदाराच्या बँकेतील सर्व व्यवहारांच्या संदर्भात अधिक दक्ष राहून त्याची माहिती सुरक्षीत ठेवण्याचा प्रयत्न करत असते. कोणतीही बँक आपल्या ग्राहकाच्या व्यवहाराबाबतची माहिती अन्य कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला देऊ शकत नाही.

काही प्रसंगी एखाद्या ग्राहकाच्या आर्थिक व्यवहारांबाबत न्यायालयामध्ये खटला अथवा, चौकशी सुरू असेल तर बँकाना त्या खातेदाराच्या आर्थिक व्यवहारासंदर्भात कागदपत्राची पुर्तता बॅकेला करावी की न करावी अशा स्वरूपाची समस्या निर्माण होत असते. कारण त्यामधून बँक व्यवहारांची गुप्तता भंग होवून ग्राहाकांची विश्वासहर्ता कमी होवून बँक व्यवसाय धोक्यात येण्याची शक्यता असते. तसेच बँकाची नोंद पुस्तके न्यायालयात न्यावी लागल्याने त्यांच्या दैनंदिन व्यवहारांबाबत तसेच ग्राहकांचीसुध्दा गैरसोय निर्माण होण्याचा धोका असतो. या सर्व धोक्यांवर उपाय बँकांना पूरावा म्हणून बँक पुस्तके सादर करण्यात सुट देण्याबाबतची तरतुद १८९१ च्या बँकाच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यामध्ये करण्यात आली आहे.

**बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यातील तरतुदी :**

बँकांच्या दैनंदिन व्यवहारांबाबत तसेच ग्राहकांचीसुध्दा गैरसोय निर्माण होण्याचा जो धोका असतो त्यावर उपाय म्हणून बँकांना पूरावा म्हणून बँक पुस्तके सादर करण्यात सुट देण्याबाबत १८९१ जो कायदा करण्यात आला त्यामध्ये पुढील तरतुदी करण्यात आल्या.

**१. नोदींची प्रमाणित प्रत स्वीकारार्थ पुरावा :** जर बँक एखाद्या खटल्यात वादी किंवा प्रतिवादी पक्ष नसलेल्या प्रकरणांच्याबाबतीत बँकेने आपल्या पुस्तकातील संबधित व्यवहारांच्या नोंदींची प्रमाणित प्रत पुरावा म्हणून सादर केल्यास तो पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

**२. बँकच एक पक्ष असल्यास सुट मिळणार नाही :** बँक एखाद्या खटल्यात वादी किंवा प्रतिवादी पक्ष असल्यास अशा प्रकरणांच्याबाबतीत बँकेने आपल्या पुस्तकातील संबधित व्यवहारांच्या नोंदींची प्रमाणित प्रत पुरावा म्हणून सादर करता येणार नाही तर त्यासाठी हिशोबाची प्रत्यक्ष पुस्तके सादर करावी लागतील अशी तरतुद १८९१ च्या बँकाच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यामध्ये करण्यात आली आहे.

**३. प्रत्यक्ष पुस्तक तपासणीचा अधिकार :** बँकांनी पुरावा म्हणून सादर केलेल्या प्रमाणित केलेल्या प्रती जर न्यायालयाला समाधानकारक वाटल्या नाहीत तर बँकेच्या प्रत्यक्ष पुस्तकाची तपासणी करण्याचा अधिकार पोलीस अधीक्षकापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या अधिकाऱ्याला असेल. अशा स्वरूपाची तरतुद १८९१ च्या बँकाच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यामध्ये १९८३ साली दुरूस्ती करून करण्यात आली.

**४. आवश्यकतेशिवाय पुस्तके न्यायालयास देता येणार नाहीत :** सन १८९१ च्या बँकाच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यानुसार संबधीत प्रकरणातील पुराव्यासाठी प्रमाणीत प्रत सादर केल्यानंतरही आवश्यकता असल्याशिवाय मुख्य बँक पुस्तकांची तपासणी करण्याची परवाणगी न्यायालयालाही नसेल अशी तरतुद करण्यात आली.

**५. पोलिस अधिकाऱ्याला पुस्तके देता येतील :** आवश्यकता भासल्यास पोलीस चौकशीसाठी पोलीस अधिकाऱ्याला संबधित व्यवहाराच्या प्रमाणित प्रती देण्यात येतील अशी तरतुद सदर कायद्यात करण्यात आली आहे.

**६. मुळ पुस्तके नष्ट केल्यास त्याच्या प्रती ग्राह्य :** जर बँकेने एखाद्या प्रकरणासंबधीत मूळ कागदपत्रे नष्ट केली असतील तर अशा प्रकरणाच्या बाबतीत बँकेने ती नष्ट करण्यापुर्वी ज्या प्रती तयार केल्या असतील त्या प्रती पुरावा म्हणून कायदेशीररित्या ग्राह्य धरण्यात येतील अशी तरतुद सदर कायद्यात सन १९८३ मध्ये दुरूस्ती करून करण्यात आलेली आहे.

अशा स्वरूपाच्या महत्त्वपर्ण तरतूदी १८९१ च्या बँकाच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

### ३.२.२.अ. सर्फेसी कायदा २००२ (The SARFEASI Act -2002) :

सर्फेसी कायदा हे वित्तीय मालमत्तेची पुर्नरचना व गुंतवणूक आणि सुरक्षा स्वारस्य अंमलबजावणी कायद्याचे लघूरूप आहे. सर्फेसी कायदा हा एक भारतीय कायदा असून तो बँका आणि अन्य वित्तीय संस्थाना निवासी किंवा व्यावसाईक मालमत्तेचा लिलाव करून कर्जाची वसुली करण्याचा अधिकार देतो. सन २००२ स्थापन करण्यात आलेली भारतीय संपत्ती पुननिर्माण कंपनी लिमीटेड ही भारतातील सर्फेसी कायद्याअंतर्गत स्थापन करण्यात आलेली पहिली संपत्ती पुननिर्माण कंपनी आहे. सन २००२ मधील सर्फेसी कायद्यातील सेक्शन १३ हे कर्ज देणाऱ्या बँका तसेच वित्तीय संस्थांना कर्जा व व्याजाच्या वसुलीचे अनेक अधिकार देतो.

जर कर्ज घेतलेली व्यक्ती किंवा संस्था कर्जाच्या किंवा व्याजाच्या हप्त्याच्या परतफेडीमध्ये कसुर करत असेल आणि त्याचा परीणाम त्यांचे कर्ज खाते अनिष्पादित मत्तेमध्ये (एन.पी.ए.) जात असेल तर सदर सर्फेसी कायदा सदर व्यक्तीने ६० दिवसाच्या आतमध्ये आपल्या कर्जाची परफेड करावी अशा संदर्भाची नोटीस देण्याचा अधिकार कर्ज देणाऱ्या बँकेला किंवा वित्तीय संस्थेला देतो. जर ती व्यक्ती ६० दिवसाच्या आत थकीत रकमेची परतफेड करण्यामध्ये अपयशी ठरत असेल तर कोणत्याही न्यायालयाच्या परवानगीशीवाय सदर व्यक्तीने तारण ठेवलेली मालमत्ता ताब्यात घेऊ शकतात. बँका तसेच वित्तीय संस्था या कायद्याचा वापर करून त्याच्या

माध्यमातून बुडीत कर्जाच्या वसुलीचे कार्य प्रभावीपणे करताना दिसुन येते. या अगोदरच्या कायद्यापेक्षा सदर कायद्याने बँका आणि वित्तीय संस्थाना दिलेली कर्ज वसुल करण्याबाबतचे अधिक अधिकार देतो.

या कायद्यामधील तरतूदीनुसार बँकाना जे अधिकार देण्यात आलेले आहेत त्या आधारे बँका न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाशिवाय कर्जदाराने ठेवलेल्या तारण जप्त करून आपले कर्ज व व्याजाची रक्कम वसूल करू शकतात. शेत जमिन मात्र या पध्दतीने वसुल करू शकत नाहीत म्हणजेच शेत जमिन ही सर्फेसी कायद्याला अपवाद मानली जाते. बँका आणि वित्तीय संस्थांनी तारण स्वरूपात काही मालमत्ता घेतली असेल तरच सर्फेसी कायद्याचा वापर करून दिलेले कर्ज व व्याजाची रक्कम वसुल करण्याचा अधिकार देतो. अशा कर्जाच्या वसुलीसाठी कोणत्याही कोर्टाच्या आदेशाची गरज नसते परंतू जर तारण म्हणून दिलेली मालमत्तेच्या फसव्या स्वरूपाची, बेकायदेशीर किंवा अवैध असेल तर मात्र सदर बँकेला कायदेशीर मार्गाचा अवलंब करून न्यायालयीन मार्गाचा अवलंब करावा लागतो.

बँका व वित्तीय संस्थांना दिलेले अधिकार : सदर कायदा देशातील बँका व वित्तीय संस्थांना दिलेल्या कर्जाची आणि व्याजाची रक्कम वसुल करण्याबाबत बँका आणि वित्तीय संस्थांना पुढील अधिकार प्रधान करण्यात आलेले आहेत.

१. सर्फेसी कायदा २००२ थकीत कर्ज आणि व्याजाचे हप्ते ६० दिवसाच्या आत परतफेड करण्याबाबत नोटीस देण्याचा अधिकार देतो.

२. सदर नोटीस देण्यासाठी कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाची घेण्याची गरज नाही. म्हणजेच कोणत्याही न्यायालयाच्या परवानगीशिवाय नोटीस देण्याचा अधिकार बँका आणि वित्तीय संस्थांना सदर कायद्याने दिलेला आहे.

३. कर्ज घेणारी व्यक्ती ६० दिवसाच्या आत थकीत कर्जाची रक्कम परत पेडण्यास असमर्थ ठरत असेल तर कर्जासाठी तारण घेतलेली मालमत्ता ताब्यात घेण्याचा अधिकार बँका आणि वित्तीय संस्थाना सदर कायदा देतो.

४. कर्जाच्या वसुलीपोटी ताब्यात घेतलेली मालमत्ता विकण्याचा किंवा भाडेतत्त्वावर देऊन कर्ज वसुलीचा अधिकार बँकाना देण्यात आलेला आहे.

५. कर्जाच्या वसुलीपोटी ताब्यात घेतलेली मालमत्तेचे स्वत: व्यवस्थापन करण्याचा किंवा तीच्या व्यवस्थापनासाठी एखाद्या व्यक्तीची नियूक्ती करण्याचा अधिकार सदर बँकेला हा कायदा देतो.

६. २००२ मधील सर्फेसी कायदा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली मालमत्ता पुर्नरचना कंपनी स्थापन करण्याचा अधिकार देतो. की ज्या कंपन्या बँका आणि वित्तीय संस्थांच्या थकबाकीपोटी मालमत्ता ताब्यात घेण्याचे व थकीत कर्जाच्या वसुलीचे काम करतात.

७. सर्फेसी कायदा बँका आणि वित्तीय संस्थांद्वारे ताब्यात घेतलेल्या मालमत्तेची विक्री मालमत्ता पुर्नरचना कंपनीला करण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

**कर्जदाराचे हक्क :** बँकेच्या कर्जदारांचे हक्क पुढील प्रमाणे स्पष्ट करतो.

१. बँका आणि वित्तीय संस्थांच्या थकीत कर्ज फेडीबाबतची पध्दती सुटसुटीत करत असताना त्यांना अनेक अधिकार दिलेले असले तरी कर्जदाराच्या हक्काचे कसे अबाधित राहतील याचाही विचार सदर कायद्यामध्ये करण्यात आलेला आहे.

२. बँकेने दिलेल्या ६० दिवसाच्या आत आपली थकीत रक्कमेची परतफेड करून आपल्या मालमत्तेवर जप्ती येण्यापासून वाचवू शकतो.

३. तसेच बँकेमार्फत ताब्यात घेतलेले तारणाची विक्री करे पर्यंत कधीही थकीत देणे जमा करून आपल्या संपत्तीचा लिलाव होण्यापासून वाचवू शकतात.

४. जर एखादा अधिकारी जर अवैध्य मार्गाचा अवलंब करून कर्जदाराला त्रास देत असेल तर त्याला दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल अशा स्वरूपाची तरतुद सदर कायद्यात करण्यात आलेली आहे.

५. अवैध्यमार्गाचा अवलंब करून कर्जदाराला त्रास दिल्याचे स्पष्ट झाल्यास कर्जदाराला अशा कृतीसाठी नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असेल.

६. सदर कर्जदार व्यक्ती तक्रार निवारण्यासाठी पहिल्यांदा कर्ज वसूली प्राधीकरणाकडे तक्रार करू शकतो त्याचा त्यासाठी त्याला ४५ दिवसाची मुदत देण्यात आलेली आहे. त्यानंतर तो कर्ज वसूली अपील प्राधीकरणाकडे देखील धाव घेऊ शकतो त्यासाठी त्याला ३० दिवसाची मुदत देण्यात आली आहे.

सदर कायदा ज्याप्रमाणे देशातील बँका व वित्तीय संस्थांना अधिकार देतो तसेच तो वरील स्वरूपाचे कर्जदारांचे हक्क सुध्दा स्पष्ट करतो.

### ३.२.२.ब. बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायदा २००२

**(Prevention of Money Laundering Act 2002) :**

बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायदा २००२ हा देशातील अवैध सावकारी रोखण्याच्या दृष्टीने उचललेले एक महत्त्वपुर्ण कायदा मानला जातो. अवैध्य मार्गांनी जमा केल्या जाणाऱ्या तसेच केलेल्या पैशावर चाप लावण्याच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याचे दिसून येते. अवैध सावकारी प्रतिबंध कायदा २००२ हा १ जुलै २००५ रोजी अमलात आला. बँका, वित्तीय संस्था तसेच अन्य बँकिंग संस्थांना रेकॉर्ड तयार करणे तसेच माहिती निश्चीत केलेल्या स्वरूपात तयार करणे सदर कायद्याने बंधनकारक केले आहे. सदर कायद्यामध्ये पुढील कालखंडात सन २००५, २००९ आणि २०१२ मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

बेकायदेशीर सावकारीची विशिष्ट अशी व्याख्या केली गेलेली नसली तरी बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यामधील सेक्शन ३ मध्ये नमुद केल्यानुसार जो कोणी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या अवैध मार्गाचा अवलंब करून संपत्ती लपविणे, ताब्यात घेणे, किंवा संपादन करण्याचे कार्य करतात त्या सर्वाचा समावेश बेकायदेशीर सावकारी मध्ये केला जातो.

**बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्याचे उद्देश :** १ जुलै २००५ रोजी अमलात आलेल्या बेकायदेशीर

सावकारी प्रतिबंध कायद्याचे महत्त्वाचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

१. बेकायदेशीर सावकारीला प्रतिबंध घालने तसेच त्याचे नियंत्रण करणे.

२. सावकारीच्या माध्यमातून कमवलेल्या पैशावर जप्ती आणणे व तो जप्त करणे.

३. भारतातील सावकारीच्या संबधीत उदभवलेल्या समस्याना सामोरे जाण्याच्या दृष्टीने कायदेशीर नियमावली उपलब्ध करून देणे.

ही तीन महत्त्वपुर्ण उद्दिष्टे समोर ठेवुन २००५ मध्ये सदर कायद्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यातील महत्त्वपुर्ण तरतुदी :

२००५ मध्ये भारतात लागू करण्यात आलेल्या बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यातील महत्त्वपुर्ण तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

**१. बेकायदेशीर सावकारी करणारांना शिक्षा :** २००५ मध्ये भारतात लागू करण्यात आलेल्या बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यातील दुसऱ्या अनूसुचीतील दुसऱ्या उताऱ्यामध्ये नमुद केल्यानुसार बेकायदेशीर मार्गाने उत्पन्न जमा करणारांना कठोर कारावासाच्या शिक्षेची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार गुन्हेगारास ३ ते ७ वर्षाचा कठोर कारावास होऊ शकतो. तसेच सदर शिक्षेमध्ये ७ वर्षांवरून १० वर्षांपर्यंत वाढू देखील शकते.

**२. बेकायदेशीर मलामत्ता जप्त करण्याचा अधिकार :** बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यातील तरतुदीनुसार एखाद्या व्यक्तीने बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून जर संपत्ती धारण केली असेल तर अशी मालमत्ता न्यायाधीश प्राधिकरणाच्या परवानगीने ताब्यात घेण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

**३. न्यायाधीश प्राधिकरण :** बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यातील तरतुदीनुसार केंद्र सरकार कडून न्यायाधीश प्राधिकरणाची नेमणूक करण्यात आलेली आहे. हे प्रधिकरण एखादी मालमत्तेची सावकारा करवी जप्ती झाली आहे का? असल्यास त्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे काम सदर प्राधिकरण करते.

**४. परस्पर व्यवहार गृहीत धरणे :** जर अवैध सावकारीमध्ये दोन किंवा अधिक व्यवहारांचा समावेश होत असेल आणि त्यापैकी एक किंवा त्यापेक्षा अधिक व्यवहार हे अवैध्य सावकारीमध्ये समाविष्ट होत असल्याचे सिध्द होत असेल तर व त्यामधून सदर व्यक्तीने जप्तीने एखादी मालमत्ता ताब्यात घेतली असेल तर त्या व्यक्तीचे इतर व्यवहार देखील परस्पर व्यवहार म्हणून गृहीत धरले जातात व त्याच्यावर कठोर अशी कायदेशीर कारवाई केली जाते.

**५. पुराव्याचे ओझे :** जर एखाद्या व्यक्तीला बेकायदेशीर सावकारीच्या माध्यमातुन पैसा कमावल्याचा गुन्हा दाखल केला जात असेल तर त्या व्यक्तीने कमावलेली सर्व संपत्ती ही कायदेशीर मार्गाने कमावली असल्याचे सिध्द करण्यासाठी आवश्यक असलेल्या पुराव्याचे ओझे सदर व्यक्तीवर असते. जर ती व्यक्ती कायदेशीर पुरावे सादर करण्यामध्ये अपयशी ठरल्यास कायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यातील तरतुदीनुसार सदर व्यक्तीवर कायदेशीर कारवाई केली जाते.

**६. अपीलीय न्यायाधिकरण :** एखाद्या व्यक्तीच्या विरोधात बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्याअंतर्गत न्यायाधीश प्राधिकरणाने किंवा सदर कायद्यातील तरतुदी नुसार अन्य प्राधिकरणाने दोषी ठरविल्यानंतर त्या व्यक्तीला सदर आदेशाविरूध्द अपील करता यावे यासाठी भारत सरकारने अपीलीय न्यायाधिकरणाचे गठण केले आहे. सदर अपीलीय न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशाच्या आधारे सदर व्यक्तीला उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करू शकते.

**७. विशेष न्यायालय :** २००२ च्या बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यातील सेक्शन ४३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे तरतुदीनुसार केंद्र सरकार उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशांच्या सल्ल्याने विशेष न्यायालय म्हणून एक किंवा अधिक न्यायालयांची स्थापना करण्याची तरतुद सदर कायद्यामध्ये आहे.

**८. आर्थिक बुध्दिमत्ता युनिट :** भारत सरकारने १८ नोव्हेंबर २००४ रोजी देशात अर्थिक बुध्दीमत्ता युनिटची स्थापना केंद्रीय राष्ट्रीय एजन्सीच्या स्वरूपात स्थापना केलेली आहे. सदर एजन्सी ही संशयित वित्तीय मालमत्तेच्या संदर्भात माहिती जमा करणे, प्रक्रिया करणे, वर्गिकरण करणे, माहितीचा प्रसार करणे याबाबतची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

अशा स्वरूपाच्या विविध तरतुदी २००२ च्या बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्यामध्ये करण्यात आलेल्या आहेत. यांच्या माध्यमातून देशातील जनतेच्या शोषणाचे महत्त्वपूर्ण कारण असलेल्या सावकारीवर मोठ्याप्रमाणात नियंत्रण व मर्यादा घालण्याचे कार्य सदर कायद्याने केले आहे.

### ३.२.३.अ. बॅकिंग क्षेत्रातील सायबर गुन्ह्याचा अर्थ आणि प्रकार (Meaning and Types of Cyber Crimes in Banking Sector) :

आधुनिक कालखंडामध्ये अनेक शोध लागत आहेत व त्यांच्या वापरातुन अनेक दोषही समोर येत आहेत. असाच एक महत्त्वपुर्ण दुष्परिणाम म्हणजे सायबर गुन्हेगारी होय. सद्य कालखंडामध्ये या समस्येने जागतिक स्वरूप धारण केलेले आहे. प्रामुख्याने आर्थिक क्षेत्र तसेच महिला वर्ग या समस्येने मोठ्याप्रमाणात ग्रासलेला दिसून येतो. त्यामधून आर्थिक तसेच सामाजिक सुरक्षिततेला मोठ्याप्रमाणात धोका निर्माण होत असल्याचे दिसुन येते. यावर उपाय म्हणून अनेक देशांमध्ये विविध स्वरूपाचे कायदे केले गेले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून भारतामध्ये सन २००० मध्ये माहिती तंत्रज्ञान कायदा (आयटी ॲक्ट -२०००) करण्यात आला आहे. सदर कायद्याने हॅकिंग, इंटरनेटवरील अश्लिल गोष्टी किंवा मजकूराचे प्रकाशन यासारख्या सर्व गोष्टी सायबर कायद्याच्या कक्षेत आणून त्याला सायबर गुन्हा मानले जाते.

**सायबर गुन्हा :**

सायबर गुन्हा हा देखील पारंपारिक गुन्ह्याप्रमाणेच असुन तो सायबर स्पेसमध्ये इलेक्टॉनिक व संगणकीय वातावरणामध्ये झालेला किंवा केलेला हा गुन्हा असतो म्हणून त्याला सायबर गुन्हा असे म्हटले जाते. संगणकीय क्षेत्रात केलेल्या अपराधांना सायबर गुन्हे किंवा सायबर क्राईम असे संबोधले जाते.

**सायबर गुन्हेगार :**

जे काही घटक सायबर गुन्ह्यामध्ये सहभागी होतात त्या सर्वाचा समावेश सायबर गुन्हेगारामध्ये केला जातो व त्यांनाच सायबर गुन्हेगार असे संबोधले जाते. अशा गुन्हगारांच्यामुळेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर समाजाचा विश्वास बसत नसल्याने त्याच्या वापरावरती मर्यादा येत असल्याचे दिसून येतो.

**सायबर गुन्ह्यांचे प्रकार :**

**१. सॉफ्टवेअर पायरसी :** बेकायदेशीररित्या सॉफ्टवेअरची कॉपी करून वापरण्यास सॉफ्टवेअरची पायरसी असे म्हणतात. सॉफ्टवेअरची पायरसीलाच सॉफ्टवेअरची चाचेगिरी असेही म्हणतात. प्रत्यक्षात संगणकासाठी कायदेशीर सॉफ्टवेअर वापरायचे असते. पायरेटेड सॉफ्टवेअर वापरणे किंवा तयार करणे हा कायदेशीर गुन्हा मानला जातो. असे असले तरी याचा जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात वापर होताना दिसून येतो.

**२. हॅकिंग :** विविध क्षेत्रात वापरल्या जाणारे संगणक, वेबसाईटची सुरक्षा तोडून माहिती चोरणे, माहितीमध्ये बदल करणे, संगणक प्रणालीमध्ये बिघाड करणे, बँक अकाऊंट मधून पैसे काढून घेणे यालाच हॅकिंग असे म्हणतात. थोडक्यात नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे माहिती, बँक खात्यातील पैसे काढुन घेण्याची क्रिया म्हणजे हॅकिंग होय.

**३. क्रॅकिंग :** हॅकिंगप्रमाणेच क्रॅकिंग हा देखील सायबर गुन्ह्याचा प्रकार आहे. याच्या सहाय्याने संगणक प्रणाली, तसेच बँकिंग व्यवहारांसाठी जे काही पासवर्ड वापरले जातात ते क्रॅक करून त्यामधील माहिती तसेच पैसे काढण्याचे कार्य क्रॅकर करत असतात.

**४. सायबर स्टॉकिंग :** सायबर गुन्ह्याच्या या प्रकारामध्ये विशिष्ट व्यक्ती किंवा संस्थेची अति महत्त्वाची माहिती हॅक करून त्या माहितीच्या आधारे व्यक्तीला किंवा संस्थेला धमकावण्याचा तसेच मेल करून, संदेश पाठवून किंवा फोन करून त्रास देण्याचा जो प्रकार घडतो त्यास सायबर स्टॉकिंग असे म्हणतात.

**५. डेनायल ऑफ सर्व्हिस अटॅक :** सायबर गुन्ह्याच्या या प्रकारामध्ये एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेची नेटवर्कची सुविधा बंद करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जातो. त्यामध्ये त्यांना मोठ्या प्रमाणात मेल पाठविले जातात त्यामधून नेटवर्क पॅक होणे तसेच मेल बॉक्स भरणे नवीन मेल न येणे यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

**६. व्हायरस डेसीमिनेशन :** जेव्हा संगणकाच्या बाहेरील सुचना संगणक प्रणालीमध्ये प्रवेश करून संगणक प्रणाली खराब किंवा त्याची नासधूस करण्याचे कार्य व्हायरस करतो. अशा स्वरूपाचे प्रोग्राम तयार करून ते प्रणालीमध्ये सोडण्याचे कार्य काही संगणक तज्ञ करत असल्याचे दिसून येते.

**७. आय. आर. सी. क्राईम :** इंटरनेट मधील चॅट रूममध्ये उपलब्ध असलेल्या जागेमध्ये चॅट करणारी व्यक्ती जेव्हा खोटी माहिती देऊन अन्य व्यक्ती किंवा संस्थाना फसविण्याचे कार्य करतात अशा स्वरूपाच्या गुन्हेगारीला आय. आर. सी. क्राईम असे म्हणतात.

८. **क्रेडीट कार्ड फ्रॉड :** पैसा मिळविण्यासाठी व्यक्तींच्या क्रेडीट कार्डचा बेकायदेशीरीत्या वापर करून काही लोक प्रयत्न करत असतात. अशा स्वरूपाच्या सर्व प्रकारांचा समावेश क्रेडीट कार्ड फ्रॉड मध्ये समावेश होतो हा सायबर गुन्ह्याचा एक प्रकार मानला जातो.

९. **फिशिंग** : सायबर गुन्ह्याच्या या प्रकारामध्ये विविध स्वरूपाची आमिष दाखविली जातात व त्याच्याकडून त्याची वैयक्तीक माहिती जमा केली जाते. त्यामध्ये त्याच्या बँक अकाऊंट डिटेल्स ज्यामध्ये बँक अकाऊंट नंबर, पासवर्ड याची मागणी केली जाते व त्या माहितीचा गैरवापर करून बँकेतील पैसे काढून घेतले जातात. अशा स्वरूपाच्या अनेक घटना सद्यस्थितीला होत असल्याचे दिसून येते.

१०. **कार्ड क्लोनिंग** : ए.टी.एम. किंवा क्रेडीट कार्डचा डेटा चोरुन त्यासारखे हुबेहुब प्रति कार्ड तयार करुन त्याचा गैरवापर करण्याच्या पध्दतीस कार्ड क्लोनिंग असे म्हणतात.

अशा स्वरूपाचे अनेक सायबर गुन्हे आज सऱ्हास होत असल्याचे दिसून येतात. अशा गुन्ह्यांपासून सावध राहण्याची दक्षता संपूर्ण समाजाने घेण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

### ३.२.३. ब. माहिती तंत्रज्ञान कायदा – २००० (Information Technology Act, 2000) :

भारतातील इलेक्ट्रॉनिक्स खात्याने १९९८ मध्ये माहिती तंत्रज्ञान बिलाचे काम सुरू केले, ते बिल १६ डिसेंबर १९९९ रोजी संसदेत सर्वप्रथम मांडण्यात आले. १३ मे २००० रोजी या कायद्याला केंद्रिय मंत्रिमंडळाने तर १७ मे रोजी लोकसभेत तसेच राज्यसभेत एकमताने मंजुरी देण्यात आली. जून २००० मध्ये राष्ट्रपतींच्या मंजुरी दिल्यानंतर हा कायदा १७ ऑक्टोबर २००० पासून माहिती तंत्रज्ञान कायदा अस्तित्वात आला. माहिती तंत्रज्ञान कायद्यामध्ये एकूण १३ भाग असून एकूण ९४ पोटभाग समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

**माहिती तंत्रज्ञान कायदा – २००० चे महत्त्व :**

१७ ऑक्टोबर २००० पासून भारतामध्ये अस्तित्वात आलेल्या माहिती तंत्रज्ञान कायद्याचे महत्त्व पुढील मुद्यांवरून अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

**१. पेपरलेस व्यवहारांना कायदेशीर स्वरूप :** पेपरलेस व्यवहारांना कायदेशीर स्वरूप देण्याचे काम या माहिती तंत्रज्ञान कायद्याने केले आहे.

**२. विलंब कमी करण्याचे कार्य :** पुर्वी पेपर किंवा कागदच्या स्वरूपात असणारी आकडेवारी प्राप्त करण्यासाठी किंवा पाठविण्यासाठी पोस्टाच्या सहाय्याने बराच विलंब लागत होता तो विलंब कमी करण्याचे महत्त्वपुर्ण कार्य या कायद्याने केले आहे.

**३. माहिती इलेक्ट्रानिक पध्दतीने साठविणे शक्य :** या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे इलेक्ट्रानिक पध्दतीने माहिती जमा करणे तसाच ती साठवून ठेवणे अगदी सहज शक्य झाले आहे. संगणकाच्या माध्यमाने अगदी अल्प जागेमध्ये मोठ्या प्रमाणात माहितीची साठवण शक्य झाल्याने आता अशा माहितीच्या साठवणूकीसाठी मोठ्या जागेची गरज पडत नाही.

**४. व्यवहारांमध्ये सुलभता :** या कायद्याच्या अमंलबजावणीने संगणक, इंटरनेट यांच्यामाध्यमातून मोठ्याप्रमाणात अनेक व्यवहार अगदी सुलभने होवू लागल्याने व्यवहारांमध्ये सुलभता येण्यास मदत होत असल्याचे दिसून येते. त्यामुळेच या कायद्याला जागतिक स्तरावरील क्रांतीकारक पावूल मानले जाते.

**माहिती तंत्रज्ञान कायद्याचे भाग :**

भारतात २००० मध्ये लागु करण्यात आलेल्या माहिती तंत्रज्ञान कायद्यामध्ये एकूण १३ भाग असून एकूण ९४ पोटभाग समाविष्ट करण्यात आलेले आहेत. ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. भाग १ : प्रारंभिक

२. भाग – २ : अंकात्मक स्वाक्षरी

३. भाग – ३ : इलेक्ट्रॉनिक शासन व्यवहार

४. भाग – ४ : विद्युत अभिलेखांचे आरोपण, अभिस्वीकृती व पाठवणी

५. भाग – ५ : विद्युत अभिलेखआणि अंकात्मक स्वाक्षरीची सुरक्षा

६. भाग – ६ : प्रमाणपत्र देणाऱ्या अधिसत्तेचे नियमन

७. भाग – ७ : अंकात्मक स्वाक्षरी प्रमाणपत्र

८. भाग – ८ : वर्गणीदाराची कर्तव्ये

९. भाग – ९ : शिक्षा व न्यायनिवाडा

१०. भाग – १० : सायबर अपील न्यायाधिकरण

११. भाग – ११ : अपराध

१२. भाग – १२ : मध्यस्थ जबाबदार नसतील

१३. भाग – १३ : संकीर्ण

**माहिती तंत्रज्ञान कायद्यातील सुधारणा – २००८ :** माहिती तंत्रज्ञान कायद्यामध्ये सुधारणा सुचविण्यासाठी जानेवारी २००५ रोजी माहिती तंत्रज्ञान सचिव ब्रिजेशकुमार यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठण करण्यात आले. या समितीमध्ये नॅस्कॉमचे अध्यक्ष किरण कर्णिक यांचाही सदस्य म्हणून समावेश होता. सन २००० मधील माहिती तंत्रज्ञान मुळ कायद्याच्या मसुद्यामध्ये संसदेने २००८ मध्ये काही महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. ५ फेब्रुवारी २००९ रोजी राष्ट्रपतींनी सदर सुधारणा कायद्यांना मंजूरी दिल्यानंतर २७ ऑक्टोबर २००९ रोजी सुधारीत माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ अंमलात आला.

**माहिती तंत्रज्ञान सुधारणा कायदा २००८ मधील महत्वपूर्ण सुधारणा :**

१. भाग –२ : व्यवहारांशी संबधीत व्यक्ती तसेच अन्य कोणतीही व्यक्ती याची तपासणी करू शकते.

२. भाग –३ : व्यवहारांशी संबधीत कागदपत्रे, रेकॉर्ड, प्रिंट केलेले फॉर्म इ सर्व कागदपत्रे उपलब्ध होऊ शकतील. तसेच डिजिटल सिग्नेचर सुध्दा ग्राह्य धरली जाईल.

३. भाग –४ : डिजिटल सिगनेचर सर्टिफिकेटवर अधिकृत अधिकारी कार्यवाही तसेच नियंत्रण करू शकतो. तसेच सदर अधिकारी वर्गासाठी नियमावली असेल.

४. भाग –७ : कायद्याचा वापर करणाराची कर्तव्ये या भागात स्पष्ट करण्यात आली.

५. भाग –८ : गैरव्यवहाराबाबत दोषींना शिक्षा देण्याची तरतुद या भागामध्ये करण्यात आली. संगणक तसेच संगणक प्रणालीचे नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई एक कोटी रूपयांपर्यंत असेल.

६. भाग –९ : सायबर क्राइम्स, हॅकिंग, फिशिंग, डेटा चोरणे, व्हायरस, खराब एसएमएस इ. बाबत तरतुदी यामध्ये नमुद करण्यात आल्या.

७. भाग –१० : सायबरचे कायदे, करावयाची अपील याबाबींचा सदर भागात समावेश करण्यात आला.

८. भाग –११ : ज्या गुन्ह्याबाबत पोलिस खात्याची चौकशी आवश्यक असेल अशा गुन्ह्याबाबत डेप्युटी सुपरिटेंडेंट ऑफ पोलिस या दर्जाचे अधिकारी चौकशी अधिकारी म्हणून कार्य करतील.

**३.२.४.अ. डेटा सुरक्षा आणि महत्त्व (Data Security and Importance) :**

कोणत्याही क्षेत्रामध्ये डेटा हा खुपच महत्त्वाचा असतो तसेच त्याची सुरक्षा देखील तेवढीच महत्त्वाची असते. व्यवहार, ज्ञान, देवाण–घेवाण, पायाभूत सुविधा, डेटाबेस तसेच संस्थांची अन्य माहिती ही त्यांची अत्यंत मौल्यवान मालमत्ता असते आणि ही मालमत्ता सुरक्षीत रहावी या दृष्टीने प्रत्येक संस्थेला काळजी घ्यावी लागते.

**डेटा सुरक्षेसाठी घ्यावयाची काळजी :**

१. डेटा अन्य कोणाच्या हाती लागणार नाही याची काळजी घ्यावी.

२. डेटाची गोपणीयता टिकवूण ठेवणे.

३. डेटा सुरक्षीततेसाठी पासवर्डचा वापर करणे.

या मार्गांचा अवलंब न केल्यास महत्वाचा डेटा चुकीच्या हाती जाऊन व्यवसायाची फसवणूक होण्याची दाट शक्यता असते. अन्य क्षेत्रापेक्षा बँकींग क्षेत्रामधील डेटा किंवा माहिती सुरक्षेला अत्यंत महत्त्वाची असते. कारण या क्षेत्रात आर्थिक व्यवहार होत असतात.

**डेटा सुरक्षेअभावी होणारे नुकसान :** माहिती सुरक्षेबाबत योग्य ती दक्षता न घेतल्यास महत्वाचा डेटा चुकीच्या हाती जाऊन मोठ्याप्रमाणात फसवणूक होण्याची दाट शक्यता असते. त्यामध्ये पुढील स्वरूपाचे धोके उदभवण्याची शक्यता असते.

**१. आर्थिक नुकसान :** डेटा सुरक्षेच्या अभावी बँका तसेच वित्तीय संस्थांची महत्त्वपुर्ण माहिती मिळवून त्याआधारे नागरिकांच्या बँक खात्यावरील किंवा बँकाच्या स्वत:च्या खात्यावरील पैसा परस्पर काढून घेण्याचा

प्रकार अनेक ठिकाणी झाल्याचे दिसून येते त्या मधून सदर व्यक्ती किंवा संस्थेला मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान ही झाल्याचे दिसून येते. यावर उपाय म्हणून डेटा सुरक्षेबाबत योग्य ती दक्षता घेणे अपेक्षीत असते.

**२. प्रतिष्ठा खालावते :** एखाद्या बँकेमध्ये किंवा वित्तीय संस्थेमध्ये डेटा सुरक्षेच्या अभावी बँका ग्राहकाची किंवा बँकेची फसवणूक होते त्यावेळी समाज मनातील प्रतिष्ठा खालावत जाते. तसेच देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरदेखील प्रतिष्ठा कमी होवून तीच्या आर्थिक व्यवहारांवर विपरीत परिणाम होत असतो.

**३. नोकऱ्या कमी होण्याचा धोका :** डेटा सुरक्षेच्या बँकिंग क्षेत्रात मोठ्याप्रमाणात फसवणूक झाल्यास त्यामधून बँक व्यवसाय धोक्यात येऊन देशातील बँकामधील नोकऱ्या कमी होऊन देशाची अर्थव्यवस्था देखील धोक्यात येण्याची शक्यता असते.

**४. ग्राहकांचा विश्वास कमी होतो :** डेटा सुरक्षेच्या अभावी बँका तसेच वित्तीय संस्थांची महत्त्वपुर्ण माहिती मिळवून त्याआधारे नागरिकांच्या बँक खात्यावरील किंवा बँकाच्या स्वत:च्या खात्यावरील पैसा परस्पर काढून घेण्यासारखे प्रकार अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्याप्रमाणात घडून येत असल्याने लोकांचा बँकिंग व्यवस्थेवर असलेला विश्वास कमी होतो आणि त्याचा परिणाम बँक व्यवसाय धोक्यात येऊ शकतो.

**५. व्यवहार कमी होण्याची शक्यता :** डेटा सुरक्षेच्या अभावी बँका तसेच वित्तीय संस्थांमध्ये महत्त्वपुर्ण माहिती मिळवून त्याआधारे नागरिकांच्या बँक खात्यावरील किंवा बँकाच्या स्वत:च्या खात्यावरील गैरव्यवहार घडून आल्यास लोकांचा बँकिंग व्यवस्थेवर असलेला विश्वास कमी होतो त्यामधून बँक व्यवसाय कमी होण्याची शक्यता असते.

डेटा सुरक्षेबाबत योग्य ती दक्षता न घेतल्यास वरील स्वरूपाचे धोके निर्माण होतात व त्यामधून बँकिंग क्षेत्राबरोबरच देशाची अर्थव्यवस्था देखील धोक्यात येण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच डेटा सुरक्षेबाबत योग्य ती दक्षता घेण्याची गरज आहे.

### ३.२.४.ब. सायबर गुन्हेगारी घटनेचा अभ्यास (Case Studies on Cyber Crimes) :

सदर विषयाला अनुसरूप विद्यार्थ्यांना विषयाची अधिक माहिती मिळावी, अधिक अभ्यास व संशोधनाला चालना मिळावी यासाठी विविध विषयांच्या अनुषंगाने केस स्टडीच्या स्वरूपात विद्यार्थ्यांनी अभ्यासावा.

**केस स्टडीचे विषय :**

१. सायबर गुन्हे बँकिंग क्षेत्रासमोरील आव्हान.

२. बँकिंग क्षेत्रातील कायद्याचा अभ्यास.

३. बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्याचा अभ्यास इत्यादी.

केस स्टडीची मांडणी करत असताना पुढील घटक विचारात घेऊन मांडणी केल्यास संशोधकास अधिक चांगल्या पध्दतीने विषयाचा अभ्यास व मांडणी करण्याच्या दृष्टीने फायदा होईल.

१. विषयाबाबत प्रस्तावना मांडण्यात यावी.

२. विषयाचे स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करावे.

४. विषयाचे महत्त्व व मर्यादा स्पष्ट कराव्यात.

५. गृहीतांची मांडणी करावी.

६. माहिती संकलन व वर्गीकरण करावे.

७. निष्कर्ष आणि शिफारसीचा समावेश करावा.

**३.३ सारांश :**

सदर प्रकरणामध्ये बँकिंग क्षेत्रातील विविध सुधारणा तसेच विविध कायदे जसे की चलनक्षम दस्तऐवज कायदा, बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायदा, सर्फेसी कायदा, बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायदा, माहिती तंत्रज्ञान कायदा इ कायद्यांची आवश्यक माहिती, त्यामधील विविध तरतुदी तसेच अन्य सुधारणा जसे की डेटा सुरक्षा, सायबर गुन्हेगारी यांचा आढावा सदर प्रकरणामध्ये घेण्यात आला. या विविध सुधारणा तसेच कायद्यामधून बँकिंग क्षेत्राबाबतच्या तरतूदी किती महत्त्वपुर्ण आहेत याची कल्पना येण्यास मदत होते.

**३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**अ. खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) चलनक्षम दस्तऐवज कायदा . . . . . वर्षी करण्यात आला आहे. हा कायदा चलनक्षम दस्तऐवजांच्या संदर्भातील अंत्यंत महत्त्वाचा कायदा

अ. १८६१ ब. १८७१ क. १८८१ ड. १८९१

२) सर्फेसी कायदा थकित कर्जदार व्यक्तीने . . . . . दिवसाच्या आत कर्जाची परफेड करावी अशी नोटीस देण्याचा अधिकार कर्ज देणाऱ्या बँकेला किंवा वित्तीय संस्थेला देतो.

अ. ४५ ब. ६० क. ७५ ड. ९०

३) बँका, वित्तीय संस्था तसेच अन्य बँकिंग संस्थांना रेकॉर्ड तयार करणे तसेच माहिती निश्चीत केलेल्या स्वरूपात तयार करणे . . . . . कायद्याने बंधनकारक केले आहे.

अ. अवैध्य सावकारी प्रतिबंध कायदा ब. सर्फेसी कायदा

क. चलनक्षम दस्तऐवज कायदा ड. यापैकी नाही

४) सॉफ्टवेअरची पायरसीलाच सॉफ्टवेअरची . . . . . असेही म्हणतात.

अ. सायबर गुन्हेगारी ब. चाचेगिरी क. हॅकिंग ड. क्रॅकिंग

५) ५ फेब्रुवारी २००९ रोजी राष्ट्रपतींनी सदर सुधारणा कायद्यांना मंजूरी दिल्यानंतर . . . . . रोजी सुधारीत माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ अंमलात आला.

अ. ऑक्टोबर २००९ ब. मार्च २००९ क. जुन २००९ ड. २७ ऑक्टोबर २००९

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) १८९१ च्या बँकाच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यामध्ये कधी दुरूस्ती करण्यात आली ?

२) बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायदा कधी करण्यात आला ?

३) माहिती तंत्रज्ञान कायद्यामध्ये किती भाग व पोटभाग समाविष्ट करण्यात आलेले आहेत?

४) हॅकिंग म्हणजे काय ?

५) सायबर गुन्हेगार?

**३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे**

**अ. खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) क. १८८१

२) ब. ६०

३) अ. अवैध्य सावकारी प्रतिबंध कायदा

४) ब. चाचेगिरी

५) ड. २७ ऑक्टोबर २००९

**ब. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) १९८३

२) १८९१

३) एकूण १३ भाग व एकूण ९४

४) विविध क्षेत्रात वापरल्या जाणारे संगणक, वेबसाईटची सुरक्षा तोडून माहिती चोरणे, माहितीमध्ये बदल करणे, संगणक प्रणालीमध्ये बिघाड करणे, बँक अकाऊंट मधून पैसे काढून घेणे यालाच हॅकिंग असे म्हणतात.

५) सायबर गुन्हेगार : जे काही घटक सायबर गुन्ह्यामध्ये सहभागी होतात त्या सर्वाचा समावेश सायबर गुन्हेगारामध्ये केला जातो व त्यांनाच सायबर गुन्हेगार असे संबोधले जाते.

**३.६ पारिभाषिक शब्द**

**१) चलनक्षम दस्तऐवज :** आदेश देय किंवा वाहक देय असलेली वचनचिठ्ठी, हुंडी किंवा धनादेश म्हणजे चलनक्षम दस्तऐवज होय.

**२) वचनचिठ्ठी :** निश्चित व्यक्तीस किंवा तिच्या आदेशानुसार दुसऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या वाहकास देय

असलेला, निश्चित रक्कम देण्याचे विनाशर्त दिलेले, कर्त्याच्या सहीचे, लेखी वचन असलेला दस्तऐवज होय.

**३) हुंडी :** केवळ निश्चित व्यक्तीस किंवा तिच्या आदेशानुसार दुसऱ्या व्यक्तीस किंवा वाहकास विशिष्ट रक्कम देणेबाबत कर्त्याने सही करून दुसऱ्या व्यक्तीस लेखी स्वरूपात दिलेल्या विनाशर्त आदेशाचा दस्तऐवज म्हणजे हुंडी होय.

**४) धनादेश** : मागताक्षणी देण्याव्यतिरिक्त दुसऱ्या प्रकारे देय नसलेली व विशिष्ट बँकेवर काढलेली हुंडी म्हणजे धनादेश होय.

**४) सॉफ्टवेअर पायरसी :** बेकायदेशीररित्या सॉफ्टवेअरची कॉपी करून वापरण्यास सॉफ्टवेअरची पायरसी असे म्हणतात.

**५) हॅकिंग :** विविध क्षेत्रात वापरल्या जाणारे संगणक, वेबसाईटची सुरक्षा तोडून माहिती चोरणे, माहितीमध्ये बदल करणे, संगणक प्रणालीमध्ये बिघाड करणे, बँक अकाऊंट मधून पैसे काढून घेणे यालाच हॅकिंग असे म्हणतात

**६) क्रॅकिंग :** हॅकिंगप्रमणाणेच क्रॅकिंग हा देखील सायबर गुन्ह्याचा प्रकार आहे. याच्या सहाय्याने संगणक प्रणाली, तसेच बँकिंग व्यवहारांसाठी जे काही पासवर्ड वापरले जातात ते क्रॅक करून त्यामधील माहिती तसेच पैसे काढण्याचे कार्य क्रॅकर करत असतात.

**७) सायबर स्टॉकिंग :** सायबर गुन्ह्याच्या या प्रकारामध्ये विशिष्ट व्यक्ती किंवा संस्थेची अती महत्त्वाची माहिती हॅक करून त्या माहितीच्या आधारे व्यक्तीला किंवा संस्थेला धमकावण्याचा तसेच मेल करून, संदेश पाठवून किंवा फोन करून त्रास देण्याचा जो प्रकार घडतो त्यास सायबर स्टॉकिंग असे म्हणतात.

**८) डेनायल ऑफ सर्व्हिस अटॅक :** सायबर गुन्ह्याच्या या प्रकारामध्ये एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेची नेटवर्कची सुविधा बंद करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला जातो. त्यामध्ये त्यांना मोठ्या प्रमाणात मेल पाठविले जातात त्यामधून नेटवर्क पॅक होणे तसेच मेल बॉक्स भरणे नविन मेल न येणे यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

**९) व्हायरस डेसीमिनेशन :** जेव्हा संगणकाच्या बाहेरील सुचना संगणक प्रणालीमध्ये प्रवेश करून संगणक प्रणाली खराब किंवा त्याची नासधूस करण्याचे कार्य व्हायरस करतो.

**३.७ सरावासाठी स्वाध्याय**

**अ) टिपा लिहा**

१) चलनक्षम दस्तऐवज कायदा

२) डेटा सुरक्षीतता

३) सायबर गुन्हेगारी

४) सायबर गुन्ह्यांचे प्रकार

५) दस्तऐवज काढण्याचा अधिकार

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न**

१) चलनक्षम दस्तऐवज कायद्याचे स्वरूप आणि तरतुदी स्पष्ट करा.

२) बँकांच्या पुस्तकांचा पुरावा कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी विशद करा.

३) सर्फेसी कायद्याने बँका व वित्तीय संस्थांना दिलेले अधिकारांची चर्चा करा.

४) बेकायदेशीर सावकारी प्रतिबंध कायद्याचे उद्देश आणि महत्त्वपुर्ण तरतुदी सविस्तर स्पष्ट करा.

५) माहिती तंत्रज्ञान सुधारणा कायदा स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


1. M.L.Tannan, C.R. Datta & S.K. Kataria (2011) Banking Law and Practice, Wadhwa & Company, Nagpur
2. Right to Information Act, 2005
3. S. R. Bhansali, Information Technology Act, 2000 (2003), University Book House Pvt. Ltd., Jaipur
4. Sudhir Naib, The Information Technology Act, 2005 (2011), A Handbook, OUP, New York
5. The Bankers' Books Evidence Act–1891
6. The Securitisation and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act–(SARFASI-2002)
7. Vasant C. Joshi and Vinay V Joshi (1998), Managing Indian Banks: The Challenges Ahead, Response Books, New Delhi.
8. Vasu Deva, Cyber Crimes and Law Enforcement
9. IIBF, Credit and Risk Management, McMillan Publications


***

# घटक क्र. ४
# बँक व्यवस्थापन व्यवहार
## (Bank Management Practices)

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ बँक व्यवस्थापनाचे सर्वसाधारण स्वरूप

अ) मुख्य कार्यालयाची रचना व स्वरूप

ब) बँकेच्या मुख्य कार्यालयातील विभाग व त्यांची कार्ये

क) विभागीय कार्यालये/प्रादेशिक कार्यालये

४.४ सरव्यवस्थापक व प्रादेशिक कार्यालयाच्या व्यवस्थापकांची कार्ये व जबाबदाऱ्या

४.५ बँक शाखा - रचना, कर्मचारी व शाखा व्यवस्थापकाची कार्ये

४.६ घटक अभ्यास

४.७ सारांश

४.८ पारिभाषिक शब्द

४.९ बहुपर्यायी प्रश्न व उत्तरे

४.१० स्वाध्यायासाठी प्रश्न

४.११ अधिक अभ्यासासाठी पुस्तके

**४.१ उद्दिष्ट्ये :**

सदर घटकाचा अभ्यास केला असता

१) बँकेच्या मुख्य कार्यालयाची व प्रादेशिक कार्यालयाची रचना समजेल.

२) बँकेचे सरव्यवस्थापक व विभागीय व्यवस्थापकांची कार्ये व जबाबदाऱ्या समजण्यास मदत होईल.

३) बँक शाखेचे स्वरूप, शाखेतील कर्मचारी आणि शाखा व्यवस्थापकाची कार्ये याबाबतची माहिती मिळेल.


**४.२ प्रस्तावना :**

बँकींग संस्था ही एक व्यावसायिक संस्था असल्याने या संस्थेच्या अचूक व गतीमान व्यवस्थापनासाठी प्रत्येक बँकेची एक व्यवस्थापकीय यंत्रणा कार्यरत असते. अर्थात प्रत्येक बँकेचा व्यवसाय, व्यवसायाची व्याप्ती, शाखा, कार्यक्षेत्र इत्यादीनुसार व्यवस्थापकीय रचना वेगवेगळी असू शकते. तसेच बँकेचा प्रकार म्हणजेच खाजगी

बँक, सार्वजनिक बँक, सहकारी बँक किंवा विदेशी बँक इत्यादीनुसारही ही व्यवस्था वेगवेगळी असल्याचे दिसून येते. प्रस्तुत घटकामध्ये या सर्व बाबींचा विचार करून बँक व्यवस्थापनाची सर्वसामान्य व्यवस्था स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**४.३ बँक व्यवस्थापनाचे सर्वसाधारण प्रारूप :**

भारतातील विविध बँकामधील व्यवस्थापन यंत्रणा लक्षात घेता बँक व्यवस्थापनासाठी पुढीलप्रमाणे व्यवस्था निर्माण केलेली असते.





मोठ्या बँकांचा विचार करता उच्च पातळीवर कार्य करणारे मुख्य कार्यालय (Head office of Central Office) आवश्यकतेनुसार प्रादेशिक कार्यालये (Regional Offices) तथा विभागीय कार्यालये (Divisional Offices ) आणि प्रत्यक्ष ग्राहकांसाठी सेवा देणारी बँकेची शाखा कार्यालये (Branch Offices) कार्यरत असतात. काही बँकामध्ये प्रादेशिक कार्यालये व विभागीय कार्यालये एकच असतात तर काही बँकामध्ये ती स्वतंत्रपणे कार्यरत असतात. सामान्यत: ज्या बँकांच्या शाखा अधिक आहेत व कार्यक्षेत्र मोठे आहे अशा बँकामध्ये प्रादेशिक कार्यालये व त्यांच्या अधिपत्याखाली कार्य करणारी विभागीय कार्यालये असतात.

**अ) मुख्य कार्यालयाची रचना व स्वरूप : (Structure and Nature of Head Office)**

बँकेचे मुख्य कार्यालय हे संबंधित बँकेच्या संपूर्ण कारभाराचे मुख्य केंद्र असते. बँकेच्या व्यवसायाबाबतची सर्व ध्येय-धोरणे ठरवणे विभागीय कार्यालयासह बँकेच्या सर्व शाखाचे नियंत्रण करून व्यवसाय वृद्धी व विकास घडवून आणण्यासाठी बँकेच्या मुख्य कार्यालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. बँकेच्या व्यावसायानुसार आणि व्याप्तीनुसार प्रत्येक मुख्य कार्यालयाचे स्वरूप वेगवेगळे असल्याचे दिसून येते. तथापि मुख्य कार्यालयाची सर्वसाधारण रचना पुढीलप्रमाणे असते.

प्रत्येक बँकेमध्ये मुख्य कार्यालयाची रचना वेगवेगळी असली तरी सर्व प्रकारच्या बँकेमध्ये संचालक मंडळ हे अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. त्यामुळे बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये संचालक मंडळासह, चेअरमन मुख्य कार्यकारी अधिकारी, जनरल मॅनेजर, सहाय्यक जनरल मॅनेजर, मॅनेजर, विभाग प्रमुख तसेच इतर अधिकारी व प्रशासकीय सेवक कार्यरत असतात.

**बँकेच्या मुख्य कार्यालयाची रचना :**




टिप : बँकेचा प्रकार व व्याप्तीनुसार यामध्ये तफावत असते.

**१) बँकेचे चेअरमन किंवा अध्यक्ष : (Chairman / President)**

बँकेच्या प्रकारानुसार बँकेच्या व्यवस्थापकीय रचनेमध्ये चेअरमन किंवा अध्यक्षांची निवड केलेली असते. बँकेचा चेअरमन हा संचालक मंडळाचा प्रमुख असतो. तसेच तो बँकेच्या भागधारकांचा किंवा भागधारकांनी नियुक्त केलेल्या संचालकांचा नेता म्हणून बँकेच्या ध्येय-धोरण निश्चितीच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिक पार पाडत असतो. सहकारी बँकामध्ये तो बँकेच्या सभासदांनी निवडून दिलेल्या संचालकामधील एक संचालक असतो. तर राष्ट्रीयकृत बँकामध्ये शासनाने नियुक्त केलेला अधिकारी असतो. बँकेच्या सर्व प्रगती व विकासाच्या प्रक्रियेत कायद्याच्या चौकटीमध्ये राहून निर्णय घेण्याचे अधिकार बँकेच्या चेअरमनला प्राप्त झालेले असतात. अर्थात संचालक मंडळाने ठरवून दिलेली धोरणे राबवण्याची जबाबदारीही बँकेच्या चेअरमनवर असते.

**२) बँकेचे संचालक मंडळ : (Board of Directors)**

बँकेचे संचालक मंडळ हे बँकेची ध्येयधोरणे ठरवणारे महत्त्वाचे अधिकार मंडळ असते. संचालक मंडळामध्ये बँकेच्या भागधारकांनी नियुक्त केलेले (निवडून दिलेले) प्रतिनिधी कार्यरत असतात. राष्ट्रीयकृत किंवा खाजगी बँकामध्ये बँकींग नियमन कायदा १९४९ मधील तरतुदीनुसार तसेच खाजगी बँकाबाबत कंपनी कायदा

२०१३ मधील तरतुदीनुसार संचालक हे भागधारकाचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत असतात. राष्ट्रीयकृत बँकामध्ये संचालक मंडळामध्ये प्रतिनिधीची नियुक्ती शासनाकडून केली जात असते. त्यामध्ये काही संचालक हे कार्यकारी संचालक (Executive Directors) म्हणून तर काही संचालक स्वतंत्र संचालक (Independant Directors) म्हणून कार्यरत असतात.

सहकारी बँकामध्ये संचालक मंडळ हे बँकेच्या भागधारकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीचे असते. त्यामध्ये त्या-त्या राज्यातील सहकार कायद्यातील तरतुदीनुसार वेगवेगळ्या प्रवर्गामधून प्रतिनिधी निवडून देण्याची तरतूद असते त्याप्रमाणे पूर्ण संचालक मंडळ हे भागधारकानी निवडून दिलेल्या प्रतिनिधीचे असते. तसेच त्यांच्या बरोबर RBI च्या निर्देशानुसार बँकींग, सहकार, वित्त इत्यादी क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना तज्ञ संचालक म्हणूनही नियुक्ती केली जाते.

**३) व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी : ( Managing Director of Chief Executive Officer)**

सामान्यत: राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका आणि सहकारी बँकामध्ये व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (MD & CEO) हा प्रशासकीय यंत्रणेमधील महत्त्वाचा अधिकारी असतो. वास्तविक पहाता (MD & CEO) हा बँकेचा पगारी नोकर असतो. तसेच तो बँकेच्या संचालक मंडळाचा प्रतिनिधीही असतो व संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून घेण्याचे कार्य करणारा अधिकारी असतो. त्यामुळे त्यास व्यवस्थापकीय संचालक (Managing Director MD) असे म्हणतात. MD हा प्रशासनामधील सर्वोच्च अधिकारी असतो व कामकाजाची अंमलबजावणी करणारा मुख्य अधिकारी असल्याने त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी (Chief Executive Officer - CEO) असेही म्हणतात.

**४) उप-मुख्य कार्यकारी अधिकारी : ( Deputy Chief Executive Officer)**

मोठ्या बँकांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी उप-मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. बँकेच्या कार्यकक्षा व व्याप्ती लक्षात घेऊन डेप्युटी सी. ई. ओ. (Dy CEO) ची नेमणूक केली जाते. याची संख्या बँकेनुसार वेगवेगळी असल्याचे दिसून येते. अनेक बँकांमध्ये या पदाचे नाव Deputy Managing Directar - DMD म्हणजे उप-व्यवस्थापकीय संचालक असेही असल्याचे दिसून येते. हे पदनाम उप-व्यवस्थापकीय संचालक असे असले तरी हा अधिकारी संचालक मंडळाचा सदस्य नसतो. मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक हा बँकेच्या संचालक मंडळातील पदसिद्ध सदस्य असतो. म्हणजेच DMD किंवा Dy CEO ही कामकाजाच्या सोईसाठी निर्माण केलेली मात्र बँकेच्या संचालक मंडळाने मान्यता दिलेली पदे असतात. बँकेचे MD किंवा CEO आपले काही अधिकारी व जबाबदाऱ्या DMD किंवा Dy CEO कडे हस्तांतरीत करतात व त्यावर पर्यवेक्षणही करत असतात.

**५) जनरल मॅनेजर : ( General Manager - GM) सरव्यवस्थापक**

जनरल मॅनेजर हा बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यरत असणाऱ्या सर्व मॅनेजर, सहाय्यक मॅनेजर व अधिकाऱ्यांचा

प्रमुख असतो. तथापि प्रत्येक बँकामध्ये जनरल मॅनेजमेंटचे अधिकार व जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात. मोठ्या बँकांच्या मुख्य कार्यालयामध्ये एकापेक्षा अधिक जनरल मॅनेजर नियुक्त केलेले दिसून येतात. यामध्ये प्रामुख्याने बँकेच्या प्रत्येक महत्त्वाच्या विभागासाठी एक याप्रमाणे जनरल मॅनेजर्स नियुक्त केल्याचे दिसून येते.

उदाहरणार्थ :

जनरल मॅनेजर – MSME युनिट

जनरल मॅनेजर – Branch Expansion

जनरल मॅनेजर – HRM & Training Department

जनरल मॅनेजर – Information Technology Department

जनरल मॅनेजर – Corporate Credit Department

जनरल मॅनेजर – Strategic Planning Department

जनरल मॅनेजर – Retail Banking Department

जनरल मॅनेजर – Audit and Inspection

जनरल मॅनेजर – Agriultural Credit Department

जनरल मॅनेजर – Establishement Department

जनरल मॅनेजर – Treasury Department

**६) सहाय्यक जनरल मॅनेजर : ( Assistant Ganeral Manager - AGM)**

बँकेतील मुख्य कार्यालयात सुरू असलेल्या विविध विभागामध्ये जनरल मॅनेजर हे प्रमुख म्हणून कार्यरत असले तरी त्यांच्या मदतीला सहाय्यक जनरल मॅनेजर म्हणजेच सहाय्यक सरव्यवस्थापक कार्यरत असतात. सहाय्यक सरव्यवस्थापक बँकेच्या ज्या विभागात कार्यरत असतात. त्या विभागाच्या सरव्यवस्थापकास कामामध्ये मदत करणे, त्यांना आवश्यकतेनुसार सल्ला देणे, त्यांनी सोपवलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करणे, आवश्यकतेनुसार संबंधित विभागातील आवश्यक ती माहिती पुरवणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी सहाय्यक सरव्यवस्थापकाची भूमिका महत्त्वाची असते. तसेच जेव्हा सरव्यवस्थापक अनुपस्थितीत असतात तेव्हा संबंधित विभागाच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडणे व त्यांच्या वतीने मिटींग अटेंड करणे व वरील अधिकाऱ्यांना आवश्यक ती माहिती पुरवणे ही कार्ये सहाय्यक सरव्यवस्थापक पार पाडत असतात.

**७) व्यवस्थापक व सहाय्यक व्यवस्थापक : (Manager & Assistant Manager)**

बँकेच्या प्रत्येक विभागामध्ये कामकाजाच्या सोईसाठी तसेच अधिकारांचे विकेंद्रीकरण करून कामकाजाची गती वाढवण्यासाठी तसेच निर्णय व अधिकार प्रक्रियेमध्ये सर्वसमावेशक धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी बँकेच्या मुख्य विभागामधील विविध प्रकारच्या उपविभागासाठी व्यवस्थापक (Managers) आणि त्यांना मदत करण्यासाठी सहाय्यक व्यवस्थापक (Assistant Managers) नियुक्त केलेले असतात.

उदाहरणार्थ :

व्यवस्थापक - Customer Services

व्यवस्थापक - Loan Department

व्यवस्थापक - Recovery Department

व्यवस्थापक - Provident Fund

व्यवस्थापक - Recruitment Department

व्यवस्थापक - KYC and AML

व्यवस्थापक - Marketing Department

व्यवस्थापक - Risk Management

इत्यादी विविध प्रकारचे उपविभागीय किंवा विभागासाठी व्यवस्थापक व उप-व्यवस्थापकांची नेमणुक केलेली असते. त्याची जबाबदारी संबंधित कार्यापुरती मर्यादीत असते.

**८) अधिकारी व सहाय्यक : (Officers and Assistants)**

बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या विविध विभागातील कामकाजासाठी व्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक, सरव्यवस्थापक इत्यादीबरोबरच त्यांच्या मदतीला विविध विषयातील तज्ञ अधिकारी (Specialist Officers) तसेच इतर सामान्य अधिकारी (General Officers) नियुक्त केलेले असतात. तसेच या अधिकाऱ्याच्या मदतीसाठी सहाय्यक, क्लार्क, अटेंडंट, शिपाई इत्यादी अधिकारी व कर्मचारी नियुक्त केलेले असतात.

उदाहरणार्थ :

| | | |
|---|---|---|
| आय टी ऑफिसर्स | - | IT Officers |
| लॉ ऑफिसर्स | - | Law Officers |
| ॲग्रिकल्चर ऑफिसर्स | - | Agriculture Officers |
| मार्केटिंग ऑफिसर्स | - | Marketing Officers |
| फायनान्स ऑफिसर्स | - | Finance Officers |
| राजभाषा अधिकारी | - | Rajabhasha Officers |
| ट्रेझरी ऑफिसर्स | - | Terasury Officers |
| अकाऊंट ऑफिसर्स | - | Account Officers |
| ऑडिटर | - | Auditor Officers |
| बँक इन्स्पेक्टर | - | Bank Inspectors |
| मनुष्यबळ विकास अधिकारी | - | H. R. Officers |

**ब) बँकेच्या मुख्य कार्यालयातील विभाग व त्यांची कार्ये : (Department in Head Officer of the Bank and Functions)**

देशातील विविध प्रकारच्या बँका, त्यांची मुख्य कार्यालये आणि मुख्य कार्यालयातील विविध विभागांचा विचार करता यामध्ये एकवाक्यता आणि समानता नसते तथापि सर्व प्रकारच्या बँकांची मुख्य कार्यालये पाहता त्यामधील काही महत्त्वाचे विभाग व त्यांची कार्ये पुढीलप्रमाणे असतात.

**१) सामान्य प्रशासन विभाग : (General Administration Department)**

सामान्य प्रशासन विभाग व बँकेच्या मुख्य कार्यालयातील दैनंदिन कारभाराची जबाबदारी पार पाडणारा महत्त्वाचा विभाग असतो. या विभागास अस्थापना विभाग (Establishement Department) असेही संबोधले जाते. बँकेच्या प्रशासनाबाबतचे पत्रव्यवहार करणे, पत्रास उत्तर देणे, सचिवाच्या जबाबदाऱ्या पार पाडणे, अहवाल तयार करणे, बँकेच्या विविध सभा व समित्यांचे इतिवृत्त तयार करणे, इत्यादी जबाबदाऱ्या या विभागाद्वारे पार पाडल्या जातात.

**२) कर्ज विभाग : (Loan Department)**

बँकेच्या सर्व प्रकारच्या कर्ज व्यवहारांचे नियोजन, वितरण व व्यवस्थापन करण्यासाठी बँकेचा कर्ज विभाग हा महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. मोठ्या बँकांच्या मुख्य कार्यालयामध्ये शेती कर्ज विभाग, औद्योगिक कर्जपुरवठा, गृह कर्जपुरवठा, पर्सनल लोन, कॅश क्रेडीट, लघुउद्योग कर्जपुरवठा विभाग असे स्वतंत्र विभाग किंवा मुख्य विभागाच्या अंतर्गत अनेक उपविभाग कार्यरत असतात. हा विभाग आपल्या बँकेचा विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शाखांच्या कर्जवितरण व त्यांच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवतो व त्याचे व्यवस्थापन करत असतो.

**३) लेखाकर्म विभाग : (Account Department)**

बँकेच्या सर्व शाखा, विभागीय कार्यालये, तसेच प्रादेशिक कार्यालयाद्वारे होणाऱ्या विविध प्रकारच्या आर्थिक व्यवहाराच्या अचूक नोंदी घेऊन RBI तसेच लेखाकर्माच्या नियम व कायद्यानुसार अकाऊंट लिहणे व त्याचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी या विभागाची असते. बँकेचे अंदाजपत्रक तयार करणे, खर्चाचे वाटप, उत्पन्नाची वर्गवारी करणे, परफॉरमन्स तपासणे, ताळेबंद फायनल करणे, नफा-तोट्याचा, तरतुदीचा हिशेब ठेवणे इत्यादी कार्ये या विभागाद्वारे केली जातात.

**४) लेखापरीक्षण व तपासणी विभाग : (Audit & Inspection Department)**

बँकेतील विभागीय कार्यालये व शाखांमधून झालेल्या विविध आर्थिक व्यवहार तसेचा कर्जव्यवहार ठेवी संकलन, व्याजाचे अदान-प्रदान, वसुली, देयके, गुंतवणूक व्यवहार व इतर आर्थिक देवाण घेवाणाची वैधानिकता व कायदेशीरपणा तपासण्याची कार्ये लेखापरीक्षण विभाग करत असतो. याकरीता बँकेचे त्रैमासिक, सहामाही, नऊमाही व वार्षिक ऑडीट केले जाते. सामान्यत: हे अंतर्गत लेखापरीक्षण असते. मुख्य लेखापरीक्षणपूर्वी चूका दुरूस्त करणे, वैधानिकता तपसणेसाठी हे ऑडीट विभाग कार्यरत असतो. तसेच बँकेचा तपासणी (Inspection) विभाग देखील पुर्वसूचित (Intemeted) व अ-पुर्वसूचित (Non-Intemeted) या दोन्ही पद्धतीने तपासणी करण्याचे कार्य करीत असतो.

### ५) मनुष्यबळ विकास विभाग : (Human Resource Development Department)

प्रत्येक बँकेच्या मुख्य कार्यालयातील हा एक अत्यंत महत्त्वाचा विभाग असून या विभागाद्वारे बँकेच्या शाखा, विभागीय किंवा प्रादेशिक कार्यालये, मुख्य कार्यालय तसेच संचालक मंडळातील सदस्यांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याची महत्त्वाची जबाबदार पार पाडत असतो. कर्मचारी व अधिकाऱ्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे, नविन कायदे, नवीन व्यवसाय, नविन तंत्रज्ञान कार्यपद्धतीतील बदल इत्यादीबाबत प्रशिक्षण सत्राचे आयोजन करणे, त्याच्यासाठी शिक्षण व प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे या जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात. यामध्ये कायदाविषयक, वित्तविषयक, तंत्रज्ञानविषयक, मार्केटींग, वसुली, व्यवस्थापन, स्ट्रेस मॅनेजमेंट इत्यादी बाबतच्या प्रशिक्षणांचा समावेश होतो.

### ६) माहिती तंत्रज्ञान विभाग : (Information Technology Department)

आधुनिक बँकींग व्यवसायामध्ये माहिती माहिती तंत्रज्ञानाचा बँकींग मधील वापर वाढत असून बँकेच्या व्यवस्थापनाबरोबरच विविध प्रकारच्या बँकींग सेवा देण्यासाठी आय. टी. चा वापर केला जात आहे. या सर्व आय. टी. सेवा व प्रणालीचे व्यवस्थापन, नियंत्रण व नियमन करण्याचे कार्य हा विभाग करत असतो. यामध्ये प्रामुख्याने सायबर सेक्युरीटी, डेटा सेंटर, डिजास्टर रिकव्हरी साईट, नेटवर्कींग, ऑनलाईन पोर्टल मॅनेजमेंट, फायरवॉल मॅनेजमेंट, फ्रॉड डिटेक्टेशन व मॉनिटरींग इत्यादीचा समावेश होतो.

### ७) गुंतवणूक व्यवस्थापन विभाग : (Investment Management Department)

प्रत्येक बँकेस आपल्याकडील उपलब्ध निधी हा SLR Investment आणि Non SLR Investment मध्ये गुंतवणे आवश्यक असते. यामध्ये बँकेने आपल्याकडील निधी, अंतर बँक ठेवी, शेअर्स, कर्जरोखे, बोनस, मॅच्युअल फंड, सरकारी रोखे, ट्रेझरी बिल्स इत्यादीमध्ये गुंतवणे अपेक्षित असते. तथापि या कार्यासाठी विशेषीकृत ज्ञान व कौशल्याची आवश्यकता असते. गुंतवणूक करण्यासाठी भांडवलबाजार व नाणेबाजारातील ट्रेंड विचारात घेऊन योग्य वेळी गुंतवणूक व अपगुंतवणूक तसेच रोख्यांची खरेदी-विक्री करण्याचे निर्णय घेऊन बँकेस अधिका-अधिक लाभांश, परतावा व व्याज मिळवून देण्याची जबाबदारी या विभागावर असते. अनेक बँकामध्ये या विभागास कोषागार व्यवस्थापन विभाग Treasuey Management Department असेही म्हणतात.

### ८) कायदा विभाग : (Legal Department)

बँकींग व्यवसायातील विविध प्रकारच्या व्यवहारांचा संबंध देशातील विविध प्रकारच्या कायद्यांशी असतो. उदा. - करार कायदा, कंपनी कायदा, बँकींग नियमन कायदा, पेमेंट अॅन्ड सेटलमेंट अॅक्ट, लेखापरीक्षण नियम, सहकार कायदा, आयकर कायदा इत्यादी या सर्व बाबतीत कायदेशीर सल्ला देण्यासाठी, बँकेच्या कामकाजामध्ये कायदेशीरपणा आणण्यासाठी, बेकायदेशीर व्यवहारास पायबंद घालण्यासाठी, कायदेशीर बाबींवर सल्ला मसलत करून योग्य तो निर्णय घेण्यासाठी कायदा विभागाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. या विभागात बँकेने नियुक्त केलेले लॉ ऑफिसर आणि कायदाविषयक सल्लागार कार्यरत असतात. आवश्यकतेनुसार इतर तज्ञ वकील किंवा कायदा सल्लागाराचीही नियुक्त केली जाते.

### ९) राजभाषा विभाग : (Rajabhasha Department)

भारतातील सर्व राष्ट्रीयकृत बँका आणि खाजगी बँकांमधील हा एक महत्त्वाचा वैधानिक विभाग असून तो

कायद्याने बंधनकारक आहे. तसेच या विभागासाठी हिंदी भाषा अधिकारी नियुक्त करण्याचेही बंधन बँकावर आहे. बँकेतील विविध पत्रव्यवहार, अहवाल, संदेश हिंदी भाषेतून करून देण्याचे तसेच महत्त्वाचे दस्तऐवज स्थानिक भाषेतून हिंदी भाषेत किंवा इंग्रजी भाषेतून हिंदी भाषेत करून घेण्याची जबाबदारी या विभागाची असते. तसेच प्रशिक्षण विभागाबरोबर संलग्नता निर्माण करून बँक कर्मचाऱ्यांना हिंदी भाषेचा वापर करण्याबाबत प्रशिक्षण देण्याचे कार्यही हा विभाग करत असतो. तसेच भारतातील राजभाषा अधिनियम १९६३ मधील तरतुदी व त्यानुसार सोपवण्यात आलेल्या विविध जबाबदाऱ्याची पुर्तता करण्यासाठी हा विभाग महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. बँकींग व्यवहारामध्ये हिंदी भाषेचा वापर घडवून आणण्याची जबाबदारी देखील याच विभागाद्वारे पार पडली जात असते.

**१०) कर्ज पर्यवेक्षण व वसुली विभाग : (Credit Monitoring and Recovery Department)**

मोठ्या बँकामध्ये कर्ज विभागाच्या बरोबरीने काम करणारा कर्ज पर्यवेक्षण आणि वसुली विभाग हा एक स्वतंत्र विभाग कार्यरत असतो. बँकेच्या विविध शाखांद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या मंजुरीची प्रक्रिया, कर्ज वितरण, कर्ज रकमेचा वापर, कर्जाच्या हप्त्यांची परतफेड इत्यादी प्रक्रियेवर देखरेख ठेवणे, थकबाकीमध्ये जाण्याची शक्यता असलेली कर्ज प्रकरणे किंवा थकबबाकीमध्ये असलेल्या कर्जाच्या वसुलीसाठी प्रयत्न करणे, आवश्कता वाटल्यास काही कर्जप्रकरणे कर्ज वसुली न्यायाधिकरणां (Debt Recovery Tribunals) कडे सादर करणे. त्यांचा पाठपुरावा करणे इत्यादी जबाबदाऱ्या या विभागाद्वारे पार पाडल्या जात असतात.

**११) किरकोळ बँकींग विभाग : (Retail Banking Department)**

प्रत्येक बँकेचा मुख्य व्यवसाय हा किरकोळ बँकींग सेवांमधुन विस्तारत असतो. त्यामुळे बँकेच्या विविध शाखांतील रिटेल बँकींग सेवांचा विस्तार करण्यासाठी तसेच या सेवांची व्याप्ती वाढवणे, सेवांचा दर्जा सुधारणे, या सेवांचा विस्तार करणे. ग्राहकाच्या अपेक्षाप्रमाणे नवनवीन रिटेल बँकींग सेवा उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करणे व अनुषंगिक विविध जबाबदाऱ्या पूर्ण करणे हे या विभागाचे कार्य असते.

**१२) वित्तीय समावेशन विभाग : (Finanatal Inclusion Department)**

RBI व भारत सरकारच्या धोरणानुसार देशातील बँका व वित्तीय संस्थामध्ये वित्तीय समावेशन हा एक स्वतंत्र विभाग तथा कक्ष सुरू करण्यात आलेला आहे. या विभागाद्वारे देशातील सामान्य जनतेस किफायतशीर दरामध्ये किमान आवश्यक बँकींग सेवा देण्याची व्यवस्था केली जाते. तसेच ज्या लोकांपर्यंत बँकींग सेवा पोहचलेल्या नाहीत अशा लोकांना बँकींग सेवांच्या परीघामध्ये आणण्यासाठी विशेष प्रयत्न करणे तसेच ज्या गावामध्ये/खेड्यामध्ये बँक शाखा नाहीत अशा लगतच्या गावामध्ये बँक समन्वयक (Bank Correspondents) ची नियुक्ती करून त्याच्यांपर्यंत बॅकींग सेवा पोहचवण्याची जबाबदारी या विभागावर असते.

**१३) आंतरराष्ट्रीय बँकींग विभाग : (International Banking Department)**

ज्या बँकींग संस्था विदेशी चलनातील कर्जपुरवठा तसेच विदेशी हुंड्याची वटवणूक, चलन विनिमय, आयात-निर्यात विषयक कर्जपुरवठा, (Foreign Currency Non-Resident-FCNR) खाती किंवा डॉलर अकाऊंट इत्यादीचे व्यवहार करतात. अशा बँकांच्या शाखामधील आंतरराष्ट्रीय बँकींग व्यवहारासाठी सोईसुविधा देण्यासाठी किंवा त्याच्यावर पर्यवेक्षण करण्यासाठी हा विभाग महत्त्वाची भूमिका पार पाडतो. तसेच ज्या बँकांनी परदेशात आपल्या शाखा उघडलेल्या आहेत अशा शाखाचे व्यवस्थापन, देखरेख करणे, त्याच्यासाठीची कायदेशीर

प्रक्रिया पूर्ण करणे, त्यांना मदत करणे, मार्गदर्शन करण्यासाठी हा विभाग कार्यरत असतो.


**१४) इतर विभाग : (Other Departments)**

वरील विविध विभागांबरोबरच अनेक बँकामध्ये पुढील विविध प्रकारचे विभागही दिसून येतात.

- शासकीय अर्थव्यवहार विभाग
- व्यावसायिक नियोजन व धोरण विभाग
- डिजीटल बँकींग विभाग
- कार्पोरेट कम्युनिकेशन विभाग
- रिस्क मॅनेजमेंट विभाग
- विदेशी विनिमय विभाग
- पब्लिक रिलेशन विभाग
- सांख्यिकी, संशोधन व प्रकाशन विभाग

**क) विभागीय कार्यालये व प्रादेशिक कार्यालये : (Zonal Offices and Regional Offices)**


बँकेतील प्रशासकीय सोईसाठी तसेच अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यासाठी तसेच शाखांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी बँकेच्या व्यवस्थापनाच्या संरचनेमध्ये विभागीय कार्यालये आणि प्रादेशिक कार्यालयाची व्यवस्था करण्यात आलेली असते. सामान्यत: मोठ्या बँकामध्ये प्रत्येक राज्यामध्ये एक याप्रमाणे विभागीय कार्यालय आणि त्यांच्या अंतर्गत कार्य करणारी प्रादेशिक कार्यालये स्थापन केलेली दिसून येतात. बँकेचा शाखाविस्तार तसेच व्यवसायाची व्याप्ती या गोष्टींचा विचार करून प्रादेशिक कार्यालयांची संख्या निर्धारीत करण्यात आलेली असते.



देशातील राष्ट्रीयकृत बँका व खाजगी बँकामधील प्रशासकीय व्यवस्था विचारात घेता विभागीय कार्यालये व प्रादेशिक कार्यालयांच्या रचनेमध्ये भिन्नता असली तरी त्यांची सर्वसाधारण रचना वरील कोष्टकामध्ये दर्शविल्याप्रमाणे असते.


### १) **विभागीय कार्यालये : (Zonal Offices)**

विभागीय कार्यालये ही प्रादेशिक कार्यालये आणि बँकेचे मुख्य कार्यालय यामध्ये दूवा निर्माण करणारी प्रशासकीय व्यवस्था असते. सामान्यत: बँकेचा शाखा विस्तार विचारात घेऊन तसेच शाखांची घनता विचारात घेऊन एका राज्यासाठी एक किंवा दोन-तीन राज्यांसाठी एक असे विभागीय कार्यालय स्थापन करण्यात येते. वस्तुत: प्रत्येक बँकेमध्ये ही रचना वेगवेगळी असते व त्याचे स्वरूपही वेगवेगळे असते. यामधील प्रशासकीय व्यवस्था सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून येते.




### २) **प्रादेशिक कार्यालये : (Regional Offices)**

बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिपत्याखाली बँकेच्या विविध शाखा कार्यरत असतात. या शाखांच्या विकासासाठी, त्यांच्या व्यवसाय वृध्दीसाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी या कार्यालयाकडे असते. तसेच या जबाबदारी बरोबरच आपल्या कक्षेत असणाऱ्या सर्व शाखांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्यदेखील त्या कार्यालयास करावे लागते. या कार्यालयातील व्यवस्थापकीय संरचना सामान्यपणे पुढीलप्रमाणे असते.




बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाची रचना लक्षात घेता बँकेचे मुख्य प्रादेशिक व्यवस्थापक **(Chief Regional Manager)** महत्त्वपूर्ण घटक म्हणून काम पाहत असतो.

### ४.४ सरव्यवस्थापक आणि प्रादेशिक कार्यालयाच्या व्यवस्थापकाची कार्ये व जबाबदाऱ्या :

बँकींग संस्थामध्ये सरव्यवस्थापक किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी हा व्यवस्थापनातील महत्त्वाचा अधिकारी असतो. देशातील विविध प्रकारच्या बँकींग संस्थांचा विचार करता सरव्यवस्थापक (General Manager) ह्या पदाप्रमाणेच व्यवस्थापकीय संचालक (Managing Director-MD), मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) या प्रकारची पदे असल्याचे दिसून येते. सामान्यत: या पदाच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे असतात.

**अ) सरव्यवस्थापकाची कार्ये व जबाबदाऱ्या : (Role and Responsibilities of General Manager)**

१) बँकेचे संचालक मंडळ आणि बँकेच्या व्यवस्थापनातील विविध अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्यातील दुवा म्हणून कार्य करणे.

२) बँकेच्या संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची व्यवस्था राबवणे व त्यावर देखरेख आणि नियंत्रण ठेवणे.

३) बँकेतील विविध प्रकारच्या समस्या, अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, गरजेनुसार त्यासाठी संचालक मंडळाचे मार्गदर्शन व सल्ला घेणे.

४) संचालक मंडळाच्या सभा बोलवणे, सभेमध्ये विविध विषयांची मांडणी करुन त्याबाबतचे निर्णय व ठराव पारीत करुन घेणे.

५) बँकेच्या दैनंदिन कारभारासाठीची व्यवस्था निर्माण करुन विहीत पध्दतीने कामकाज पूर्ण करुन घेणे.

६) प्रादेशिक कार्यालये व विभागीय कार्यालयातील कामकाजाचा आढावा घेणे त्यांना गरजेनुार मार्गदर्शन करणे, सल्ला देणे.

७) बँकेच्या वार्षिक प्रगतीचा अहवाल संचालक मंडळासमोर मांडणे.

८) बँकेच्या पुढील वाटचालीचा आराखडा तयार करुन त्यास संचालक मंडळाची मान्यता घेणे व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करणे.

९) बँकेतील सेवक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

१०) बँकेतील कर्मचारी वर्गाचे विविध प्रश्न व समस्या सोडवणे.

११) बँकेतील ग्राहक सेवा, विविध योजना, शाखा विस्तार, ग्राहकांच्या अपेक्षा यांचा विचार करुन नवनवीन सेवा-सुविधा देण्याची व्यवस्था करणे.

१२) बँकेचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करुन घेणे व त्यास संचालक मंडळाची परवानगी व मान्यता घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणे.

१३) संचालक मंडळाच्या वतीने मिळालेल्या अधिकारानुसार बँकेच्या वतीने विविध प्रकारच्या शासकीय संस्था, बँका, वित्तीय संस्था व इतर संस्थांबरोबर करार करणे त्यानुसार त्याची अंमलबजावणी करणे.

१४) बँकेकडील उपलब्ध निधीच्या गुंतवणूकीबाबत नियोजन करुन त्याप्रमाणे गुंतवणूक करण्याबाबतची व्यवस्था निर्माण करुन त्यावर देखरेख ठेवणे.

१५) संचालक मंडळाच्या वतीने भागधारकाची वार्षिक सर्वसाधारण सभा (Annual General Meeting) किंवा विशेष सर्वसाधारण सभा (Special General Meeting) बोलवणे व त्याचे नियोजन करणे.

१६) संचालक मंडळाच्या सभा व सर्वसाधारण सभांचे इतिवृत्त तयार करणे व ते सांभाळून ठेवणे, तसेच त्याप्रमाणे विविध प्रकारची कार्यवाही करणे.

१७) बॅंकेतील कर्मचाऱ्यांची संख्या, रिक्त जागा, कर्मचाऱ्यांची आवश्यकता याचा आढावा घेऊन प्रमोशन अथवा कर्मचारी भरती करणेबाबत संचालक मंडळाची परवानगी घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणे.

१८) बँकेच्या भागधारकांनी अथवा RBI, NABARD, व शासनाने मागितलेली माहिती कायद्याच्या चौकटीत राहून उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करणे.

१९) बँकींग कायद्यातील तरतुदी, विधी व उपविधीची पूर्तता करण्यासाठी नियंत्रण व व्यवस्थापन करणे.

२०) बँकेच्या सकल प्रगतीची जबाबदारी स्वीकारुन बँकेच्या प्रगतीसाठी व विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे.

**ब) प्रादेशिक किंवा विभागीय कार्यालय व्यवस्थापकांची कार्ये व जबाबदाऱ्या : (Role and Responsibility of Regional / Zonal Manager)**

१) बँकेने निर्धारित करुन दिलेल्या प्रदेशातील अथवा विभागातील बँक शाखांचा प्रमुख म्हणून आपल्या प्रदेशातील शाखांच्या व्यवस्थापनाची व विकासाची जबाबदारी स्वीकारुन कार्य करणे.

२) बँकेचे मुख्य कार्यालय आणि विभागातील कर्मचारी यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून जबाबदारी पार पाडणे.

३) मुख्य कार्यालयाने दिलेल्या योजनेप्रमाणे किंवा व्यावसायिक आराखड्याप्रमाणे कार्य करणे, त्याची पूर्तता करणे.

४) बँकेने विभागासाठी दिलेली ठेव संकलन, कर्ज वाटप तसेच वसुली कार्याबाबतच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आपल्या स्तरावर व्यवस्था उभी करणे तसेच त्यावर देखरेख ठेवून आढावा घेणे आणि उद्दिष्टांची पूर्तता करणे.

५) विभागातील सेवक भरती, प्रमोशन, सेवानिवृत्ती, सेवकांचे प्रश्न व समस्या याबाबत वेळोवेळी मुख्य कार्यालयाकडे अहवाल सादर करणे.

६) आपल्या विभागातील शाखा, सेवकवर्ग तसेच ग्राहकाच्या तक्रारी व प्रश्न आपल्या अधिकार कक्षेप्रमाणे सोडवणे अथवा मुख्य कार्यालयाकडे मार्गदर्शनासाठी पाठवणे.

७) मुख्य कार्यालयाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे व त्याबाबत वेळोवेळी कार्यपूर्तता अहवाल मुख्य कार्यालयास कळवणे.

८) आपल्या विभागातील बँक शाखांचा व्यवसाय वाढण्यासाठी योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी करणे विभागातील सेवकांना त्याप्रमाणे मार्गदर्शन करणे, त्यांना प्रशिक्षण देणे.

९) विभागातील शाखा व्यवस्थापकांच्या सभा बोलावून त्यांना प्रोत्साहन देणे, कामाचा आढावा घेणे, गरजेनुसार त्यांना मार्गदर्शन करणे अथवा सूचना देणे.

१०) आपल्या विभागातील शाखा व बँक ग्राहक यांच्यातील संबंध दृढ करण्यासाठी यंत्रणा राबवणे व विविध उपक्रमांचे आयोजन करणे.

११) आपल्या विभागातील शाखा व्यवस्थापक आणि शाखेतील कर्मचाऱ्यांचे योग्य ते नेतृत्त्व करणे त्यांना दिशादर्शन करणे.


१२) विभागातील व्यावसायिक परिस्थितीचा आढावा घेऊन ध्येयधोरण व व्यावसायिक योजनेत आवश्यक ते बदल करण्याबाबतच्या सूचना मुख्य कार्यालयास पाठवणे.

## ४.५ बँक शाखा – रचना, कर्मचारी व शाखाव्यवस्थापकांची कार्ये :

**(Bank Branch - Structure, Staff, Role of Branch Manager)**

बँकींग व्यवसायातील थेट बँक ग्राहकास सेवा देण्याचे कार्य करणारी व्यवस्था म्हणजे बँकेची शाखा असते त्यामुळे बँकींगच्या रचनेमध्ये बँक शाखेस व त्यामधील व्यवस्थेला सर्वाधिक महत्त्व असते. प्रस्तुत घटकामध्ये आपण बँकेच्या शाखेची सर्वसाधारण रचना, बँकेत कार्य करणारे कर्मचारी आणि शाखेतील शाखा व्यवस्थापक यांची कार्ये याबाबतची माहिती घेणार आहोत. वास्तविक पहाता सर्व बँकांच्या शाखांचे स्वरूप आणि रचना समान नसते. त्यामध्ये कमालीचे वैविध्य असते परंतु प्रस्तुत सदरामध्ये शाखेचे सर्वसामान्य स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**बँक शाखेचे स्वरूप किंवा रचना आणि कर्मचारी (उदाहरणार्थ)**




**अ) शाखा व्यवस्थापक : (Branch Manager)** शाखेचा प्रमुख म्हणजे शाखा व्यवस्थापक होय. शाखा व्यवस्थापक हा त्या शाखेतील व्यवस्थापकीय सेवा व प्रमुख असतो. त्याच्या नियंत्रणाखाली आणि मार्गदर्शनाखाली शाखेतील कामकाज चालते.

**ब) सहाय्यक व्यवस्थापक : (Assistant Manager)** बँकेचा व्यवसाय, शाखेची व्याप्ती, शाखेतील ग्राहकांची संख्या आणि उलाढालीचा विचार करुन शाखेमध्ये एक किंवा एकपेक्षा अधिक सहाय्यक व्यवस्थापकाची

नेमणूक केली जाते. सहाय्यक व्यवस्थापक हा व्यवस्थापकास मदत करणे व त्याच्या निर्देशानुसार कार्य करणारा अधिकारी असतो.

**क) वरिष्ठ अधिकारी : (Senior Officers)** बँकेतील प्रत्यक्ष ग्राहक सेवा प्रदान करणाऱ्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व संबंधित विभागातील कामकाजाचे नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी बँक शाखेतील व्याप्तीनुसार विविध विभाग निर्माण केलेले असतात. काही शाखांमध्ये एकाच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे दोन किंवा अधिक विभागाची जबाबदारी असते तर मोठ्या शाखामध्ये विविध विभागांसाठी स्वतंत्र वरिष्ठ अधिकारी नियुक्त केलेला असतो. त्यामध्ये पुढील अधिकारी असू शकतात.

* वरिष्ठ अधिकारी – कर्ज विभाग
* वरिष्ठ अधिकारी – ठेव विभाग
* वरिष्ठ अधिकारी – बँकींग सेवा विभाग
* वरिष्ठ अधिकारी – गुंतवणूक सेवा विभाग
* वरिष्ठ अधिकारी – वसुली विभाग
* वरिष्ठ अधिकारी – समाशोधन विभाग
* वरिष्ठ अधिकारी – प्रशासन विभाग
* वरिष्ठ अधिकारी – लेखे विभाग

(शाखेच्या व्याप्तीनुसार ही पदसंख्या कमी अधिक असते.)

**ड) कनिष्ठ अधिकारी : (Junior Officer)** बँकेतील विविध विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सहाय्यक व्यवस्थापक आणि व्यवस्थापकास मदत करण्यासाठी व त्याच्या निर्देशानुसार संबंधित विभागातील कार्ये पार पाडण्यासाठी कनिष्ठ अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली असते. या अधिकाऱ्याची संख्याही शाखेतील कामकाज व आर्थिक उलाढालीवर अवलंबून असते.


**ई) लेखनिक किंवा सहाय्यक : (Clerk or Assistant)** बँक शाखेमध्ये वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी लेखनिक किंवा सहाय्यकाची नेमणूक केलेली असते. बँकेतील ग्राहकांना प्रत्यक्ष काऊंटरवर सेवा देण्याचे महत्त्वाचे कार्य हे कर्मचारी करत असतात. बँकेच्या सोईनुसार व आवश्यकतेनुसार विभागानुसार लेखनिक किंवा सहाय्यकाची नेमणूक केली जाते.

**फ) रोखपाल : (Cashier)** बँक ग्राहकांना आपल्या खात्यात रोख रक्कम जमा करण्याची तसेच आपल्या बँक खात्यातून पैसे काढण्याची सेवा देणारा महत्त्वाचा कर्मचारी म्हणजे रोखपाल हा असतो. रोखपाल हा आपल्याकडील स्ट्राँग रूमचा इनचार्ज असतो. म्हणजेच बँकेतील सर्व कॅश त्याच्या ताब्यात असते. त्याचे योग्य व्यवस्थापन करण्याची व काळजी घेण्याची जबाबदारी रोखपालावर असते.

**ग) इतर कर्मचारी : (Other Employees)** वरील विविध कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त बँकेमध्ये ग्राहक मित्र, सुरक्षा रक्षक, शिपाई इत्यादी कर्मचारीही कार्यरत असतात. हे कर्मचारी, शाखा व्यवस्थापक, सहाय्यक

व्यवस्थापक तसेच संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निर्देशानुसार कार्य करत असतात.

**बँक शाखेची रचना (Structure of Branch)**




**टिप :** सदर रचना ही केवळ निर्देशात्मक आहे. शाखेच्या इमारती व जागेप्रमाणे यामध्ये भिन्नता असते.

बँकेच्या शाखेचे स्वरूप हे निर्धारित करणे सहज शक्य बाब नसते. कारण बँकेचा व्यवसाय, बँकेकडे असणाऱ्या ग्राहकांची संख्या, बँक शाखेस उपलब्ध असणारी जागा किंवा इमारत अशा अनेक बाबींचा विचार करून बँकेच्या शाखेचे स्वरूप ठरवणे गरजेचे असते. तथापि बँकेच्या शाखेमध्ये काही किमान आवश्यक सेवा सुविधा देण्याची व्यवस्था अग्रक्रमाने केली जात असते. त्यामध्ये प्रामुख्याने स्ट्राँग रूम, कॅशीअर रूम, ठेव विभाग, कर्ज विभाग व इतर बँकींग सेवा-सुविधा विभाग आणि वरिष्ठ अधिकाऱ्यासाठीचे कक्ष यांचा समावेश होतो. या शाखा कमी जागेत काम करतात त्या ठिकाणी विविध विभाग एकत्रितपणे चालवण्याची व्यवस्था केलेली असते.

**बँकेच्या शाखा व्यवस्थापकाच्या जबाबदाऱ्या व भूमिका : (Role and Responsibilities of Bank Branch Manager)**

१) बँक शाखेचा व्यवस्थापकीय प्रमुख, नेता व मार्गदर्शक म्हणून जबाबदारी पार पाडणे.

२) शाखेतील ग्राहकांना उत्तम सेवा देण्याची व्यवस्था करणे.

३) बँक खातेदारांच्या सेवेबाबतच्या अपेक्षा समजून घेणे व त्याप्रमाणे कायदे व नियमाच्या चौकटीत राहून सेवा पुरवणे.

४) विभागीय कार्यालयाने दिलेल्या सूचना व निर्देशाचे पालन करणे, त्याप्रमाणे शाखेचे कामकाज करवून घेणे.

५) विभागीय कार्यालयास आवश्यक असणारी माहिती उपलब्ध करुन देणे.

६) बँकेच्या मुख्य कार्यालयाने अथवा विभागीय कार्यालयाने दिलेल्या व्यावसायिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी नियोजन करुन त्याची अंमलबजावणी करणे.

७) शाखेतील कामकाजाचे योग्य वाटप व विभागणी करुन त्यावर नियंत्रण ठेवणे व देखरेख करणे.

८) शाखेतील बँकींग व्यवहार व लेखे नोंदणी व्यवहार नियम व कायद्यास अनुसरुन होत असल्याची खात्री करणे.

९) शाखेतील रोख शिल्लक योग्य प्रमाणात सांभाळणे, शिल्लक रकमेची योग्य ती काळजी घेणे याबाबत नियंत्रण ठेवणे.

१०) बँकींग व्यवहाराच्या नियमामध्ये झालेले बदल वेळोवेळी बँक ग्राहक आणि कर्मचाऱ्यांच्या लक्षात आणून देणे त्याबाबत गरजेनुसार प्रसिध्दी देणे.

११) शाखेतून झालेल्या कर्जवाटपाच्या वसुलीकडे लक्ष देऊन नियमितपणे वसुली होत राहील यासाठी आवश्यक ती यंत्रणा राबणे, वेळोवेळी त्याचा आढावा घेणे.

१२) बँकेच्या शाखेतील विद्यमान ग्राहक टिकवून नवीन ग्राहकवर्ग राहण्यासाठी कर्मचाऱ्यांना निर्देश देणे, प्रोत्साहन देणे त्यासाठी विशेष प्रयत्न करणे.

१३) बँकेच्या अंतर्गत लेखापरिक्षक अथवा वैधानिक लेखापरिक्षकाने दिलेल्या सूचना किंवा निर्देशित केलेल्या दोषांनुसार लेखाव्यवहारातील दोष दुरुस्ती करुन घेणे.

१४) बँक शाखेतील कर्मचारी आणि ग्राहक यांच्यामध्ये विश्वासार्ह संबंध प्रस्थापित करण्यासाठी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे.

१५) शाखेतील स्थानिक ग्राहकांच्या गरजांचा विचार करुन त्यांची पूर्तता करण्याबाबत विभागीय कार्यालय अथवा मुख्य कार्यालयाच्या मार्गदर्शनानुसार कार्यवाही करणे.

### ४.६ घटक अभ्यास (Case Study) बाबत सूचना :

प्रस्तूत प्रकरणातील विविध घटकांच्या अनुषंगाने अभ्यासार्थी विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे विविध बँकांच्या कार्यपध्दती व व्यवस्थापनाबाबत घटक अभ्यास करता येईल.

१) राष्ट्रीयकृत, खाजगी किंवा सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयातील विविध विभाग, अधिकारी, कर्मचारी, रचना इत्यादींचा अभ्यास करणे.

२) जिल्हा मध्यवर्ती बँक, नागरी सहकारी बँक यांच्या मुख्य कार्यालयाचा अथवा शाखातील व्यवस्थापन रचनेचा अभ्यास करणे.

३) बँकेतील विविध पदाधिकाऱ्याच्या अधिकाराचा व जबाबदारीचा अभ्यास करणे.

४) बँकेच्या शाखेतील कामकाज, व्यवस्थापन व कार्यपध्दतीचा अभ्यास करणे.

५) बँकेच्या मुख्य कार्यातील एखाद्या विशिष्ठ विभागातील कामकाज व व्यवस्थापन पध्दती समजून घेणे व त्याचा अभ्यास करणे इत्यादि.

### ४.७ सारांश :

बँकांच्या व्यवस्थापनामध्ये मुख्य कार्यालय आणि प्रादेशिक अथवा विभागीय कार्यालयातील विविध विभाग आणि अधिकारी वर्ग हा महत्त्वाचा भाग असतो. बँकेच्या मुख्य कार्यालयात बँकेचे अध्यक्ष, सीईओ, संचालक मंडळ, जनरल मॅनेजर, मॅनेजर, सहाय्यक अधिकारी, मुख्य कार्यालयातील प्रशासन विभाग, कर्ज विभाग, लेखाकर्म विभाग, लेखापरीक्षण विभाग, मनुष्यबळ विभाग, माहिती तंत्रज्ञान विभाग, गुंतवणूक व्यवस्थापन विभाग, कायदा विभाग, राजभाषा विभाग, वसुली विभाग, वित्तीय समावेशन विभाग, आंतरराष्ट्रीय बँकींग विभाग इत्यादी विभाग महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात.

प्रादेशिक कार्यालयामध्ये, रिजनल मॅनेजर, सहाय्यक रिजनल मॅनेजर, प्रशासकीय अधिकारी व इतर कर्मचारी तसेच विभागीय कार्यालयातील विविध कर्मचारी आणि येथील विभागाची भूमिका महत्त्वाची असते. बँकांच्या संपूर्ण व्यवस्थापन प्रक्रियेत सरव्यवस्थापक आणि प्रादेशिक कार्यालयाचे व्यवस्थापक देखील महत्त्वाच्या जबाबदाऱ्या व कार्ये पार पाडत असतात. शाखा स्तरावर शाखेतील विविध विभाग, व्यवस्थापक, सहाय्यक व्यवस्थापक वरिष्ठ व कनिष्ठ अधिकारी रोखपाल, इत्यादी सेवक, बँकेच्या शाखेचे कामकाज सुव्यवस्थितपणे पार पाडण्याचे कार्य करत असतात.

### ४.८ पारिभाषिक शब्द :

* **कार्यकारी संचालक (Managing Director - MD) :** बँकेच्या मुख्य कार्यालयातील निर्णयाची अंमलबजावणी करणारा व बँकेच्या संचालक मंडळातील प्रतिनिधी असणारा वरिष्ठ अधिकारी.

* **सरव्यवस्थापक (General Manager - GM) :** बँकेच्या व्यवस्थापनातील वरिष्ठ पातळीवरील व्यवस्थापकीय अधिकारी जो सर्व व्यवस्थापकांचा प्रमुख अधिकारी असतो.

* **ट्रेझरी ऑफीसर (Treasury Officer) :** बँकेकडील गुंतवणूक निधीचे योग्य व्यवस्थापन करणारा, गरजेनुसार गुंतवणूक व निर्गुंतवणूक करुन बँकेला योग्य परतावा मिळवून देण्याचे कार्य करणारा विभागाचा अधिकारी.

### ४.९ बहुपर्यायी प्रश्न :

१) बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा हि .......................... साठी असते.

अ) व्यवस्थापकांसाठी   ब) संचालकांसाठी   क) भागधारकांसाठी   ड) वरीलपैकी नाही

२) बँकेच्या CEO च्या पदनामामधील C म्हणजे ......... होय.

अ) Chief   ब) Controller   क) Central   ड) Core

३) बँकेच्या मुख्य कार्यालयातील ................. अधिकारी बँकेच्या निधीची गुंतवणूक करण्याचे कार्य करतो.

अ) मार्केटींग ऑफीसर   ब) फायनान्स ऑफीसर   क) ट्रेझरी ऑफीसर   ड) अकाऊंट ऑफीसर

४) ……………………… हे घटक बँकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाशी संबंधीत आहेत.

अ) सायबर सेक्युरिटी ब) टेडा सेंटर क) फायरवॉल सिस्टीम ड) वरील सर्व

५) बँकेच्या शाखेतील कॅश ……………………….. यांच्या ताब्यात असते.

अ) सेक्युरिटी ऑफीसर ब) लेखापाल क) रोखपाल ड) सहाय्यक

**उत्तरे : १) क २) अ ३) क ४) ड ५) क**

**४.१० स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :**

१) बँकेच्या मुख्य कार्यालयाची रचना सांगून त्यामधील विविध अधिकारी व त्यांच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२) बँकेच्या मुख्य कार्यातील विविध विभागाचे स्वरूप स्पष्ट करा.

३) बँकेच्या शाखेचे स्वरूप सांगून शाखेतील विविध कर्मचाऱ्याची कार्ये थोडक्यात स्पष्ट करा.

**थोडक्यात टिपा लिहा :**

१) जनरल मॅनेजर व सहाय्यक जनरल मॅनेजर

२) विभागीय कार्यालय

३) बँकेचे प्रादेशिक कार्यालय

४) बँकेच्या जनरल मॅनेजरची भूमिका स्पष्ट करा.

५) बँकेच्या शाखा व्यवस्थापकाची कार्ये स्पष्ट करा.

६) बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाच्या व्यवस्थापनाची कार्ये.

**४.११ अधिक अभ्यासासाठी पुस्तके व संदर्भ :**


1) Vasant Joshi and Vinay Joshi (1998), Managing Indian Banks, Challenges Ahead, Response Books, New Delhi.

2) JBF (2005), General Bank Management, Indian Institute of Banking and Finance, Mumbai.

3) Timothy Koch and S. Scott MacDonald (2014) Bank Management, Cengage Learning 2014.

4) Patil D. B. and Bhakkad D. D.(2014), Redifining Management Practices and Marketing in Modern Age, Atharv Publication.


✻ ✻ ✻